मराठीतून कॉन्टिनेन्टल **विश्ववाङ्मयाकडे**

पुश्किन	*कॅप्टनची मुलगी*	डॉ. पंडित आवळीकर
पुश्किन	*कथा*	डॉ. पंडित आवळीकर
पुश्किन	*जीवन व काव्य*	डॉ. पंडित आवळीकर
दस्तयेवस्की	*कारमाझफ बंधू*	भाऊ धर्माधिकारी
दस्तयेवस्की	*गुन्हा आणि प्रायश्चित्त*	का. बा. कोनकर
दस्तयेवस्की	*जुगारी*	जयंत दीक्षित
दस्तयेवस्की	*शापित कोझाकीण*	अशोक डांगे
दस्तयेवस्की	*काकांचे स्वप्न*	अविनाश बिनीवाले
दस्तयेवस्की	*समीक्षा*	अनिरुद्ध कुलकर्णी
टॉलस्टॉय	*तीन दीर्घकथा*	पंढरीनाथ रेगे
चेखव	*सात कथा*	सुमती कानिटकर
फ्लोबेर	*मादाम बोवारी*	जयंत धुपकर
शेक्सपीयर	*हॅम्लेट*	परशुराम देशपांडे
शेक्सपीयर	*सुनीते*	परशुराम देशपांडे
खलिल जिब्रान	*प्रेषित*	श्रीपाद जोशी
खलिल जिब्रान	*जीवन व साहित्य*	श्रीपाद जोशी
खलिल जिब्रान	*तुटलेले पंख*	मनोहर शहाणे

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ३०

पु श्कि न
जीवन आणि काव्य



डॉ. पंडित आवळीकर

आलेक्सान्द्र

पुश्किन:

जीवन आणि काव्य

प्रा. डॉ. पंडित आवळीकर

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११०३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
यांनी प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनासाठी
अनुदान दिले आहे.
तथापि या पुस्तकातील
लेखकाच्या विचारांशी
मंडळ व राज्य शासन
सहमत असेलच असे नाही.

■

प्रकाशक
अनिरुद्ध अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११ ०३०

■

मुद्रक
योगेश जंगम
जंगम ऑफसेट प्रा. लि.
नांदेड फाटा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.

■

पुश्किन : जीवन आणि काव्य
प्रकाशन क्रमांक : १३२०

प्रथमावृत्ती : २००४

■

किंमत ९० रूपये.

अनुक्रमणिका

कै. पंडित आवळीकर अनुवादित
पुश्किनच्या दोन कलाकृती

■

कॅप्टनची मुलगी
(कादंबरी)
पुश्किनच्या कथा.

ऋणानुबंध

ना नात्यातले, ना गोत्यातले, ना आपल्या देशातले, ना आपल्या भाषेतले, ना आपल्या काळातले, ना पाहण्यातले... असे काहीजण आपल्या 'असण्या' चे अविभाज्य अंग बनून राहतात. का, कसे काही कळत नाही.

गेली पंचवीस वर्षं अलेक्सांद पुश्किन हा माझा 'हिस्सा' बनून राहिला आहे. माणूस म्हणून आणि कवी म्हणून. या दोन तपांत त्यानं मला एवढं भरभरून दिलं आहे की त्याची मी वर्गवारी करू शकणार नाही, मोजदादही करू शकणार नाही. त्याचं अलौकिक ऋण मी फेडू तर शकणारच नाही. १९७५ साल उजाडेपर्यंत पुश्किनचं नावही मी ऐकलं नव्हतं आणि हे मराठीच्या पढिक प्राध्यापकाला साजेसंच होतं. पण 'इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स' या संस्थेनं प्राध्यापकांच्या देवाणघेवाणीच्या सांस्कृतिक कार्यक्रमात माझी निवड केली. लेनिनग्रादमधे पाच वर्षांसाठी अभ्यागत प्राध्यापक म्हणून मी काम करायचं होतं.

मी संमती दिली आणि तयारीला लागलो. रशियन शिकायचं ठरवलं. नीना पातीपोवाच्या पुस्तकांचे भाग मिळवले आणि या स्वाध्यायात पुश्किनच्या काही काव्यपंक्ती वाचल्या. 'बेझ् लांपादि' ... अशी सुरुवात होणारी ती त्याची पहिली कविता खोलीतल्या कुंद अंधाराचं वर्णन करणारी होती, पण ती वाचली, प्रयत्नानं 'लावली'... आणि लख्ख प्रकाश पडल्यासारखं, रोमारोमांतून सर्रकन् शिरशिरल्यासारखं वाटलं. काय वाटलं ते आज या क्षणीही मी कल्पनेनं अनुभवू शकतो, पण शब्दांत सांगू शकत नाही.

पुश्किनची आणि माझी ती पहिली दृष्टिभेट होती. त्या पहिल्या भेटीतच मी पुश्किनच्या प्रेमात पडलो होतो. त्यानं मला आपल्या प्रेमात पडू दिलं हे त्याचं माझ्यावरलं पहिलं ऋण होतं आणि ते पुढं वाढतच गेलं. त्याच्या माझ्या प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष, त्याच्या काव्यातून, त्याचा देश आणि माणसं यांच्यातून भेटीगाठी होतच राहिल्या. आमच्या ऋणानुबंधाच्या गाठी पक्क्या होत गेल्या.

सुरगाठी, निरगाठी राहिल्या नाहीत, किंवा त्या तुटल्याही नाहीत.

१९८५ मध्ये मी रशियाला गेलो. मधल्या दहा वर्षांत मी पुश्किन पुष्कळ वाचला. तो मला पचला आणि रुचला. मुळातून त्याच्या कथांचे, काव्यांचे, नाटक - संगीतिकांचे आणि कादंबरीचे मी अनुवाद केले, ते प्रसिद्धही झाले. शिवाजी विद्यापीठात तीन व्याख्यानं दिली, तीही विद्यापीठानं मुद्रित केली.

स्वत:च्या जबाबदारीवर, कोणाकडून कसलीही मदत न घेता माझा पुश्किन - प्रकल्प मी चालू ठेवला आणि रशिया भेटीमुळं मला बरंच काही ऐकायला, पाहायला, अनुभवायला मिळालं, तिथल्या वास्तव्यात - मॉस्कोमध्ये पाऊल टाकल्यापासून परत निघेपर्यंत, मला जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी पुश्किन (चांगल्या अर्थानं) दिसतच राहिला, भेटतच राहिला, माझ्याशी बोलतच राहिला. राजसत्तेला किंचितही न भिणारा, उलट भिवविणारा, धारदार नजरेचा पुश्किन मला सिरिमिचिव विमानतळावर, माझ्या पासपोर्टची पाहणी करणाऱ्या रशियन अधिकाऱ्यांच्या नजरेतल्या जरबेत दिसला. मी अजून काउंटरजवळच उभा होतो. काचेपलीकडले निळसर पण जबरदस्त डोळे एकदा माझ्याविषयीच्या कागदपत्रातल्या माझ्या फोटोकडे, माझ्या वर्णनाकडे पाहात होते, तर एकदा मला पुरते न्याहाळत होते. ती पाच मिनिटं मला पाच युगांसारखी वाटली. आपल्याला बहुतेक विमानतळाबाहेर सोडणार नाहीत, आल्या पावली - आपल्याला आयरोफ्लोतनं परत जावं लागणार अशी माझी खात्री पटली. पण त्या निळ्या डोळ्यांतला करडेपणा एकदम नाहीसा झाला आणि माझ्यासाठी आलेली 'सरकारी गाडी' गस्तिनित्साकडं, आलीशान अतिथिगृहाकडं धावू लागली. पुश्किनचा धाक एवढा होता, की त्याच्या अंत्यविधीला सरकारी इतमाम या नावाखाली कडेकोट बंदोबस्त ठेवण्याची पाळी सरकारवर आली. पुश्किनचा आणि त्याच्या कथा - कादंबऱ्यांतल्या पात्रांचा करडेपणा आणि नंतर जाणवणारा कोवळेपणा माझ्या प्रत्ययास आला.

मुख्यत: मॉस्कोमध्ये मी राहिलो. त्या मुक्कामात मला रशियन स्त्री पुरुषांच्या मोकळ्या, सीध्यासाध्या ('प्रस्तोय'), लाघवी आणि प्रांजळ स्वभावाचं लोभस दर्शन घडलं. एकदोन उदाहरणं सांगावीशी वाटतात.

माझ्याबरोबर अष्टौप्रहर दुभाषी आणि मार्गदर्शक म्हणून सावलीसारखी वावरणारी तान्या माझी जिवाभावाची सोबती बनली. वीसबावीस वर्षांची, विवाहित, तल्लख आणि तरतरीत. प्रसन्न आणि प्रगल्भ. वाङ्मयाची चांगली जाण असलेली आणि नव्या - जुन्या रीतिरिवाजांचा संगम असलेली ही मुलगी मला पुश्किनच्या 'यिव्गेनी अनेगिन' मधली चालतीबोलती तात्यानाच वाटली. (तान्या हे तात्यानाचं बोलीभाषेतलं रूप.)

दिवसा, रात्री, अपरात्री ती माझ्याबरोबर फिरली, हिंडली, नि:संकोच. विलक्षण आत्मविश्वासानं आणि विश्वासानं. आम्ही कवींची म्युझियम्स पाहिली, नाटकं पाहिली, लाल चौक, क्रेम्लिन यांसारखी स्थळं पाहिली. सर्कससुद्धा पाहिली ! खरं म्हणजे हे सगळं तिनं चोखंदळपणानं मला पहायला मदत केली.

'बोल्शोय तिआत्र' हे जगातलं अप्रतिम नाट्यगृह आहे. त्या थिएटरमध्ये पुश्किनचं 'बोरीस गोदुनोव' हे ऐतिहासिक नाटक पाहणं म्हणजे माझ्या आयुष्यातला एक अमृतानुभव होता. तो तान्याच्या शेजारी बसून तिच्या मार्मिक कॉमेंटस् ऐकत पाहणं हा थेट पुश्किनला भिडण्याचा दुर्मिळ योग होता.

असाच अक्षरश: स्वर्गीय आनंद म्हणजे 'सिद्मोय नेब' ('सातवा स्वर्ग') या फिरत्या (revolving) उपाहारगृहात बसून आकाशातून सबंध मॉस्को घोटघोट पाहणं. आकाशातून पृथ्वी आणि पृथ्वीवरून आकाश अनिमिष नेत्रांनी आणि अयुक्त शब्दांनी टिपणं, वेचणं, हा पुश्किनच्या 'तान्या'च्या सहवासाचाच अंश होता.

काप - काझ पर्वतावरल्या भ्रमंतीत छोटासा अपघात होऊन माझा खांदा दुखावला - उजवा. मॉस्कोत परतल्यावर - अंगावर 'पाल्तो' चढवण्यापासून, बुटाचे बंद बांधण्यापर्यंत तान्यानं जी सेवा केली ती पोटच्या मुलीनंही केली नसती. तिच्यामध्ये मला 'यिव्गेनी अनेगिन' मध्ये तान्या भेटली, तशीच 'कॅप्टनची मुलगी' मधली मार्या भेटली. 'पोस्टमास्तर' या कथेतली दून्या दिसली. 'लळा' म्हणजे काय ते समजलं.

मॉस्कोहून परतताना विमानतळाबाहेर तान्यानं घेतलेला हृदयस्पर्शी निरोप आणि एका क्षणात तिचं बाहेरच्या गर्दीत अदृश्य होणं - ही पुश्किनच्या आणि माझ्या ऋणानुबंधाची एक पक्की गाठ होती.

स्त्री - पुरुष संबंधातलं सुंदर पण संयत, मधुर पण निकोप काव्य मला पुढं लेनिनग्रादमधल्या काही दिवसांत उत्कटतेनं जाणवलं. या संबंधातला मोकळेपणा किंवा खुलेपणा मला तरी नवीनच होता. आमचे कॉलेजमधले दिवस - बरोबरच्या मुलींशीसुद्धा फारसं न बोलताच गेले होते. 'पु - स्त्री - मैत्री' (माधवरावांचा शब्द) कल्पनेतच शक्य होती. किंवा एकतर्फी प्रेमाच्या (!) काव्यात! भारतीय नावाच्या हवामानाचाही हा परिणाम असेल. रशियात याबाबत मुक्त श्वास घेण्याइतपत हवामानाची अनुकूलता दिली. लेनिनग्रादमध्ये माझी सांगाती होती ती नाद्या माझ्या पूर्वपरिचयाची होती. एका विद्यापीठात आम्ही सहकारी आणि चांगले स्नेही होतो. ती बहु - विवाहित होती. पण तिच्यातही पुश्किनच्या नायिकांतली, आणि चाळिशीतली अपेक्षित ग्रेस होती. दोन दिवसांच्या तिच्या घरेलू आतिथ्यात रशियन सुगरिणीचा ('सु' गृहिणीचा) रेलचेल आविष्कार होता. तर तिच्याबरोबर लेनिनग्रादच्या थिएटरमध्ये पाहिलेल्या 'बरवचिरायस्किय फन्तान' 'रुसाल्का' यांसारख्या पुश्किनच्या संगीतिका - नाद्याच्या मर्मज्ञतेमुळं कमालीच्या आस्वाद्य ठरल्या.

आजच्या 'पुश्किन सिटी' ची भेट रोमहर्षक होती. पुश्किन शिकला ती 'लित्सेय' (शाळा) त्याची वसतीची खोली, शेवटच्या परीक्षेत शून्य गुण मिळालेली त्याची गणिताची उत्तरपत्रिका, शाळेच्या दुसऱ्या भागांतली - पुश्किननं चुकून 'प्रिन्सेस'ला मिठी मारली होती तो व्हरांडा, या प्रत्येक ठिकाणी अदृश्यरूपात पुश्किन उभा होता, मिश्किलपणानं हसत होता, त्सारची फिरकी घेत होता आणि त्या दिवसातल्या प्रत्येक 'क्षण' काव्याचा 'सण' कसा बनला ते सांगत होता. उरलेलं लेनिनग्राद तर त्याची साक्षात जीवनगाथाच वाटलं. पुश्किन भेटण्याची - नव्हे, पुश्किनचा विद्यमान अवतार भेटण्याची एक जागा आणि एक व्यक्ती मी रशियाला जाण्यापूर्वीच हेरून ठेवली होती आणि त्या ठिकाणी जाऊन त्या आधुनिक पुश्किनबरोबर काही दिवस घालवण्याची योजना मी आखली होती.

त्याप्रमाणे मी दघिस्तानची राजधानी मखचकला इथं गेलो आणि रशियातली आजचा श्रेष्ठ लोकप्रिय कवी रसूल गमझातोव याच्याबरोबर काही काळ व्यतीत केला. त्याच्या काफ्काझमधल्या

मूळच्या परिसरात फिरलो. याच काफ्काझमधये पुश्किनही खूप फिरला होता - त्याच्या हद्दपारीच्या दिवसांत त्यानं इथंही खूप 'भोगलं' होतं. त्याच्या काव्यात येणारे मुस्लिम कवींचे/सरदारांचे/स्थलनामांचे संदर्भ मला पडताळून पाहता आले. रसूलच्याही काव्याचे प्रादेशिक मूलस्रोत मला टिपता आले; त्याच्या 'अवर' नावाच्या भाषेबरोबरच.

रसूलला पाहणं - भेटणं तर दूरच राहिलं, हे रशियामध्ये मोठं भाग्य समजलं जातं. ते भाग्य मला लाभलं. 'याचि देही याचि डोळा' मी रसूल पाहिला. गोरागोमटा. एकाचवेळी धारदार, पाणीदार आणि भावुक डोळ्यांचा. बोलणं हळुवार आणि चमकदार. शंभर टक्के 'रोमँटिक' दिसणारा. माझ्या मनातला पुश्किनच माझ्या समोर उभा होता, बसला होता. खातपीत होता. फातिमाची-आपल्या बिबीची ओळख करून देत होता. ''माझं रशियन तुला कळत नाही, पण माझ्या बायकोचं मात्र कळतं - अं?'' असं मला चिडवत होता. त्याला 'टोस्ट' देताना मी काही स्तुतीपर बोललो तेव्हा लाजला होता आणि निरोप द्यायच्या वेळी त्यानं प्रेमानं माझ्या अंगावर आपल्या हातानं 'बुरखा' (म्हणजे भारी फरचा कोट) चढवला होता. आणि तो मला फारच ढगळ झाल्यावर 'काळजी करू नकोस. यात तुझ्या मैत्रिणीला तू लपवू शकशील!' अशी त्यानं माझी फिरकीही घेतली होती. फिरकीचा, काही उपयोग नव्हता. त्यानं मला फक्त 'बुरखा' दिला होता... मरवच्कलामधल्या दिवसांत जय - विजयांसारखे आणि सिराज (हे दोघंही प्राध्यापक होते) त्यांच्या 'पंदित - खान'च्या हसण्यात सामील झाले होते. पुश्किनची आठवण करून देणारी रसूलची 'टोपी' वरली कविता मनात आणि कानात भिरभिरत होती आणि मोहल्ल्यातल्या त्याच्या मकानातून 'खुदा हाफिज' हे त्याचे शब्द माझ्या पाठोपाठ येत होते... पुश्किनचा निरोप देत होते.

मरवच्कलाहून मॉस्कोला आलो आणि पुश्किनभेटीची भरती ओसरली. परतीचा वारा वाहू लागला. सेर्गेय माझा चांगला मित्र झाला होता. त्याच्या बोलण्यात महामिश्किलपणा असायचा. मोकळा असला की मला काही ठिकाणं दाखवायचा. त्यानं मला घरी जेवायला बोलावलं. निरोपादाखल. त्याची बायको त्याच्याचप्रमाणं पुश्किनप्रेमी : चांगली दर्दी. त्यांनी एका वयस्क पुश्किन - ज्ञाला पण आमंत्रण दिलं होतं. मी पुश्किनबद्दल भरभरून बोलत होतो. ते पुश्किन - तज्ज्ञाला म्हणाले : ''मी तुमची बायको असतो तर, पुश्किनवरलं हे प्रेम पाहून मी तुम्हाला घटस्फोट दिला असता!'' त्या बैठकीत मला दोन गोष्टी नव्यानं कळल्या : १) पुश्किन हा रशियनांना 'कुटुंब - कवी' (Family Poet) वाटतो. २) पार्टीच्या वेळी शँपेनच्या बाटलीचं बूच कसं उडतं - सेर्गेयचा निरोप घेतला. मला घटस्फोट दिला असता त्या प्राध्यापकांचा निरोप घेतला. पण परिणीत आणि परिणत यजमाणिनीला काय म्हणावं कळेना. सेर्गेय म्हणाला, ''ती काळजी करू नको.'' दारापाशी पोचलो. एवढ्यात त्या पुरंध्रीनं पुढं होऊन माझा पाल्तो माझ्या खांद्यावर चढवला आणि गालावर ओष्ठमुद्रा उमटवली. आमच्या निरोष्ठ्य रामायणात एवढंच ओष्ठ्य पुश्किनायन!

रशियाहून येताना मी वेगवेगळ्या रूपांत पुश्किन 'बरोबर' आणला. परतताना विमानतळाच्या 'आत' प्रवेश करताना माझा पासपोर्ट पाहिला गेला नाही. माझ्या अंगावरला 'बुरखा' किमती असूनही ती रसूलची भेट आहे हे कळल्यावर सुरक्षा अधिकाऱ्यानं मला - नव्हे रसूलला - सलाम ठोकला. सन्मानानं विमानात बसवलं.

१

पुश्किनची जीवनकथा

'अलेक्सांद्र सेर्गेयेविच पुश्किन हे नुसतं 'नाव' नव्हे : तर मानवी जीवनाची गूढ-रम्य तिळा उघडणारा 'तो मंत्र' आहे. त्याच्या मृत्यूनंतर एका रशियन टीकाकारानं म्हटलं ; ''पुश्किन हे आमचं सर्वस्व आहे.'' पण पुश्किनच्या मृत्यूपूर्वीच विख्यात साहित्यसमीक्षक विस्सारिओन बेलिन्स्की यानं लिहिलं होतं; ''मृत्यूच्या अतिक्रमणामुळं नष्ट न होणाऱ्या, पण समाज मनात सतत खुलत रहाणाऱ्या अजरामर आणि विकसनशील तत्त्वात (Phenomena) पुश्किनचा समावेश होतो.''

'' 'स्वातंत्र्य' आणि 'मानवता' या मूल्यांवर प्रेम करणारा आत्मा'' असं या तत्वाचं - म्हणजेच पुश्किनचं-स्वरूप आहे. रशियाला पुश्किनमध्ये आपला आत्मा सापडला तसाच पुश्किनला रशियात स्वत:चा आत्मा सापडला. फक्त रशियाचा आत्मा स्वातंत्र्य आणि माणुसकी यांना पारखा झाला होता, रानटीपणात गुंग होता. त्याला जाग आणण्याची गरज होती. पुश्किनला ती तीव्रतेनं जाणवली. या जाणिवेतूनच, निकोलाय गोगोलनं म्हटल्याप्रमाणं, तो त्या आत्म्यात, त्याला जाग आणण्याच्या कामात गढून गेला : अगदी बुडून गेला.

'मी स्वत:चं उभारलं स्मारक' (१८३६) या आपल्या आयुष्याच्या अखेरीस लिहिलेल्या कवितेत स्वत: पुश्किननं आत्मविश्वासानं असे उद्गार काढले आहेत :

आणि चिरकाल होईन त्यामुळं प्रिय मी जनतेला,
की सदय भावना मी वीणेनं जागवल्या,
की माझ्या निर्दय युगात गौरवलं मी स्वतंत्रतेला
आणि केलं आवाहन करुणेला दलितांविषयींच्या.*

पुश्किनच्या या उद्गारांतून त्याला स्वत:ला आणि इतरांना जाणवलेल्या त्याच्या वाङ्मयीन महात्मतेचं दर्शन घडतं. पुश्किनचा काळ हे तत्कालीन

रशियातील 'रानटी' किंवा 'निर्दययुग' होतं. त्यानं स्वत:च्या युगाला 'जिस्तेकिय वेक' असं म्हटलं. हे युग (किंवा 'शतक') त्याला जन्मभर बेचैन करीत होतं : त्या विरुद्ध बंड करायला लावत होतं. हे बंड करताना त्याच्या हातात 'तलवार' नव्हती तर 'वीणा' होती. पण वीणेनं त्यानं आपल्या निर्दय युगात सदय भावना जागवल्या; स्वतंत्रतेला गौरवलं आणि दलितांविषयीच्या करुणेला आवाहन केलं. कवी म्हणून काळानं त्याच्यावर सोपवलेलं हे उदात्त काम त्यानं वाङ्मयनिर्मितीच्या रूपानं कसं पार पाडलं हे सतत दृष्टीसमोर ठेवणं त्याच्या वाङ्मयाच्या अभ्यासात आवश्यक आहे असं मला वाटतं. त्यासाठी त्याची जीवनगाथा माहीत असणं जसं आवश्यक आहे, तसंच त्याच्या निर्दययुगाची थोडीशी तरी ओळख असणं जरुरीचं आहे. पुश्किनचं वाङ्मय हा अनेक अर्थांनी 'आत्माविष्कार' आहे. त्याच्या वाङ्मयातून स्वत: पुश्किनचा आणि रशियाचा आत्मा आविष्कृत होतो : निर्दययुगानं झाकळलेला असूनही आपलं खरंखुरं रूप देखील तो प्रकट करीत असतो.

या रानटी किंवा निर्दय युगाचं स्वरूप तरी काय होतं? पहिला अलेक्सांद्र राज्य करीत होता (१८०१ ते १८२५) आणि 'कोड्यासारखा वाटणारा त्सार' (Enigmatic Tsar) म्हणून त्यानं प्रसिद्धी मिळवली होती. एकीकडं 'युरोपचा मुक्तिदाता' (Liberator of Europe) अशी भूमिका तो वठवत होता : तर दुसरीकडं रशियन जनतेला जमीनदार-उमरावांच्या गुलामीत खितपत ठेवणारा हुकुमशहा म्हणून गाजत होता. त्याच्या काळात (१८१५ च्या सुमारास) रशियाची लोकसंख्या पंचेचाळीस लक्ष होती. त्यातील अर्धी प्रौढांची संख्या ही भूदासांची (Serfs) किंवा जमीनदारांकडील गुलामांची होती.

रशियन जीवन हे मुख्यत: ग्रामीण होतं आणि रशिया हा लहानमोठ्या जमीनजुमल्यांचा देश होता : खेड्यांचा म्हणण्यापेक्षा तुरळक वस्त्यांचा देश होता. जमीनदारांना अमर्याद हक्क होते. कुळं म्हणजे गुलाम-जणू 'मृत आत्मे' - अशी परिस्थिती होती. त्यांना गुरांढोरांहूनही वाईट रीतीनं वागवलं जाई आणि अन्याय व जुलूम यांखाली त्यांना अक्षरश: भरडलं जात होतं. कायदे होते. पण त्यांचे फायदे मिळायचे ते मालकांना. 'आंधळा न्याय' हा मालकांच्याच बाजूचा होता.

वेठबिगारी ('बार्श्यिना') आणि खंड ('आब्रोक') या पद्धती सर्रास प्रचारात होत्या. वेठबिगारी या जाचक प्रकारात कुळांची अनेक प्रकारे कुचंबणा होत असे. त्या मानानं खंड हा जरा सुसह्य प्रकार होता. पण खंड म्हणजे केवळ स्वत:च्या जमिनीतील उत्पन्नाचा ठराविक हिस्सा नसे. तर त्या कुळाच्या एकूण उत्पन्नाचा वाटा असे. तो खंड नव्हता तर 'खंडणी' होती.

जमीनदार - उमराव (परवडत नसतानाही) ख्यालीखुशालीत राहात. त्यामुळं 'इनाम गेलं, दार राहिलं' असे इनामदार त्या काळी रशियातही होते. नागरी जीवन विलासी आणि उथळ होतं, नृत्यगृहं आणि खाजगी क्रीडागृहं (ज्यांना रशियनमध्ये 'सलोन' म्हटलं जातं) गच्च भरलेली असत.

दळणवळणाची साधनं फारशी नव्हती. रस्ते खराब होते. घोडागाड्यांतून प्रवास चाले आणि टपाली मार्गावरील डाकघरं ही 'स्टेशन' (!) समजण्यात येत. डाकघरावरला पोस्टमास्तर हा स्टेशनमास्तर देखील असे ! (आपल्याकडं खेड्यातून शाळामास्तर हा पोस्टमास्तर असतो तसं !!) या स्टेशनांवर-किंवा टप्प्यांवर - प्रवाशांना घोडे मिळण्याची व्यवस्था असे.

शिक्षणाचाही आनंदच होता! तत्कालीन शिक्षणाचं वर्णन करायला 'खेळ-खंडोबा' हा शब्दही

अपुरा पडावा अशी स्थिती होती. उच्चवर्गातील बऱ्याच जणांवर फ्रेंचचा पगडा होता. तर काहींवर इंग्लिशचा प्रभाव होता. रशियनकडं दुर्लक्षच होतं. रशियन भाषा व विशेषत: रशियन लोकवाङ्मय हे उपेक्षित होतं. नागरी स्त्रियांवर रशियनची सक्ती करण्याची पाळी आली होती. या सक्तीची पुश्किननं काहीशी थट्टाच केली आहे. जरी स्त्रिया फ्रेंच बोलत - लिहीत असत (कारण ती साक्षरांची फॅशन होती!) आणि त्यांचं रशियन मोडकं तोडकं असे; तरी स्वत: पुश्किनची (स्त्रीदाक्षिण्यामुळंही असेल) त्या बाबत फारशी तक्रार नव्हती. उलट एखाद्या ललनेनं केलेली रशियन लाडिक मोडतोड त्याला आवडे. ''स्मितावाचून असलेल्या ओठांवर आपण प्रेम करीन नाही; तसंच व्याकरणाच्या चुकांवाचून असलेल्या रशियनवरही आपण प्रेम करीत नाही'' असे त्यानं म्हटलं आहे. त्यानं रशियन कवीमंडळींनाही एके ठिकाणी ठणकावलं आहे : ''अरे, तुम्ही ज्यांना चोरट्या प्रेमकविता पाठवता; त्यांना चांगलं रशियन येत नाही म्हणून एवढा घुस्सा का करता?'' सक्तीपेक्षा भक्तीनं हे साधता येईल असं पुश्किनला वाटत असावं. सक्ती हा रानटीपणाच होता.

मानापमानांतून आणि प्रेमप्रकरणांतून खेळली जाणारी 'द्वंद्वं' (Duels) हा आपल्याला आज निर्दय आणि रानटी वाटणारा तत्कालीन युद्धप्रकार त्याकाळी शिष्टमान्य होता. जीवघेणं द्वंद्व ही प्रतिष्ठेची आणि पराक्रमाची बाब मानली जात असे. द्वंद्व न करणाऱ्याला नेभळटच समजलं जात असे. द्वंद्वाचंही शास्त्र असे आणि काही 'धंदेवाईक' द्वंद्व घडवून आणत. (असा धंदेवाईक द्वंद्वलाव्या (!) 'यिव्गेनी अनेगिन' मध्ये झरेत्स्कीच्या रूपानं पुश्किननं रंगवला आहे.) स्वत: पुश्किन द्वंद्व खेळण्यात (अनेक अर्थांनी) निपुण होता. त्यानं जन्मभर द्वंद्व केलं आणि द्वंद्वातच मरण पत्करलं. पुश्किननं द्वंद्व 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या जातीचं होतं.

या निर्दय युगातील सामाजिक परिस्थिती अशी होती. या काळात राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या अशा दोन घटना घडल्या. १८१२ मधली नेपोलियनची रशियावरली स्वारी आणि त्याच्याशी झालेलं युद्ध ही पहिली घटना. त्यामुळं रशियाच्या स्वातंत्र्यप्रेमी आत्म्याला जाग आली. पण अंतर्गत गुलामी शिल्लकच राहिली. असंतोष धुमसतच होता. विशेषत: भूदास्यांवर (Serfdom) वरचेवर होणाऱ्या भूदासांच्या बंडाळ्या हा तत्कालीन सामाजिक असंतोषाचा जणू हवामान-मापक किंवा 'बॅरोमीटर' होता.

१८२५ च्या नोव्हेंबरमध्ये पहिला आलेक्सांद्र वारला. (त्यावेळी तो वारला नव्हता तर गुप्त झाला होता आणि साधूच्या वेषात गुप्तपणानं बराच काळ भटकत होता, अशीही एक दंतकथा आहे! त्याच्या 'गूढ' पणात भुलावणारी!!) त्याच्यानंतर कोण त्सार होणार हा संभ्रम निर्माण झाला. पण मदेला निकोलाय हा अखेर त्सार झाला. आणि दुसरी घटना घडली.

ती म्हणजे १४ डिसेंबर १८२५ ला झालेल्या 'दिकादिन उठावाची. (Decemberist Re-volt) रशियन सैन्यात एकतंत्री आणि जुलमीशाहीविरुद्ध विलक्षण नाराजी होती. खरं म्हणजे क्रांतीच्या विचारांचं ते एक प्रमुख केंद्र होतं. उत्तरेत आणि दक्षिणेत सैन्यानं उठाव करण्याच्या योजना बराच काळ शिजत होत्या. त्यांचाच उद्रेक पीटर्सबर्गमध्ये उठावाच्या रूपानं झाला. पण हा उठाव काही तासांचा ठरला. कारण पहिल्या निकोलयानं तोफांच्या साहाय्यानं बंडखोरांची धूळधाण केली. नंतर पाच बंडखोरांना फासावर लटकावलं आणि इतरांना तुरुंगात अगर 'सिबीर' (सैबेरियात) पाठवलं. हे बंडबार अपेशी का झाले याबद्दल लेनिननं काढलेले उद्गार असे : 'ते जनतेपासून

म्यानक दूर होते.'*

या बंडानंतर एक दशक तरी सामान्य रशियन माणूस हताश आणि विषण्ण होता: उच्च समाज मात्र निंद्य उत्साहानं माणुसकी दडपून टाकण्याची अक्षम्य घाई करीत होता; असं त्या काळचं चित्र तत्कालीन विचारवंत हेर्झेन यानं रेखाटलं आहे.

पहिला अलेक्सांद्र हा 'कोडं' होता: तर पहिला निकोलाय हा 'कोडगा' होता. 'स्मितदेखील न करणारा त्सार' असं त्याला पाहिलेल्या खुद्द व्हिक्टोरिया राणीनं त्याचं वर्णन करून ठेवलं आहे. जेव्हा राज्यकर्ते स्मितदेखील न करणारे असतील तेव्हा जनतेनं काय रडायचं? दोघेही हुकुमशहा होते आणि लेखक-कवींवर दोघांचीही बारीक नजर होती. वाङ्मयनिर्मितीवर 'सेन्सॉर' चं कडक बंधन होतं.

अनातोली लुनाचार्स्की या वाङ्मयसमीक्षकानं 'वाङ्मय आणि कला यांच्यासंबंधी' ('आ लितिरातूरे उस्कूस्त्वे') या आपल्या पुस्तकात पुश्किनच्या युगाबद्दल लिहितांना म्हटलं आहे : ''खरंच त्याहून अधिक कंटाळवाण्या युगाची कल्पना करणंही अवघड आहे. पुश्किनला त्यात 'शांती' आढळली नाही. त्यानं पुष्कळ सोसलं; परदेशी जाण्याची स्वप्नं पाहिली..... ते युग म्हणजे रशियन हिंवाळ्यातील रात्र होती. सगळं धुक्यात बुडून गेलेलं होतं. सगळीकडं रोगट जंतू पसरलेले होते : पोसले जात होते. वसंतऋतूतील सूर्याचं ओझरतं दर्शनही पुश्किनपूर्वीच्या लोकांना होत नव्हतं. स्वच्छंदी निर्झरांची झुळझूळ ऐकू येत नव्हती. त्यांची हृदयं गोठली होती. ओठ निश्चल आणि निर्जीव झाले होते आणि धुकट हवेत त्यांना फक्त अस्पष्ट पुटपुटता येत होतं .... पुश्किन म्हणजे रशियन वसंतऋतू होता : पुश्किन म्हणजे रशियन सकाळ होती.''

पुश्किनच्या रानटी किंवा निर्दय युगाची ही ओझरती ओळख आपल्यालाही बेचैन केल्यावाचून रहाणार नाही. या युगाच्या पार्श्वभूमीवर, 'आनंदाचे वसंत तुम्ही, श्रेयांचे घोस' ही ओळ ज्याला सर्वार्थानं लागू पडावी, अशा पुश्किनची रोमांचकारक जीवनकथा अधिक चांगल्या प्रकारे समजू शकेल असं मला वाटतं.

पुश्किनच्या उण्यापुऱ्या अडतीस वर्षांच्या आयुष्याकडं पाहिलं की प्रतिभावंतांच्या कपाळी अल्पायुषीपणाचा शाप लिहिणाऱ्या नियतीचं आणि काही माणसं नको तितकी जगत असतात, तर काही माणसं पाहिजे तितकी जगत नाहीत या सत्याचं कटू स्मरण होतं. १७९९ ते १८३७ या कालखंडातील पुश्किनच्या जीवनामधील त्याच काही घटनांचा मी उल्लेख करणार आहे; ज्यांचा त्याच्या भावजीवनाशी, त्याच्या वाङ्मयाशी फार जवळचा संबंध आहे.

६ जून १७९९ रोजी एका मजेशीर कुटुंबात मॉस्कोमध्ये पुश्किनचा जन्म झाला. त्याच्या आईवडिलांच्या वर्णनानं 'मजेशीर' या मी वापरलेल्या विशेषणाचा खुलासा होईल. त्याचे वडील सेर्गेयेविच ल्वोविच पुश्किन हे इतिहास प्रसिद्ध बोयारांच्या म्हणजे उमरावांच्या घराण्यातील होते. प्रथेप्रमाणं उमरावांना साजेल अशी सैन्यात नोकरी करीत होते. पण त्यांना खरा छंद होता लष्कराच्या भाकरी भाजण्याचा. म्हणून वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी ते नोकरीतून निवृत्त झाले. त्या आधी दोन वर्ष त्यांनी नद्योझ्दा ओसिपोव्ना हन्निबाल या स्त्रीशी लग्न केलं होतं. दोन मुलं पदरात असताना नोकरी सोडून देणारे हे जबाबदार गृहस्थ रिकामटेकडे पण उचापती, आळशी पण समाजसंपर्काबाबत

* *स्त्राश्न दलेकि आनी बिली, ओत् नरोद*

(ज्याला आपण सध्या Social Contact हे गोजिरवाणं नाव दिलं आहे!) उत्साही आणि कर्ज काढण्यात निष्णात असे होते. समाजसंपर्काच्या मोहिमेवर ते एकदा सकाळी घराबाहेर पडले की संध्याकाळपर्यंत घरी पोचले तर फार झालं असं वाटावं अशी त्यांना आपल्या कुटुंबाबाबत आस्था होती. त्यात दातृत्वाबाबत कर्णाचं, तसं कंजूषपणाबाबत त्यांचं नाव वाक्प्रचारवजा अजरामर व्हावं (निदान त्यांच्या कुटुंबात!) इतके ते हातानं सढळ होते!

पुश्किनची आई नद्योझ्दा ही निग्रो वंशातली, हन्निबाल कुळातली होती. पुढं ज्याच्यावर पुश्किननं 'थोर प्योत्रचा निग्रो' ही दीर्घकथा लिहिली, तो इब्राहीम हन्निबाल हा त्याचा आईकडून पणजोबा होता. आईनं निग्रो वंशाचे काही पुसट विशेष जपले होते-विशेषत: सावळ्या वर्णाच्या रूपानं. (पुश्किनकडं मात्र आनुवंशिक देणं म्हणून 'काळे कुरळे केस' आले होते: विकारांची तीव्रोत्कटता हाही त्याला लाभलेला आनुवांशिक वारसा होता असं काही अभ्यासकांचं मत आहे. नद्योझ्दा म्हणजे आशा. या आशाबाई तरी संसार नीट करतील अशी आशा कुणी केली असेल तर त्याच्या पदरी निराशाच यावी अशी त्यांची चंचल वृत्ती होती. सतत घरं बदलावीत, ते जमलं नाही तर घरातील सामानाच्या मांडणीत अदलाबदल करावी आणि संसाराकडं दुर्लक्ष करण्यात नवऱ्याची खरीखुरी 'सहधर्मिणी' ठरावी अशी पुश्किनच्या आईची धडपड असे. या कुटुंबाला मजेशीर म्हणायचं नाही तर काय म्हणायचं?

साशाला - (साशा हे पुश्किनचं घरगुती नाव) - आईवडिलांचं सुख बाळपणीच काय, तर कधीच लाभलं नाही. मुलांचे लाड करायला आईवडिलांना वेळही नव्हता आणि तो त्यांचा स्वभावही नव्हता. साशा हा लहानपणापासूनच खट्याळ आणि खोडकर होता. आईवडिलांना त्याच्याबद्दल प्रेम नव्हतं आणि आईवडिलांबद्दल त्याला प्रेम नव्हतं. उलट त्यांच्याबद्दल एकप्रकारची चीड त्याच्या मनात होती. वडील बहीण आणि धाकटा भाऊ हे आईवडिलांचे लाडके नसले तरी साशा हा मात्र त्यांचा नावडता होता एवढं खरं.

साशाच्या दोन वाईट सवयींमुळं त्याच्या आईचं नेहमी पित्त खवळायचं. त्याला एक सवय होती ती हात चोळण्याची : तळहातावर तळहात घासायची. त्याच्या या सवयीमागं आईवडिलांबद्दलची बंडखोर चीड असावी असं वाटतं. मी काही मानसशास्त्राचा विद्यार्थी नाही. पण एखाद्या कलावंताच्या 'कृती' चा उलगडा करण्यापुरतं मानसशास्त्र मला कळतं. ही सवय सुटावी म्हणून आई दिवसभर त्याचे हात पाठीशी बांधून ठेवायची.

पण पुश्किनची हातावर हात चोळण्याची सवय सुटली नाही. तर ती जन्मभर तशीच राहिली. बाळपणीची आईवडिलांपुढं हात चोळायची सवय जन्माची खोड बनली आणि पुढं मोठेपणी तो राजसत्तेपुढं हात चोळत उभा राहिला. राजसत्तेनं त्याचे हात कायमचे बांधून टाकले.

दुसरी सवयदेखील चमत्कारिक होती. ही सवय फक्त मुलांनाच असते असं नव्हे तर नवऱ्यांना सुद्धा ती असते असं बायकांचं म्हणणं. ती म्हणजे हातरुमाल हरवण्याची ! (अर्थात 'ऑथेल्लो' मधलं हातरुमाल हरवणं वेगळं. त्याचा मी इथं उल्लेख करीत नाही असं म्हणत तो उल्लेख करत आहे. पुश्किनला लहानपणी हातरुमाल हरवण्याची जी सवय होती ती मोडण्याबद्दल त्याच्या आईनं हातरुमाल त्याच्या खांद्यावर शिवून ठेवायला सुरुवात केली. हातरुमाल हरवणं त्यामुळं कमी झालं असेल. पण वस्त्रं हरवण्याची, झुगारून देण्याची दडपलेली प्रवृत्ती मोठेपणीसुद्धा वर उसळत

राहिली. जेव्हा राजाच्या प्रेमापोटी (कुणाच्या? हा प्रश्न सध्या अनुत्तरित राहू द्या!) त्याला राजकवीची नवी वस्त्रं बहाल केली तेव्हा ती नकोशी आणि अपमानास्पद वाटणारी वस्त्रं फेकून देण्याची केविलवाणी धडपड पुश्किननं जन्मभर केली. काहीवेळा काही वस्त्रं ही अंगावर वागवणं हे इतकं अवजड वाटे की, ती अंगावरून काढून टाकावीशी वाटत. पण आईप्रमाणंच राजसत्तेनं त्याला ही वस्त्रं प्रत्येक वेळी, कधी रेशमी बंधांनी तर कधी जाड्याभरड्या धाग्यांनी शिवून टाकली. फक्त ती वस्त्रं, तो सरकारी गणवेष त्याच्या अंगावरून उतरला तो त्याच्या मृत्यूनंतर !

पुश्किनचं बाळपण हे आईवडिलांच्या मायेला पारखं झालं होतं. या घटनांचा त्याच्या मानसिक घडणीवर फार मोठा परिणाम झाला हे खरंच. पण त्याचबरोबर त्याच्या घरातील वाङ्मयीन वातावरणही त्याला 'कवी' बनण्यास उपकारक ठरलं. पुश्किनचे वडील वाङ्मयप्रेमी होते: लेखक - कवींचे चाहते होते व अधूनमधून फ्रेंच कवितेशी लगट करीत आणि फ्रेंच मध्ये कविता लिहीत, तत्कालीन रशियन साहित्यिकांपैकी जुकोव्स्कीसारखा प्रसिद्ध कवीही त्यांच्या घरी हजेरी लावत असे. साशाचे काकाही बऱ्यापैकी कवी समजले जात. घरात उत्साह चांगला होता. त्यामुळं साशानं लहानपणातच विशेषत: फ्रेंच वाङ्मय भरपूर वाचलं आणि त्याच्या जोडीला घरात येणाऱ्या साहित्यिक पाहुण्यांचं वाङ्मयीन संभाषण पुष्कळ ऐकलं. त्यावेळी झालेल्या जुकोव्स्कीच्या परिचयाचं रूपांतर त्याला गुरू मानण्यात आणि त्यानं पुश्किनला जिवलग स्नेही समजण्यात झालं.

साशा बारा वर्षांचा झाला आणि आईवडिलांच्या दृष्टीनं वाया गेलेला पण 'कवी' काकाच्या मतानं कदाचित आशादायक वाटणाऱ्या या त्याच्या शिक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला. साशाचा स्वभाव बारा वर्षांच्या मुलाचा होता आणि त्याचं मन मात्र वीस वर्षांच्या तरुणाचं होतं. ही गोष्ट पुश्किनच्या जगण्यात फार महत्त्वाची आहे असं मला वाटतं.

त्याचवेळी पहिल्या आलेक्सांद्रने 'त्सार्स्कोये सेलो' मध्ये एक नवी शाळा-जिला 'लित्सेय' म्हणत - उघडली होती. काकानं पुढाकार घेउन त्या 'लित्सेय' मध्ये साशाला १८११ मध्ये दाखल केलं. १८११ ते १८१७ हा त्याच्या जीवनाचा काळ म्हणजे कवी पुश्किनच्या घडणीचा काळ होता. या काळात त्याने विपुल काव्यलेखन केलं आणि जीवन म्हणजे काय ते जाणलं : अनुभवलं. या काळातील काही घटनांचा त्याच्या कविमनावर खोल ठसा उमटला आणि काही घटनांतून त्यांचं मन स्वच्छ दिसू लागलं.

'त्सार्स्कोए सेलो' हे त्सारचं वर्षातून काही काळ वास्तव्य असायचं ठिकाण. तिथल्या राजवाड्याच्या एका भागात ही नवी शाळा होती. त्यामुळं पुश्किनला लहानपणापासून पहिला आलेक्सांद्र जवळून पाहता आला, आणि त्सारलापण नंतरचा हा श्रेष्ठ कवी वाढाळू वयातच माहीत झाला.

१८१२ मध्ये नेपोलियनची स्वारी आणि युद्ध या घटना घडल्या. शाळेजवळच लष्करी छावणी आणि सैन्याचा येण्याजाण्याचा मार्ग असल्याने सबंध रशियाला थरारून टाकणाऱ्या या ऐतिहासिक घटनेचा 'बालकवी' साशावर पुसून न जाणारा प्रभाव पडला. देशभर पेटून उठलेली स्वातंत्र्य प्रीतीची ज्वाला या बालमनातही प्रज्वलित झाली.

लष्करी छावणीतील हुशार अधिकाऱ्यांशी पुश्किनचा परिचय झाला. नेपोलियनच्या पराभवानंतर त्सारशाहीनं पुन्हा लादलेल्या गुलामगिरीबद्दल या अधिकाऱ्यांत तीव्र असमाधान होतं.

विशेषत: चादायेवसारख्या अधिकाऱ्यांशी या काळात झालेल्या ओळखीनं - (पुढं त्यांच्याशी पुश्किनचा जन्माचा स्नेह जुळला) - त्याच्या मनात क्रांतींची बीजं पेरली गेली. आणि त्सारकडं पाहण्याची त्याची दृष्टी बदलली. राजसत्तेविषयी किंवा त्सारविषयी उपरोधानं बोलणं हे त्याला कसं सहज जमू लागलं याविषयीची एक आख्यायिका सांगतो.

आपली नवी शाळा कशी काय चालली आहे हे पाहायला म्हणून पहिल्या आलेक्सांद्रने शाळेत एकदा चक्कर टाकली. पुश्किनच्या वर्गात पाऊल टाकल्यावर, 'पहिला' असलेल्या या आलेक्सांद्रने-रशियाच्या एकतंत्री त्सारने-मुलांना प्रश्न विचारला: ''या वर्गात पहिला कोण आहे?'' दुसऱ्या अलेक्सांद्रने (म्हणजे पुश्किन नावाच्या चुणचुणीत पोरानं) तत्काळ उत्तर दिलं : ''महाराज, इथं 'पहिला' कुणीच नाही. इथं सगळे 'दुसरे' आहेत.!'' आपली नवी शाळा अशी चालली आहे हे पाहून अलेक्सांद्रला धक्का तर बसलाच असेल, पण पुढे पुश्किनने त्याच्यावर जेव्हा जेव्हा उपरोधाचे शस्त्र उघडपणानं, कधीच चाटूक्तींच्या तर कधी विडंबनकाव्यांच्या रूपानं, चालवलं तेव्हा तेव्हा शाळकरी पुश्किनच्या त्या चपखल उत्तराचं स्मरण त्याला निश्चित झालं असेल!

चादायेवसारख्या लष्करी अधिकाऱ्यानं पुश्किनमध्ये स्वातंत्र्य प्रीती जागवली: तर कावेरीनसारख्या रंगेल 'अधिकारी' मित्रानं त्याच्या मनामध्ये स्त्रीप्रीती चेतवली. अंगावर अजून शाळेचा गणवेश असतानाच लष्करी छावणीतील स्वच्छंदी जीवनाशी एकरूप होऊन त्यानं त्या वयातही 'पुरुषीसुखं' चाखली. (लहानपणीच वीस वर्षांच्या तरुणाचं मन जवळ असलेल्या साशाचं या वर्तनाचं आश्चर्य वाटू नये.) आणि त्यानंतर त्याच्या प्रेमप्रकरणांना (Escapades) प्रारंभ झाला. पुश्किनची एकंदरच प्रेमप्रकरणं मोठी रसाळ असली, चविष्टपणानं ती सांगणं आणि ऐकणं किंवा वाचणं मोठं सुखावह असलं तरी मी ती सगळी प्रकरणं (या भानगडी नव्हेत!) सांगणार नाही. आपल्या कुतूहलाबद्दल आदर बाळगून काही सांगतो.

पुश्किनच्या 'लित्सेय' चे प्राचार्य हा फार भला माणूस होता. आपल्या पाल्यांबद्दल (शाळेतल्या साध्यासुध्या हसऱ्या पोरांसाठी 'पाल्य' हा गंभीर आणि जडजंबाल शब्द का वापरला जातो हे माझं मलाच अजून कळलेलं नाही!) त्याला अगदी पितृतुल्य प्रेम वाटे. घरदार सोडून इतक्या दूर असलेल्या या निष्पाप बालकांना कौटुंबिक वातावरण मिळावं म्हणून त्यांना तो आपल्या कुटुंबात मिसळण्याची संधी देत असे. एवढंच नव्हे तर त्या काळातही तो इतक्या आधुनिक विचारांचा होता की, तारुण्याच्या उंबरठ्यावर पाऊल टाकणाऱ्या या एकाकी पोरांना 'स्त्री' या प्राण्याचं विकृत कुतूहल वाटू नये, त्या कुतूहलापोटी त्यांच्या हातून भलतंसलतं घडू नये असाही उदार विचार हे करण्यामागे होता.

परंतु प्राचार्यांचा हा विशुद्ध हेतू या निष्पाप आणि स्वातंत्र्यप्रिय मुलांना नीटसा उमगला नसावा: कदाचित उमजलाही असावा! या प्राचार्यांच्या कुटुंबात एक सुंदर विधवा रहात होती. कावेरीनसारख्यांच्या रंगेल छावणीत धीट असलेल्या पुश्किननं प्राचार्यांच्या उदार मतवादी धोरणानं उत्तेजित होऊन (त्या विधवेच्या सौंदर्यानं देखील !) तिला एक चक्क प्रेमकविता लिहून पाठवली. तिला पुश्किनचं हे काव्यात्मक धाडस काही आवडलं नाही: किंवा आवडून देखील ते न आवडल्याचं तिनं दाखवलं. आणि पुश्किनच्या प्राचार्यांकडे म्हणजे स्वत:च्या कुटुंबप्रमुखांकडं - त्याबद्दल तिनं तक्रार नेली. ते पडले पितृतुल्य प्राचार्य! त्यांनी 'पाल्या' ची बाजू घेऊन प्रकरण मिटवलं. पण आणखी एक प्रकरण सांगण्यासारखं आहे.

'त्सार्स्कोये सेलो' मधील राजवाड्यांच्या एका भागात पुश्किनची शाळा होती. आणि दुसऱ्या भागात त्सार आपल्या परिवारासह रहात असे. त्य ाभागात आणि बागात शाळकरी पोरांचा संधी साधून चोरटा पण 'मुक्त' संचार चालू असे. त्सारच्या परिवारात एक प्रिन्सेस होती आणि तिची नाताशा नावाची एक तरुण नोकराणी होती. प्राचार्यांची उदार आणि आधुनिक दृष्टी लाभलेल्या या मुलांची तिच्याशी कमी अधिक सलगी जमली होती. या सलगीत पुश्किनही अर्थातच मागं नव्हता.

एकदा संध्याकाळच्या वेळी सहज अगदी निरागसपणानं - 'त्या' भागातील व्हरांड्यातून एकटाच जात असताना (दुर्दैवानं पुश्किन तिकडून एकटाच जायचा) पुश्किनला अंधारात पदराची सळसळ ऐकू आली. पदरचा 'पदर' (हा शब्द) वापरल्याबद्दल माफ करा! तिकडच्या वस्त्रांना 'पदर' नसतो: 'घोळ' असतो. कुणाच्या तरी वस्त्रांचा 'घोळ' सळसळला आणि 'घोळ' झाला.

बिचाऱ्या पुश्किनला वाटलं 'नताशाच चालली आहे.' त्यानं तिला कवटाळून तिचं चुंबन घेण्याचा प्रयत्न केला. एवढ्यात व्हरांड्याशेजारच्या खोलीचं दार उघडलं आणि प्रकाश पडला. प्रकाश चांगलाच पडला आणि पुश्किनला दिसलं की ती नताशा नव्हती : ती खुद्द प्रिन्सेस होती!

पुश्किन बावरला आणि तेथून पळत सुटला. खोलीवर आल्यानंतर त्यानं मित्राला काय झालं ते सांगितलं. प्रिन्सेसची छेड काढण्याचा त्याचा बिलकुल इरादा नव्हता. म्हणून झाल्या प्रकाराबद्दल प्रिन्सेसला क्षमा याचनेचं पत्र पाठवण्याचा निर्णय त्यानं मित्रापाशी बोलून दाखविला. प्रांजळपणा हा पुश्किनचा स्वभावविशेष होता.

प्राचार्यांना हा त्याचा निर्णयही कळला आणि झालेला प्रकारही समजला. स्वत: त्सारने याबद्दल प्राचार्यांकडे तक्रार केली : ''तुमची मुलं आता फारच पुढं गेली आहेत. इतके दिवस ती माझ्या बागातील फळांनाच हात लावत होती. आता त्यांचा हात माझ्या परिवारापर्यंत पोचला आहे. जरा त्यांना आवरा. '' प्रिन्सेसने त्सारकडे तक्रार नेणं हे जितकं स्वाभाविक होतं तितकच पितृतुल्य प्राचार्यांनी पुश्किनच्या चुकीवर पांघरूण घालणं हेही स्वाभाविक होतं. त्यांनी त्सारला सांगितलं; ''त्याचं चुकलं खरं. पण हे 'चुकून' झालं. आणि तो इतका सरळ मुलगा आहे की तो प्रिन्सेसला क्षमा याचनेचं पत्र लिहिणार आहे. तो पुन्हा असं करणार नाही. ''

पहिला आलेक्सांद्र म्हणाला : ''ठीक आहे, पण पत्रबित्र लिहू नकोस म्हणून त्याला सांगा. त्याची काही गरज नाही. आणि त्याचं काय आहे.'' कोड्यासारखा वाटणारा हा त्सार त्यांना कोड्यात टाकत कुजबुजला : ''तुमच्या माझ्यात म्हणून सांगतो .... प्रिन्सेसनं माझ्याकडे वरकरणी तक्रार केली असली तरी मनातून तिला या तरुण पोराचं धाडस आवडलं आहे.! शिवाय मी स्वत: त्याची बाजू घेईन. ''

''शिवाय मी स्वत: त्याची बाजू घेईन. '' या वाक्यातील त्यावेळचा आश्रयदाता सूर नियतीनं पुढंही त्याच्या आणि पहिल्या निकोलायच्या कंठातून उमटवला. पुश्किनच्या नंतरच्या लेखनाबद्दल पहिला आलेक्सांद्रने काय किंवा पहिल्या निकोलायने काय, घेतलेली दिखाऊ सहानभूतीची भूमिका आणि ''मी तुझं लिखाण स्वत: सेन्सॉर करतो : पाहतो'' असं म्हणत पुश्किनवर लादलेलं आश्रितपण हे त्या प्रसंगीच्या सुराशी सुसंगत आहे. म्हणूनही पुश्किनचं हे प्रेम प्रकरण मला महत्त्वाचं वाटतं.

शालेय जीवनात पुश्किनची प्रीती (सौंदर्यप्रीती असंही म्हणता येईल) अशीच चेतवली गेली आणि तिच्यातून त्याची प्रेमकविता जन्माला आली. शाळकरी पुश्किननं लिहिलेली ही कविता

'शाळकरी' मात्र नव्हती. त्याच्या भावी काव्याची ती 'प्रसादचिन्हं' होती. शाळेत असतानाच त्याच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या होत्या. आणि एका परीक्षेच्या प्रसंगी त्यानं सादर केलेलं काव्य ऐकून दिर्जावीन सारख्या ज्येष्ठ कवीचं हृदय हेलावलं होतं. आणि डोळ्यांत आनंदाश्रू तरळत असताना त्यानं पुश्किनच्या भावी यशाविषयीचं भविष्य वर्तवलं होतं. काव्याच्या नादामुळं आणि नादिष्टपणामुळं इतर शालेय विषयांकडं पुश्किनचं दुर्लक्ष होत होतं. इतर कवी मंडळींप्रमाणेच (आपल्याकडल्या गडकऱ्यांचं उदाहरण आपल्याला आठवेल) पुश्किनला गणिताबद्दल कमालीची नावड होती. एकदा गणिताच्या तासाच्या वेळी त्याला एक उदाहरण सोडवायला त्याच्या शिक्षकांनी सांगितलं. पुश्किननं एका क्षणात उत्तर सांगितलं ; ''शून्य.'' शिक्षक म्हणाले, ''तुला माझ्या तासाच्या वेळी फक्त 'शून्य' सुचतं.'' 'शून्यलब्धी' किंवा 'शून्यसंपादन' ही गणितात नसली तरी जीवनात मात्र फार मोलाची गोष्ट असते, हे गुरूला माहीत नसावं, शिष्याला मात्र ते माहीत असावं. पुस्तकातलं गणित सोडवण्यात पुश्किनला स्वारस्य नव्हतं कारण त्याला जीवनाचं गणित सोडवायचं होतं, गणिती जीवनात त्याला रस नव्हता. त्यामुळं शेवटच्या परीक्षेत तो चमकला नाही. जून १८१७ मध्ये उत्तीर्ण होऊन शाळेतून तो बाहेर पडला.

त्यानंतर त्याला पीटर्सबर्गमध्ये परराष्ट्र कचेरीत नोकरी मिळाली. पगारी पण बिनकामाची अशी ती नावाला नोकरी होती. साहजिकच त्याच्या स्वच्छंदी जीवनाला बहर आला. Green Lamp या नावानं (कु) प्रसिद्ध असलेल्या मित्र'मंडळात' तो सामील झाला. आणि 'A Martyr to Sensual Love हे बिरूद प्राप्त करून देणारं 'मुक्त' जीवन जगू लागला. या 'मंडळा' चं नाव जरी ' Green Lamp असं असलं, मंडळींच्या हिरवटपणामुळं 'हिरवा दिवा' हे नाव अन्वर्थक ठरत असलं, तरी अनेकांना तो 'लाल कंदील' वाटत असावा.

पण हे रंगेल जीवन जगत असताना त्याच्या मनात पेरल्या गेलेल्या क्रांतीच्या बीजांना चाटूक्तींचे, विडंबनांचे आणि स्वातंत्र्यस्तोत्रांचे धुमारे फुटत होते. 'ललनांच्या ओठी स्मित चमकावणारी' चमकदार आणि चटकदार सुभाषितं (किंवा 'चाटूक्ती') तो आधीपासूनच लिहीत होता. पण १८१७ मध्ये 'स्वातंत्र्य' ('वोल्नोस्त') या नावाचं स्वतंत्रतेचं स्तोत्र त्यानं जे गायलं त्यात गुलामांना आणि दलितांना एक होऊन हुकुमशाहीविरुद्ध बंड करण्याची जोरकस चिथावणी होती. पाठोपाठ पहिल्या आलेक्सांद्रवर 'कहाण्या' (स्काझ्की) हे विडंबन काव्य १८१८ मध्ये त्यानं लिहिलं होतं. त्याच्या या कविता प्रत्येक रशियनाच्या जिभेवर नाचत होत्या; त्यांच्या हजारो प्रती हातोहात वाटल्या जात होत्या. त्यांनी निर्माण होणारा प्रक्षोभ राजसत्तेच्या नजरेस येत असतानाच १८२० मध्ये पुश्किनची 'रुस्लान आणि ल्युद्मिला' ('रूस्लान ई ल्युद्मिला') ही दीर्घ कविता प्रसिद्ध झाली, आणि त्याचवेळी पुश्किनची दक्षिणेत बदली करण्यात आली. ती 'बदली' नव्हती. तो त्सारनं घेतलेला 'बदला' होता. बदली हे त्याच्या प्रच्छन्न हद्दपारीचं गोंडस नाव होतं. आणि त्यामुळे पुश्किन हा किशिन्योव इथे आला.

तिथल्या दोन वर्षांच्या वास्तव्यात आपल्या काही मित्रांबरोबर त्यानं उत्तर काफ्काझमध्ये भटकंती केली. क्रिमियाच्या वेधक दक्षिण किनाऱ्यांवरील त्यांच्या जमीनजुमल्यांवर कित्येक 'उन्हेरी आठवडे' घालवले. 'कीव' जवळच्या एका शेतीवाडीवर मजेत (?) काही काळ काढला. तिथेच नंतरच्या 'दिकाब्रिस्त' उठावातील काही नेत्यांशी त्याचा संबंध आला. शँपेनच्या मेजवान्या,

प्रजाप्रभुत्वाच्या चर्चा आणि सुंदर ललनांचा सहवास यांमध्ये त्याला विरंगुळा लाभला : ही 'नवी स्थिती' सुखद वाटली. पण नंतर मात्र या भूमध्य समुद्राच्या जगात त्याला करमेना. 'आपण म्हणजे रानटी माणसांत हरवून गेलेला दुसरा ओवीद (Ovid) कवी आहोत.' असे त्याला वाटू लागलं. कंटाळवाणेपणा आणि दारिद्र्य, नागरी करमणुकींचा अभाव आणि बौद्धिक संगतींची उणीव यामुळं तो विषण्ण झाला, हद्दपारीच्या अवजड ओझ्याखाली तो पुरता गुदमरला आणि आपल्या 'बळी' घेणाऱ्या जुलमी राजवटीविरुद्ध कडवट भावना सतत त्याच्या मनात धुमसू लागली.

१८२३ मध्ये ओदेस्सा इथं त्याची बदली झाली. त्यानं 'सुटका' झालेली नसताना देखील सुटकेचा नि:श्वास टाकला. गजबजलेल्या आणि बहुरंगी अशा त्या बंदरात उदास आणि मळकट अशा किशीन्योवच्या तुलनेनं त्याला जरा बरं वाटलं. काही काळ त्यानं तिथला 'सूर्य' आणि 'समुद्र' भोगला. इटालियन संगीतिका आणि नाटकं पाहिली. पण 'घुसमटून' टाकणाऱ्या आशियाच्या तुरुंगा' बद्दल लवकरच तक्रार करीत तो पळून जाण्याचे बेत करू लागला.

त्यास कारकुनाप्रमाणे अपमानास्पद वागणूक मिळू लागल्याने त्याचे वरिष्ठांशी खटके उडत होते. वास्तविक तो कारकून नव्हता; 'व्यावसायिक लेखक' होता. त्याला वार्षिक सातशे रूबल्सचा पगार होता. खरं म्हणजे हा सरकारी नोकरांचा पगार नव्हता : तर तो 'गुन्हेगाराचा भत्ता' होता. म्हणून पुश्किननं राजीनामा दिला. सरकारी 'वस्त्र' झुगारून देण्याचा हा प्रकार होता.

पुश्किनचा वरिष्ठ कौंट वोरोन्तझोव हा त्याची हकालपट्टी करायच्या प्रयत्नात होताच. त्यामागे मत्सर होता. कारण पुश्किन हा कौंटेसच्या प्रेमात पडला होता. त्याचा काटा काढण्याची संधी कौंटला त्याच्या राजीनाम्यामुळं मिळालीच. शिवाय पुश्किननं शुद्ध एकेश्वरी वादाचे धडे एका बहिऱ्या इंग्रजाकडून घेतले या गुन्ह्याची भर पडली.

पुश्किनची नोकरीतून हकालपट्टी झाली आणि त्याला मिखाइलोव्स्कोये येथील त्याच्या आईच्या शेतीवाडीवर पोलिसांच्या नजरकैदेत राहण्याची आज्ञा झाली. प्रच्छन्न हद्दपारीचं आता उघड उघड हद्दपारीत - नव्हे, नजरकैदेत - रूपांतर झालं. ऑगस्ट १८२४ मध्ये त्यानं आदेस्सा सोडलं आणि मिखाइलोव्स्कोये मधील आपल्या कुटुंबात पाऊल टाकलं.

त्याचं पुनरागमन हे त्याच्या आई वडिलांना 'उधळ्या मुलाचं आगमन' (Return of the prodigal son) वाटलं असावं. हेरगिरीत, पत्र फोडण्यात आणि 'नजर' ठेवण्यात वडिलांनी अधिकाऱ्यांना साहाय्य केलं. साहजिकच 'शक्तिप्रयोगा' चे प्रसंग घरात घडू लागले. एकदा तर बापाने आपल्यावर आलेक्सांद्रने हात उगारला असा आरोप केला. अखेर वडिलांनी इतर कुटुंबियांसह स्थलांतर केलं आणि मुलाचा 'मार्ग' मोकळा केला.

पुश्किन जुन्यापुराण्या ओंगळवाण्या लहानशा घरात राहिला. संगत होती ती फक्त नोकरांची. विशेषत: म्हाताऱ्या 'न्यान्या' ची : दाईची. हिवाळ्यातल्या संध्याकाळी ती त्याला लोककथा सांगायची. त्याला पारखं झालेलं आईचं प्रेम द्यायची. हा स्वत:च्या घरात पाहुण्यासारखा रहायचा. जमीनजुमल्याच्या बाबीत रस घ्यायचा नाही. भटकायचा. घोड्यांवरून दौडायचा. जत्रांना जायचा. स्थानिक मठाबाहेरच्या भिकाऱ्यांची आध्यात्मिक गाणी ऐकायचा आणि उच्चभ्रूंना टाळायचा. फक्त शेजारच्या शेतीवाडीवरील कुटुंबाला भेट द्यायचा. तिथं घरभरून स्त्रिया होत्या. तिथल्या यजमानीण बाईबरोबर 'विस्त' खेळायचा आणि 'विस्तवा' शी पण खेळायचा. म्हणजे, तिच्या एका पोरीची

थट्टामस्करी करायचा, दुसऱ्या पोरीशी प्रेमाचे चाळे करायचा. खुद्द आई आणि थोरली मुलगी या त्याच्या प्रेमात पडल्या आणि त्याच्यावरून एकमेकींशी भांडू लागल्या.

याच काळात तो नात्यातल्या एका विवाहित मुलीकडं आकृष्ट झाला होता आणि एका सर्फच्या मुलीशी संबंध येऊन ती अपत्यवती झाल्याचा प्रवादही उठला होता. पण कधी नव्हे तो आणि तितका लिहायला-वाचायला त्याला निवांतपणा मिळाला. विशेषत: त्यानं रशियन इतिहास वाचला आणि लिहिलंही पुष्कळ.

मिखाइलोव्स्कोयेमधील ही गावठी कैद त्याला साधीसुधी सुख देऊ शकली. तरीही ते सुंदर ठिकाण हा 'तुरुंग'च होता. त्याचे तिथले दिवस हे 'साखळबंद दिवस' च होते. पळून जाण्याच्या विचारांनी त्याला पुन्हा पछाडून टाकलं. पश्चिम युरोपात राहावं, ग्रीसला किंवा अमेरिकेला जावं असं त्याला वाटू लागलं. त्यांनी त्सारकडं परदेशी जाण्याची परवानगी मागितली : त्याला विनवणी केली. तेव्हा शेजारच्या प्स्कोव या शहराला भेट देण्याची परवानगी मात्र त्याला दिली गेली.

एवढ्यात नोव्हेंबर १८२५ मध्ये पहिला आलेक्सांद्र मृत्यू पावला, पहिला निकोलाय त्सार झाला आणि १४ डिसेंबर १८२५ रोजी 'दिकाब्रिस्त' उठाव झाला. इकडं 'ग्राफनुलिन' ची पक्की प्रत करण्यात पुश्किन मग्न होता. बंडखोरांकडं त्याच्या क्रांतिकारक कवितांची हस्तलिखितं सापडली होती. तरी सरकारनं दुर्लक्ष केलं आणि पुश्किन 'यिव्गेनी अनेगिन' वर काम करीत राहिला.

मे १८२६ मध्ये नव्या त्सारकडे मॉस्को आगर पीटर्सबर्गमध्ये राहण्याची किंवा परदेशी जाण्याची परवानगी पुश्किननं मागितली. आजवरच्या बंडांचा आणि उठावांचा इतिहास (इतिश्री सुद्धा) ध्यानी घेऊन अस्तित्वात असलेली 'व्यवस्था' (खरं म्हणजे - 'अव्यवस्था'!) आवश्यक आहेत असं त्याला वाटू लागलं होतं. त्सारनं मागितलेली परवानगी दिली तर रशियात राहण्याची आपली इच्छा नाही हे कळवताना त्यांनी मित्राला लिहिलं, ''आपण उदास युगात जगत आहोत. पण जेव्हा मी लंडन, रेल्वे, आगबोटी, इंग्लिश नियतकालिकं किंवा पॅरिसमधील नाट्यगृहं आणि वेश्यागृहं यांचं चित्र स्वत:पुढं रेखाटतो, तेव्हा माझं शापित मिखाइलोव्स्कोये मला कंटाळा आणि संताप आणतं.''

सप्टेंबर १८२६ मध्ये पुश्किनला मॉस्कोला न्यायला प्स्कोवमध्ये सरकारी गाडी हजर झाली. त्याची हद्दपारी किंवा कैद संपुष्टात आली होती आणि त्सारकडून त्याला भेटीचं निमंत्रण आलं होतं.

त्सारची व पुश्किनची भेट झाली. निकोलायनं त्याचा 'दिकाब्रिस्त' उठावाशी काय संबंध होता हे विचारल्यावर पुश्किननं प्रांजल उत्तर दिलं : ''मी त्यावेळी पीटर्सबर्गमध्ये असतो तर उठावात भाग घेतला असता.'' निकोलायशी जुळणारा (पण क्षणिक) कोडगेपणा आणून पुश्किननं राजनिष्ठ राहण्याचं त्याला आश्वासन पण दिलं. भेटीनंतर त्सारनं आपल्या दरबाऱ्यांना त्याची 'नवा पुश्किन' म्हणून ओळख करून दिली.

'नवा पुश्किन' या शब्दात पुश्किनची ओळख करून द्यावी असं त्सारला का वाटलं? त्याच्याशी इमानी राहण्याचं पुश्किननं वचन दिलं म्हणून? खरंच 'राजनिष्ठ' राहण्याचं वचन पुश्किननं दिलं असेल काय? दिलं असेल तर ती शरणागती होती की तडजोड होती? ती एक 'चाल' होती! त्याचं वचन ही देखील पुश्किनची 'वक्रोक्ती' असण्याची शक्यता आहे असं मला वाटतं.

त्याच्या विनंतीवरून पुश्किननं 'लोकाभिमुख शिक्षणा'वर एक निबंध लिहिला. त्यात बंडखोरांशी सहमत असणारे लोक आता शुद्धीवर आले आहेत. बंडात नष्ट झालेल्यांचे नातेवाईक आणि मित्र यांनी त्सारला शिक्षेबद्दल मनोमनी क्षमा केली आहे; असं त्यानं म्हटलं. पण त्या निबंधाच्या मूळ हस्तलिखितामध्ये समासात त्यानं फाशीचा तक्ता व त्यावर लटकावलेल्या पाच जणांची दोन चित्रं रेखाटली. तशीच उठावाबद्दलची आपली खरीखुरी भावना त्या काळच्या एका कवितेत व्यक्त केली आणि ही कविता एका 'दिकाब्रिस्त' च्या पत्नीबरोबर सिबीरमधील हद्दपारांकडं पाठवली. पुश्किनची ही 'कृती' त्याच्यातील 'बदला' संबंधीच्या प्रश्नांना उत्तर देणारी आहे.

पुश्किन बदलत चालला नव्हता असं नाही; पण त्याच्यातील बदल हा 'जुना पुश्किन' नामशेष झाल्याचा द्योतक नव्हता. त्सारशी झालेली भेट आणि हद्दपारीची अखेर या घटनांनी त्याच्या जीवनाला आणि मनाला काहीसं वेगळं वळण लावलं हे खरं. त्यानंतर काही काळ तो मॉस्कोत राहिला. कीर्तीच्या उत्तुंग शिखरावर विराजमान झाला. स्तुतिपाठक अशा उच्चभ्रू स्त्रियांच्या घोळक्यात रमला : पुन्हा स्वच्छंदी जीवन जगू लागला. त्याचाही कंटाळा येऊन, कवी म्हणून आपली 'द्रष्ट्या'ची भूमिका आहे हे जाणवून, १८२३ मध्ये पीटर्सबर्गला जाऊन एका गलिच्छ हॉटेलात राहिला.

रंगेल आणि हद्दपार पुश्किनच्या जीवनमार्गावरील या वळणावरून मागं वळून पाहताना 'हद्दपार' म्हणून त्याच्यातील स्वातंत्र्यप्रेमीनं कोणत्या व किती यातना सोसल्या याचं स्पष्ट दर्शन कदाचित होणार नाही. कारण मदिरा आणि मदिराक्षी-विशेषत: मदिराक्षीच-यांचं या 'रंगेल' पुश्किनला विलक्षण आकर्षण होतं एवढाच दाट ठसा मनावर उमटणं स्वाभाविक आहे. त्यामुळं त्याच्या काळात त्याचं वर्णन 'डॉन वॉन' असं केलं जाई. ते चुकीचंही नव्हतं. स्वत: पुश्किननं आपण कुणाकुणांवर प्रेम केलं त्यांची नावनिशीवार यादी दिली आहे. ती 'डॉन वॉन लिस्ट' म्हणून प्रसिद्ध आहे. तिच्यात त्यानं ११३ नावं दिली आहेत. (पत्ते दिलेले नाहीत आणि ते दिले असते तरी त्यांचा आज पत्ता लागला नसताच!) ११३ हा आकडा तसा फारसा मोठा नाही! पावित्र्यविडंबन करण्याची माझी बिलकूल इच्छा नाही. पण सोळाहजार एकशेआठ या आकड्याच्या तुलनेत हा आकडा फारच चिल्लर आहे. या ११३ नावांची विभागणी त्यानं 'Serious Loves' आणि ' Light Loves' अशा दोन गटांत केलेली आहे.

सुंदर स्त्रियांचं पुश्किनला वाटणारं आकर्षण हे त्याच्या 'रोमँटिक', सौंदर्यप्रेमी आणि स्वच्छंदी व्यक्तिमत्त्वाचं एक प्रमुख आणि अविभाज्य अंग होतं. स्त्रीबद्दलची ओढ हा त्याचा 'स्वभाव' होता. ज्या ज्या स्त्रीच्या सहवासात तो आला आणि जिचं जिचं त्याला आकर्षण वाटलं ; ती स्त्री आणि ते आकर्षण प्रत्येक वेळी प्रकट करीत असे : त्याचं कवी म्हणून वेगळं रूप प्रकट करायला प्रेरक ठरत असे. या आकर्षणाची जात वेगळी होती. तो एखाद्या सामान्य माणसाचा स्त्रीलंपटपणा नव्हता: तर एका प्रतिभावंत कवीला 'स्त्री' समजून घेण्यासाठी, 'स्त्री' त पुरतं बुडून आणि गढून जाऊन चैतन्याचा आणि सौंदर्याचा मूलस्रोत जाणण्यासाठी वाटणारं आकर्षण होतं.

कदाचित पुश्किनचं मी समर्थन करीत आहे असं आपल्याला वाटेल. पण पुश्किन आणि त्याचं या आकर्षणातून उपजलेलं काव्य स्वत:च स्वत:चं समर्थन करायला समर्थ आहे. स्त्रीप्रेमाच्या ज्वालांत पुश्किन जळत होता. बोरकरांच्या भाषेत सांगायचं तर, 'विळख्याविळख्यांतून आलापित ज्वालांची गीते' हे त्याच्या बाबतही खरंच होतं. गुलामगिरीच्या आणि हद्दपारीच्या यातनांत जळत असताना

पुश्किन प्रेमाच्या ज्वालांतही जळत होता. आणि बोरकरांप्रमाणंच अनुभवत होता:

जळण्यांतहि सुख आहे ज्वालांतून फुलण्याचे
ढळण्यांतहि गुज आहे अंतिम हित कळण्याचे

नुसता पुश्किन नव्हे, तर पुश्किनचा प्रज्वलित आत्मा प्रेमाच्या दाहक अग्नीत जळत होता आणि जळताजळता उजळत होता. त्या आत्म्याला चिकटलेलं 'हीणं' भस्मसात होत होतं : शुद्ध 'सुवर्ण' त्या अग्निदिव्यातून पार पडत होतं. पुश्किननं स्त्रियांच्या प्रेमात पडणं हे जर 'ढळणं' असेल, तर ते ढळता ढळता अंतिम हिताचं गुज 'कळणं' होतं म्हणूनच त्याच्या अमर स्त्रीप्रीतीवर 'पाप-पुण्याचा शिक्का' मारायचं आपल्यासारख्या मर्त्य माणसांना काहीही कारण नाही.

त्याच्या या प्रेमप्रकरणांतून, रंगेलपणातून त्याची कविता स्फुरत होती: त्याची प्रतिभा साकारत होती. एकदोन गंमतीची उदाहरणे सांगतो.

मिखाइलोव्स्कोयेमधील हद्दपारीच्या काळात शेजारच्या त्रिगोर्स्कोये या खेड्यातील प्रस्कोव्या ओसिपोवा नावाच्या श्रीमंत आणि वयस्क स्त्रीशी पुश्किनची 'मैत्री' जमली. त्या कुटुंबातीलं पुश्किनचं जाणंयेणं बरंच वाढलं. आणि या बाईची 'झिझी' नावाची एक पंधरा वर्षांची पोर होती तिची पुश्किनला फार ओढ वाटू लागली. 'पुन्श' नावाचं मद्य तयार करण्यात ती तरबेज होतीच : शिवाय स्वत:च मादक होती. संस्कृत कवींच्या भाषेत बोलायचं तर तिची 'सिंहकटी' किंवा उर्दू शायरांच्या शब्दांत तिची 'पतली कमर' पुश्किनला फार आवडायची. या आवडीचं पर्यवसान फार मजेशीर गोष्टीत झालं!

एकदा झिझीच्या कमरपट्ट्यानं पुश्किननं आपली कमर मोजली आणि त्याला दोघांच्या कमरेचं माप एकच असल्याचा (कदाचित आर्किमिदीजच्या आनंदालाही मागं सारणारा) अद्‍भुत शोध लागला. या शोधाबद्दल पुश्किननं त्याचा भाऊ 'लेव' याला पत्रातून कळवलं : ''एक तर माझी कमर पंधरा वर्षांच्या पोरीची आहे; नाहीतर तिची कमर पंचविशीतल्या पुरुषाची आहे.'' (पुश्किन त्यावेळी 'पंचविशी'त होता हे स्पष्टच होतं.) 'उमर' आणि 'कमर' यांसारखं 'यमक' जमवण्याचा कुणा 'कवड्या' चा हा प्रयत्न नव्हता; तर 'आत्म्याचं तर्कशास्त्र'(Dialectics of the soul) तो जसा जाणत होता, तसंच शरीराचं तर्कशास्त्र (तेही स्त्रीच्या!) देखील जाणत होता याचं हे 'गमक' आहे.

पुढं 'यिव्गेनी अनेगिन' मध्ये तत्त्यानाच्या घरातील मेजवानीच्या प्रसंगी खाद्यपदार्थांमागून मद्य कसं आलं त्याचं वर्णन करताना पुश्किननं लिहिलं :

त्यामागून रांग पेल्यांची अरूंद, उभार
कमरेसारख्या तुझ्या,
झिझी, तू स्फटिक आत्म्याचा माझ्या,
विषय माझ्या पद्यांचा निरागस अपार,
उन्मादक पेला प्रेमाचा,
ज्यामुळं धुंद व्हायचा!

स्त्रीविषयीच्या आकर्षणातून , 'सिंहकटी' बद्दलच्या प्रेमातून स्फुरणाऱ्या कवितेचं, साकारणाऱ्या प्रतिभेचं हे रूप विलक्षण लोभस आहे. त्यातून पुश्किनचा 'अनुभव', सुचणं आणि आठवणं या प्रतिभेच्या दुहेरी स्फुरणातून 'काव्य' कसा बनतो तेही स्पष्ट होतं.

दुसरं उदाहरण आहे ते पुश्किनला आवडणाऱ्या स्त्रीच्या सुंदर चरणांचं. स्त्रीच्या सुंदर पावलांबद्दलचं आकर्षण हे पुश्किनच्या बाबतीत अगदी Obsession च्या जातीचं आहे. सबंध रशियात 'तीन जोड्या नाजूक बायकी पायांच्या'शोधूनदेखील सापडणं अवघड आहे; या दुर्मिळपणात त्या आकर्षणाचं एक कारण आढळेलसुद्धा. 'यिव्हेनी अनेगिन' मध्ये या चरण-खुणा इतक्या विखुरलेल्या आहेत; त्यांच्याविषयीच्या प्रेम, ओढ, खंत यांसारख्या इतक्या विविध भावना व्यक्त झाल्या आहेत; की त्यांच्या दर्शनानं 'भाग्य उजळले....तुझे चरण पाहिले' हे चरण आपल्या ओठांवरही उमटावेत. आपल्याला आणि पुश्किनलाच काय, तर समुद्राच्या लाटांनाही त्या चरणांचं चुंबन घ्यावं असं वाटलं असं पुश्किननं एके ठिकाणी म्हटलं आहे. पुश्किन लिहितो:

मी आठवतो समुद्राला वादळाआधीच्या,
कसा मी केला हेवा लाटांचा पण
वादळी आवेगानं पळणाऱ्या,
तिच्या पायांवर घालायला प्रेमानं लोटांगण!
कसा मी आसुसलो तेव्हा लाटांबरोबर
स्पर्शायला ओठांनी चरण प्रियकर!

या चरणप्रीतीमागं, एवढचं नव्हे तर वरील ओळींतील भावाविष्कारामागं क्रिमियाच्या दक्षिण किनाऱ्यावरील हद्दपारीमधील भटकंती आहे. ज्या रायेव्स्की कुटुंबाबरोबर पुश्किन हा प्रवास करीत होता, त्या कुटुंबातील पंधरा वर्षांच्या मार्या नावाच्या मुलीच्या प्रेमात तो पडला. (झिझी आणि मार्या या दोघीही पंधरा वर्षांच्या होत्या या सत्याला आणखी एका वास्तवाची जोड दिली पाहिजे : पुश्किनला वयस्क-वय झालेल्या नव्हे-स्त्रियांचंही आकर्षण वाटत असे.)

या मार्या रायेव्स्कीनं आपल्या विख्यात 'आठवणी' त.फक्त एकदाच पुश्किनचा उल्लेख केला आहे. ती म्हणते : ''सुंदर स्त्रिया आणि तरुण पोरी यांच्या प्रेमात आपण पडलो आहोत असं 'कवी या नात्यानं' पुश्किन समजत असे. तगानरोगपासून थोड्याच अंतरावर, आमची इंग्लिश सोबतीण सोफ्या आणि रशियन दाई यांच्याबरोबर मी गाडीतून कशी प्रवास करीत होते ते मला आठवतं. समुद्र दृष्टीस पडल्यावर 'थांबा' म्हणून सांगण्यात आलं. आम्ही गाडी सोडली आणि सगळे मिळून समुद्राकडं सुसाट सुटलो. ती खुली किनारपट्टी होती आणि आमच्यामागून 'कवी' येत असेल असा संशय न बाळगता, मी लाटांमागं पळत स्वत:ला रमवू लागले. आणि जेव्हा त्या माघारी वळू लागल्या तेव्हा मी त्यांच्यापासून दूर पळत सुटले. माझी पावलं भिजल्यावर मी खेळ संपवला. अर्थात याबद्दल मी मुळीच बोलले नाही आणि गाडीकडं परतले. पुश्किनला हे फार सुरेख दृश्य वाटलं आणि माझ्या बालिश चाळ्याचं 'काव्यीकरण' करून त्यानं काही सुंदर कविता लिहिल्या.'' त्याच्या सुंदर चरणांचा मूलाधार हा असा आहे. मार्याच्या मोहक चरणांनी कवी पुश्किनच्या संवेदनशील आणि सृजनशील मनावर उमवलेला ठसा पाहिला की, त्या आठवणींच्या शेवटी तिनं

काढलेले उद्गार म्हणजे पुश्किनच्या काव्यनिर्मितीचं खरंखुरं रहस्य आहे. मार्या सांगते : ''खरंच, त्यानं फक्त स्वत:च्या काव्यदेवतेचं पूजन केलं आणि त्यानं जे पाहिलं त्याचं काव्यीकरण केलं.'' कमर असो किंवा चरण असोत, झिझी असो किंवा मार्या असो; त्यांच्यावरील प्रेमाचं पुश्किननं केलेलं हे Poetization अनन्यसाधारण आहे. 'कवी या नात्यानं' प्रेमात पडणाऱ्या पुश्किनचं प्रेम कोणत्या प्रकारचं होतं ते वर उद्धृत केलेल्या कवितेतून पुढं स्पष्ट होतं. 'प्रियकर चरण' ओठांनी स्पर्शायला हा कवी आसुसलेला होता. तरी :

नाही, कधीच नाही दिवसांत धगधगत्या
माझ्या तारुण्याच्या उकळत्या
मी इच्छिलं असं : छळाच्या कल्पनेनं
चावावे ओठ सुकुमार अर्मिदांचे,
किंवा गुलाब जळत्या गालांचे,
किंवा वक्ष भरलेले तुडुंब वासनेने;
नाही, कधीच नाही उद्रेकानं विकाराच्या
छळलं तसं आत्म्याला माझ्या!

स्त्रियांच्या संदर्भातील पुश्किनचं आचरण व्यवहाराच्या लौकिक नीतिनियमांशी विसंगत वाटलं, तरी कलेच्या अलौकिक नीतिनियमांशी सुसंगत होतं असं मला तरी वाटतं. त्याचं हे 'ढळणं' असलं तरी ते अंतिम हित 'कळणं' होतं हे पुनरुक्ती करून सांगतो.

पुश्किनच्या जीवनातील 'उत्तर' कालाकडं - ('उत्तरार्ध' आणि 'उत्तरे' तला या दोन्ही अर्थांनी मी हा शब्द वापरत आहे.) - वळण्यापूर्वी मला आणखी एक गोष्ट सांगायची आहे. स्वातंत्र्यप्रीती आणि, क्रांती आणि स्त्री यांचं बेताबेतानं यथार्थ स्वरूप कळून आल्यानं या दोहोंविषयीचं त्याचं तीव्र 'दाक्षिण्य' (दक्षिणेत प्रकट झालेलं) - बोथटही झालं असावं.

ओदेस्सा बंदराचा निरोप घेऊन मिरवाइलोव्स्कोये उथं आपल्या कुटुंबात परत आल्यावर; पुश्किनला तिथलं, किशिन्योव आणि क्रिमियामधलं जीवन आठवलं असेल: क्रांती आणि प्रीती यांच्यासंबंधी अधिक वास्तव दृष्टीही आली असेल.

१८२७ मध्ये पुश्किन पीटर्सबर्गला आला आणि हद्दपारी संपलेली असूनही बेचैनच राहिला. सुट्टीत 'देशावर' जाऊन लिहायचा खरा. पण स्वत: त्सार हा त्याचा सेन्सॉर होता. संशयास्पद व्यक्ती म्हणून त्याच्यावर कडक नजर होतीच. तुर्कांबरोबर युद्ध सुरू झालं तेव्हा त्यानं सैन्यात जायची परवानगी मागितली. पण तो 'अनैतिक तत्त्वं' शिकवील म्हणून परवानगी देण्यात आली नाही. परदेशी जायला पण पुन्हा नकार मिळाला. वास्तविक या काळातील त्याच्या लेखनात संशय घेण्यासारखं - (किंवा येण्यासारखं) - फारच थोडं होतं. तारुण्य सरल्याच्या जाणिवेनं - (खरं म्हणजे भावनेनं!) वर्तन व लेखन यांवर संयमाचा पगडा बसत चालला होता. आईवडिलांच्या प्रेमाचा अभाव, राजसत्तेची संशयी नजर आणि पाचवीला पुजलेलं दारिद्र्य या सगळ्यांमुळं, आता जीवनात स्थिर व्हावं असं त्याला वाटू लागलं. 'लग्न आत्म्याला खच्ची करतं', (Marriage emasculates the Soul!') असं त्याचं लाडकं मत असलं तरी त्यानं लग्न करायचं ठरवलं. त्याच्या

घराण्यातला लग्नांचा इतिहास फारसा चांगला नव्हता. एवढंच नव्हे तर ज्याचं 'आलेक्सांद्र' हे नाव त्याला देण्यात आलं होतं, त्या त्याच्या आजोबानं बायकोचा खून केलेला होता. हे माहीत असूनही केवळ 'सोयीसाठी' त्यानं अनेक दृष्टींनी गैरसोयीचं असणारं लग्न उरकायचा निर्णय घेतला.

पण लग्न होण्यात पुश्किनच्या बाजूनं काही अडचणी होत्या. पहिली गोष्ट म्हणजे तो 'कवी' होता. कवीबद्दल (एखादे वेळेस) लोक बरं बोलतील पण उच्चभ्रू समाज त्याला कुठंही नाकच मुरडत असतो. पुश्किनच्या काळाचा रशियन समाजही 'कवी' कडं 'नवरा-मुलगा' म्हणून पाहताना कुठल्याही देशातल्या प्रमाणंच वागला असावा. कुणाही उपवर मुलीचे थोर आई-वडील कवीला मुलगी देण्यापेक्षा तिला विहिरीत ढकललेलं बरं अशाच रास्त मताचे असणार. एखादी लग्नाळू मुलगी तरी कवीला माळ घालण्याचं जीवघेणं धाडस कशाला करील?

आपल्याला असं वाटणं अगदी स्वाभाविक आहे : पुश्किनच्या 'डॉन वॉन यादी' तील कुणी त्याच्याशी का लग्न केलं नाही? अनेक कारणं असतील, पहिलं : पुश्किनला ती यादी एवढी लांबेपर्यंत लग्न करावंसं वाटत नव्हतं. दुसरं : ज्या स्त्रियांच्या तो प्रेमात पडला होता, त्यांना त्याच्याशी लग्न करावंसं वाटलं नव्हतं. ('प्रेम' करणं ठीक; 'लग्न' कोण करणार?) तिसरं : 'कवी' या नात्यानं त्याच्या प्रेमाकडं पाहणाऱ्या एखाद्या मार्याला आपल्या बालिश चाळ्याचं काव्यीकरण हेच पुरेसं वाटलं होतं. कवीच्या कवितेवर प्रेम करावं- (कवीवर नव्हे) - पण लग्न करावं ते 'न-कवी' शी अशा समंजस स्त्रियांपैकी ती आणि तिच्यासारख्या इतर काही असतील. कवीनं आपल्या स्फूर्तिदेवतेला (तिच्यावरच लिहिलेली) कविता वाचून दाखवणं हा कवीला वाटणारा मोठा आनंद असतो : पण हे भावुक काव्यवाचन सुरू असताना त्या अप्रतिम स्त्रीचं लक्ष कवितेसारख्या क्षुल्लक विषयापेक्षा अधिक महत्त्वाच्या अशा विणकाम, भरतकाम यांसारख्या गोष्टींत गुंतलेलं असतं असं स्वत: पुश्किननं एके ठिकाणी म्हटलं आहे. म्हणजे 'कवी' या भूमिकेचा लग्नाच्या दृष्टीनं उपयोग शून्यच! उलट कवित्व हा एक अडथळाच. पुश्किनच्या लग्नातील दुसरी अडचण म्हणजे तो 'दरिद्री' होता: प्रौढ भाषेत 'निष्कांचन' होता. अशा परिस्थितीत त्याला 'चतुर्भुज' करून टाकायचा त्याच्या मित्रांनीही विडा उचलला होता. त्याच्या लग्नाच्या वावड्या उडत होत्या. १८२८ च्या हिवाळ्यात, मॉस्कोमध्ये पुश्किन आलेला असताना एका नृत्याच्या प्रसंगी त्याची नाताल्या गोन्चारोवा या षोडशवर्षीय सुंदरीशी ओळख झाली. त्याचं हे प्रेमात पडणं मात्र आधीच्या प्रेमात पडण्याहून फार वेगळं होतं. तिचा ध्यास घेऊन तो पीटर्सबर्गला परतला आणि दुसरं काही काम होईना म्हणून त्या मन:स्थितीत रात्रभर पत्ते खेळू लागला. (खरं म्हणजे त्याला पत्ते खेळता येत नसत. या अर्थानं की, नेहमीच हरण्याबद्दल त्याची प्रसिद्धी होती!)

एकदा गोगोल पुश्किनला भेटायला आला : अगदी शाळकरी भक्तिभावानं! मध्यरात्र झाली होती. नोकरानं आपला धनी विश्रांती घेत आहे असं गोगोलला सांगितलं. गोगोलनं विचारलं : ''तो रात्रभर काम करतो हे खरं काय?'' 'काम करतो - म्हणजे तुम्हांला काय म्हणायचं आहे?'' नोकरानं गोगोलला प्रश्न विचारला आणि पुढं सांगितलं : ''तो पत्ते खेळत असतो!''

वसंतात पुश्किननं नाताल्याला मागणी घातली. पण तिच्या आईनं उडवाउडवीचं उत्तर दिलं. नाउमेद होऊन पुश्किननं काफ्काझकडं प्रयाण केलं. जाताना तिच्या आईकडं आणखी एक पत्र मात्र त्यानं धाडलं. तिला विसरून जाण्याचा हा अपेशी प्रयत्न होता. कारण नाताल्या त्याच्या मनात

अगदी भरून राहिली होती. हद्दपारीत असताना त्यानं पूर्वी काफ्काझला भेट दिलीच होती. त्या प्रदेशात तो पुन्हा खूप भटकला. एक दिवस त्यानं देशाची सरहद्द पाहिली; परदेशाची भूमी पाहिली. पण तीही तेवढ्यात तिथं चालू असलेल्या युद्धात रशियानं जिंकून टाकली. परवानगीवाचून तो सैन्यात शिरला आणि त्यानं काही काळ लष्करी जीवन भोगलं. परदेशाच्या भूमीत पाऊल टाकणं हे त्याचं फार जुनं स्वप्न होतं. हद्दपारीच्या काळातलं आपलं आवडतं स्वप्न त्यानं 'यिव्गेनी अनेगिन' मध्ये असं रंगवलं आहे :

... *रात्री उतालिआच्या सोनेरी,*
मी मजेनं भोगीन जसं येईल मनात,
तरुण मदनिकेसह वेनेत्सिआच्या,
आता बोलक्या आता मुक्या,
तरंगत रहस्यमय गोंदोलात,
तिच्याशी चालेल माझ्या ओठांची
भाषा पेत्रार्कची आणि प्रेमाची.

याही खेपेला दक्षिणकिनाऱ्यावरील त्याचं स्वप्न किनाऱ्यावरच राहिलं.

पुश्किन मॉस्कोला परतला आणि परवानगीवाचून निघून गेल्याबद्दल आणि सैन्यात शिरल्याबद्दल त्याची कानउघाडणी करण्यात आली. नाताल्याची प्रतिमा मनात कोरलेलीच होती आणि तिनं कमालीचा थंडपणा दाखवला. म्हणून तो पीटर्सबर्गला परतला.

१८२९ च्या वसंतात मॉस्कोला येऊन पुन्हा एकदा त्यानं नाताल्याला मागणी घातली. या खेपेला मात्र होकार मिळाला. पण लग्न ठरूनही दरिद्री लेखकाला मुलगी देण्याची टाळाटाळ आईनं चालवली. अखेर मुलाला 'घरदारवाला' बनवण्यासाठी पुश्किनच्या वडिलांनी त्याला बोल्दिनोची शेतीवाडी दिली. कंजूष म्हणून प्रसिद्ध असलेल्या त्याच्या वडिलांचं औदार्य खरंच मोठं म्हटलं पाहिजे. त्यांच्या द्रव्यप्रीतीचा एक किस्सा सांगण्यासारखा आहे. त्यावरून त्यांच्या स्वभावाची कल्पना येईल.

एकदा जेवणाच्यावेळी पुश्किनचा धाकटा भाऊ लेव याच्या हातून एक काचेचा पेला फुटला. बराच वेळ या हानीबद्दल वडील त्याला बोलत होते : रागावत होते - अखेर लेव म्हणाला : ''बाबा, पंचवीस कपेक्सचा पेला तो काय! त्याबद्दल तुम्ही मला किती बोलला?'' त्यांवर कधीही भावविवश न होणारे पुश्किनचे वडील अतिशय हळवे होऊन म्हणाले : ''महाराज, तो पेला पंचवीस कपेक्सचा नव्हता : पस्तीस कपेक्सचा होता!'' अशा वडिलांच्या हातून पुश्किनला शेतीवाडी मिळणं ही सामान्य गोष्ट नव्हती.

तो आता जमीनदार झाला होता. दोनशे 'आत्म्यां' चा मालक झाला होता. त्यानं शेतीवाडी गहाण टाकून रक्कम उभी केली आणि भावी सासूला बरंच द्रव्य दिलं. लग्न निश्चित झालं. इस्टेट ताब्यात घ्यायला आला तेव्हा बोल्दिनोहून त्यानं मित्राला लिहिलं : ''वाग्दत्त वधूपासून दूर पळून जाऊन कविता लिहायला सुरुवात करणं हा केवढा आनंद आहे याची तुला कल्पना करता येणार नाही.'' या काळात आणि नंतरच्या लग्नपूर्व काळात (१८२९-३० मध्ये) त्यानं तिथं आपलं

महत्त्वाचं लेखन केलं. तो त्याच्या बहराचा काळ होता.

नाताल्या सुंदर होती. पण बुद्धीनं बेताची आणि चंचल होती. फारसं शिकलेलीही नव्हती. नाचकाम, भरतकाम आणि थोडंसं फ्रेंच एवढीच तिच्याबाबत जमेची बाजू होती. तिच्या मनात आपल्याविषयी काही खास भावना आहेत असा पुश्किनचा मुळीच समज नव्हता. तिला त्याच्या लौकिकाची पुसट जाणीव होती एवढंच : कवी म्हणून त्याचा मोठेपणा कळत होता असंही नव्हतं. ती त्याची ११३ वी प्रेयसी होती आणि पुश्किन तिच्या सौंदर्यावर मोहित झाला होता.

१८३१ चा वर्षारंभदिन पुश्किननं बोल्दिनोत जिप्सी गायकांसमवेत साजरा केला. आपण कर्तव्य म्हणून लग्न करीत आहोत; कसलाही भ्रम नाही. आणि भावी आयुष्यात आपल्याला सुख लाभलं तरच आश्चर्य अशा आशयाचं पत्र त्यानं मित्राला पाठवलं.

फेब्रुवारी १८३१ मध्ये त्याचं लग्न झालं. लग्नाच्या दिवशी पुश्किन विषण्ण होता आणि अपशकुनांनी अस्वस्थ झाला होता. स्वस्थ आणि स्वस्त जीवन जगता येईल अशा कल्पनेनं जोडपं त्सार्स्कोये सेलोमध्ये स्थिरावलं.

परंतु एवढ्यात तिथं राजदरबार आला. त्सारची त्याच्यावर 'कृपा' झाली आणि त्याला परराष्ट्र कचेरीत पाच हजार रूबल्सच्या पगारावर 'काही काम नसलेलं सन्माननीय काम' (Sinecure) देण्यात आलं. नाताल्यावर त्सारची मेहेरनजर होऊन तिनं स्वत:ला सामाजिक भोवऱ्यात झोकून दिलं.

पुश्किनच्या मनस्तापाला आणि मानसिक कुचंबणेला सुरुवात झाली. सुरुवातीला चांगल्या वाटलेल्या निकोलायचे खरे रंग पुश्किनला दिसू लागले. त्यानंतर त्याच्याबद्दलचं मत चांगलं राहणं व त्याच्या कृपेचा अर्थ न उमजणं हे केवळ अशक्य होतं. 'दरबारी कैदी' आणि "the husband of a prima donna' या भूमिका वठवत राजदरबाराबरोबर व नाताल्याबरोबर त्याला फरफटत जावं लागलं. हिवाळ्यात दरबाराबरोबर तो पीटर्सबर्गला गेला आणि नृत्यस्थळी नात्यालाला नेत, तिथं खातपीत, उदासपणानं जांभया देत राहिला. वर्षभरात अपत्यलाभ होऊनही तिची चमकत्या जगाची ओढ कमी झाली नाही: मातृत्व तिला रोखू शकलं नाही. बायकोच्या नखरेल नाचरेपणानं आणि भोवतीच्या उच्चभ्रू मूर्खांच्या लंपटपणानं पुश्किन अधिकच बेचैन झाला. या तणावातून त्यानं शत्रूही निर्माण केले. द्वंद्वाचे प्रसंग उद्‌भवू लागले. तरी त्यानं द्वंद्व टाळलं.

पण पुश्किनच्या 'काहीच काम नसलेल्या सन्मान्य कामां' नं त्याचा दफ्तरखान्यात प्रवेश होऊन तो १८३२ मध्ये उतिहाससंशोधनात रमला. स्वकालीन बंधनांचा काच कमी म्हणून गतकालीन घटनांचं त्याला आकर्षण वाटू लागलं. पुगाचोवच्या बंडावर त्यानं आपलं लक्ष केंद्रित केलं व १८३३ मध्ये तो पुगाचोवच्या प्रदेशात बराच फिरला.

१८३४ च्या वर्षारंभदिनी "Gentleman of the Bedchamer' या चमत्कारिक हुद्द्यावर त्याची नेमणूक होऊन त्याला नव्या वर्षाची अपमानास्पद देणगी लाभली. त्याच्या बायकोला मुक्तपणानं नाचता यावं या सोयीसाठीच ही नेमणूक होती. पुश्किन पुरता 'दरबारी' बनला. त्याचा गणवेष त्याला 'विदूषकी' वाटू लागला.

आर्थिक स्थिती कमालीची हलाखीची होती. बाप तर दिवाळखोर झालेला होता. इस्टेटीची जबाबदारी अंगावर होती. खेड्यात जायची नाताल्याची उच्छा नव्हती. पुश्किन एकटाच गेला. पण

पोलिसांचा ससेमिरा सुटला नव्हता. त्यानं बायकोला लिहिलेली पत्रंदेखील पोलिस फोडत.

जून १८३४ मध्ये त्यानं राजीनामा देण्याचा प्रयत्न केला. त्सारकडं रजेची आणि कर्जाची मागणी केली. ३५००० रूबल्सचं कर्ज त्याला दिलं गेलं. पण परिस्थिती वाईटच होती. त्याला मूल्यवान वस्तू गहाण टाकाव्या लागत. त्या वर्षादोन वर्षात तो काहीसा चिडचिडा बनला: काहीच काम होत नव्हतं. असं १८३५ साल उलटलं.

अशा परिस्थितीत आणि मन:स्थितीत 'कॅप्टनची मुलगी' ('कप्तिन्स्काया दोच्का') ही श्रेष्ठ कादंबरी आणि 'मी स्वत:चं उभारलं स्मारक' ही जीवनाचं सारसर्वस्व प्रकट करणारी कविता पुश्किननं लिहिली. याच वर्षात George Anthe's या फ्रेंच अधिकाऱ्याची नाताल्याशी असलेली सलगी वाढली. अनेक अफवा पसरल्या. पुश्किननं त्याला द्वंद्वाचं आव्हान दिलं. पण तो आपल्या मेहुणीशी लग्न करणार हे कळल्यावर पुश्किननं माघार घेतली. मेहुणीशी लग्न करण्यात द्वंद्व टाळण्याचा भित्रेपणा आणि नाताल्याशी असलेले संबंध चालू ठेवण्याचा चलाखपणा होता. त्यात पुश्किनला चिथावणारं एक निनावी पत्र आलं आणि त्याचं व' Anthe शी ६ फेब्रवारी १८३७ रोजी द्वंद्व झालं. प्रतिस्पर्धी किंचित जखमी झाला. तर पुश्किनला प्राणघातक जखमा झाल्या. त्याच्या साथीदारानं (किंवा साक्षीदारानं) गाडीतून त्याला घरी आणलं. रक्त वाहात होतं. पण पुश्किननं त्याला सांगितलं की काय घडलं हे तू नाताल्याला सांगू नकोस कारण तिच्यापायीच हे द्वंद्व झालं होतं. आपणच या प्रकाराला जबाबदार आहोत असं तिला वाटू नये अशी पुश्किनची इच्छा होती. परंतु हा पुढं गेलाच आणि त्यानं पुश्किन कसा जखमी झाला हे तिला सांगितलं. त्याला त्याच्या आवडत्या अभ्यासिकेत नेण्यात आलं: निजवण्यात आलं. डॉक्टरांना बोलावण्यात आलं. दोन दिवस त्याची अवस्था थोडीशी सुधारायची, पुन्हा बिघडायची असं चाललं होतं. डॉक्टरांना त्यानं विचारलं, ''डॉक्टर, खरं काय ते सांगाल?'' डॉक्टर म्हणाले: ''यातून वाचणं कठीण आहे.'' पुश्किन उद्‌गारला: ''सत्य सांगून तुम्ही माझा सन्मान राखलांत याचा मला आनंद वाटतो.'' जन्मभर ज्या धीरानं अनेक द्वंद्वांना, अनेक आपत्तींना, अनेक दु:खांना पुश्किन सामोरा गेला त्याच धीरानं, जातिवंत कवीच्या आत्म्याला शोभेल अशा शांतपणानं पुश्किन मृत्यूला सामोरा गेला. मृत्यूच्या आधी आपल्या मित्राला त्यानं सांगितलं: ''अरे, मी अमक्या अमक्यांची देणी लागतो रे. त्यांची कागदोपत्री कुठं नोंद नाही. त्यांची नावं उतरून घे.'' हा त्याच्या प्रांजल आणि प्रामाणिक वृत्तीचा अखेरचा हृदयस्पर्शी आविष्कार होता. नाहीतर 'चाललोच आहे! बसू देत कोकलत!' असं त्याला म्हणता आलं असतं.

जेव्हा त्याला आता मित्रांचा निरोप घे म्हणून सुचवण्यात आलं तेव्हा तो आपल्या अभ्यासिकेतील, त्याला जन्मभर साथ देणाऱ्या ग्रंथांना म्हणाला : ''अच्छा, मित्रांनो! मी चाललो!'' पुश्किनला चांगले मित्रही लाभलेले होते: तेही गोळा झाले होते. त्यात सुरुवातीस पुश्किनला गुरूस्थानी असलेला, पण नंतर त्याचा जिवलग स्नेही बनलेला जुकोव्स्की होता. जेव्हा १८२० मध्ये पुश्किन हद्दपारी भोगायला निघाला तेव्हाच प्रसिद्ध झालेल्या 'रूस्लान इ ल्युद्‌मिला' या दीर्घ कवितेचं कौतुक म्हणून याचं जुकोव्स्कीनं त्याला आपलं एक चित्र भेटीदाखल दिलं होतं आणि त्याखाली लिहिलं होतं: ''विजयी शिष्याला पराभूत गुरूकडून'' प्राण जाण्यापूर्वी मित्रांचा निरोप घेताना हा रशियन महाकवी ''आम्ही जातो आमच्या गावा! आमुचा रामराम घ्यावा'' याखेरीज वेगळं काही रशियनमध्ये म्हणाला असं मानायचं कारण नाही.

अगदी प्राण जाताना पुश्किन काय म्हणाला? ग्योएथे सारखा महाकवी अखेरच्या क्षणी ''प्रकाश!प्रकाश! अधिक प्रकाश! '' असं उद्‌गारल्याचं आपण ऐकतो, वाचतो. पुश्किननं आपल्या मित्राला म्हटलं: ''अरे, मला उंच कर रे! मला अजून उंच कर रे! मी उंच चाललोय् रे! मी वर चाललोय रे! मला अजून उंच कर रे!'' ज्यानं जन्मभर स्वत:ला, स्वत:च्या आत्म्याला, स्वत:च्या भाषेला, स्वत:च्या देशाला उंचावण्याचं काम केलं होतं; ज्यानं एकंदर 'माणसा' लाच उंचावलं होतं: तो मित्राकडून उंचावला जात होता, वर उचलला जात होता. त्यावेळीच तो 'वर' उचलला गेला.

मृत्यूनंतर त्याच्या प्रशांत मुद्रेवर जे भाव होते त्यांचं जिवंत चित्र जुकोव्स्कीनं रेखाटलं आहे. जुकोव्स्कीनं म्हटलं आहे. ''त्याच्या मृत्यूनंतर काही क्षण जे मी त्याच्या मुद्रेवर पाहिलं तसलं काही मी कधीच पाहिलं नव्हतं. त्याचं डोकं किंचित झुकलं होतं. काही क्षणांपूर्वी आचके देणारे त्याचे हात, जणू काही खडतर परिश्रमानंतर विसावल्याप्रमाणं, आता शांतपणानं लांबलेले होते. पण त्याची मुद्रा काय सांगत होती हे मला शब्दांनी सांगणं शक्य नाही. मला तरी ती जितकी अनोखी आणि त्याचवेळी तितकीच ओळखीची वाटत होती! ती निद्राही नव्हती: विश्रांतीही नव्हती! त्याच्या चेहऱ्यावरला स्वाभाविक आणि नेहमीचा असा तो बौद्धिक भावही नव्हता: काव्यात्मक आविर्भावही नव्हता! छे! कसल्या तरी 'दर्शना' (Vision) सारखा, कसल्यातरी परिपूर्ण, सखोल आणि सुखद साक्षात्कारासारखा प्रगाढ आणि अद्‌भूत भाव त्याच्या चेहऱ्यावर बागडत होता..... मृत्यूनं त्याच्या मुद्रेवर काय छान मुद्रा उठवली होती आणि केवढ्या आश्चर्यकारक रीतीनं स्वत:चं आणि त्याचं रहस्य खुलं केलं होतं! अशा प्रगाढ, उदात्त आणि विजयी भावाचं दर्शन त्याच्या चेहऱ्यात मला कधीच घडलं नव्हतं हे मी तुम्हाला शपथेवर सांगतो. अर्थात पूर्वी कधी असल्या भावाची झलक त्यावर चमकली असली तरी मृत्यूशी झालेल्या भेटीत त्याच्या चेहऱ्यावरून सगळीच्या सगळी पार्थिवता अदृश्य झाली तेव्हाच फक्त तो भाव विशुद्ध रूपात प्रकट झाला.''

जुकोव्स्कीनं ज्या मृत्युंजय आणि अपार्थिव भावाचं चित्रण केलं तो भाव म्हणजे 'गुज अंतिम हित कळण्याचे' अशा स्वरूपाचा होता. म्हणूनच आपल्या दु:खांलाच नव्हे, तर आपल्या मृत्यूलाही कारणीभूत होणाऱ्या नाताल्याबद्दल राग नव्हता: पहिलाच अनुराग अखेरपर्यंत पुश्किनच्या मनात होता. त्यामुळंच आपल्या मृत्यूनंतर तिनं दुसऱ्या कुणाशीतरी लग्न करावं असं त्यानं तिला सांगितलं. आपल्या मृत्यूबद्दल कुणी कुणावर सूड उगवू नये असंही त्यानं मित्रांना बजावलं. 'आम्ही जातो- तुम्ही रंग करा आपुला' असं म्हणत समाधानानं जगाचा निरोप घेतला.

पुश्किनच्या मृत्यूनंतर त्याच्या दफनापर्यंत घडलेल्या काही घटना सांगण्यासारख्या आहेत. जिवंत पुश्किनपेक्षा मृत पुश्किनची धास्ती सरकारला अधिक वाटली. त्याच्या घरावर पहारा बसवण्यात आला. त्याच्या मृत्यूनंतर जनतेत प्रक्षोभ होईल अशी राजसत्तेला भीती वाटत होती. कारण द्वंद्वात आलेलं हे मरण नसून, द्वंद्वाच्या आवरणाखाली सरकारनं घडवून आणलेला हा पुश्किनचा राजकीय खून आहे, अशी अनेकांची तीव्र भावना होती. (मिखाइल लेर्मोन्तोव या कवीनं पुश्किनच्या मृत्यूवर एक प्रक्षोभक कविता लिहिली : तिच्यात ही भावना प्रकट झाली आहे.)

त्यामुळं सरकारनं सगळ्या प्रकारची खबरदारी घेतली. पुश्किनच्या अभ्यासिकेवर सील ठोकण्यात आलं. 'काळ्या चौकटीत' पुश्किनच्या मरणाची वार्ता दिल्याबद्दल संपादकांना जामण्यात

आलं: कारण तो काही 'सरकारी अधिकारी' नव्हता! मित्रांनाही मरणोत्तर प्रार्थना शांतपणानं करू दिली नाही: त्यावेळीही तिथं हेर होतेच. चर्चमध्ये शव नेल्यानंतर फक्त निवडक मित्रांनाच तिथं प्रवेश मिळाला. लोक जमू नयेत म्हणून जाहीर केलेल्या चर्चऐवजी दुसऱ्याच चर्चमध्ये गुप्तपणानं शव नेण्यात आलं. विद्यार्थ्यांनी हजर राहू नये म्हणून विद्यापीठातील प्राध्यापकांना त्यांना न सोडण्याची तंबी देण्यात आली. Royal Stacle's Church मधला तथाकथित 'राष्ट्रीय अंत्यसोहळा' (National funeral) असा उरकण्यात आला. जमलेल्यांपैकी एकेकानं आपल्या आवडत्या कवीचं अखेरचं चुंबन घेऊन त्याला निरोप दिला. मूकपणानं जुकोव्स्कीनं निर्जीव शरीराला शेवटचं आलिंगन देऊन, त्याचा गुरू झालेल्या शिष्याला अश्रुपूर्ण निरोप दिला.

मिखाइलोव्स्कोयेमध्ये आपलं दफन व्हावं अशी स्वत: पुश्किनची उच्छा होती : ती सरकारच्याही पथ्यावर पडली. त्याचं शव तिकडं नेण्याची आणि त्याच्याबरोबर तुर्गेनेवला जाऊ देण्याची परवानगी दिली होती.

पुश्किनचं शव साध्या लाकडी पेटीत घालण्यात आलं. जुकोव्स्की आणि व्याझेम्स्की या दोन जिवलग मित्रांनी ती पेटी गाडीत चढवली. सव्वीस वर्षांपूर्वी पुश्किनला शाळेत पोचवणारा तुर्गेनेव आणि पुश्किनला जोजवण्यापासून आयुष्यभर साथ देणारा त्याचा इमानी नोकर निकिता कोझ्लोव हे दोघे त्याला थडग्यात पोचवायला निघाले. त्यांच्याखेरीज बरोबर होते ते पोलिस! मृत्यूनंतरही पुश्किनला त्यांनी एकटं सोडलं नाही !

'स्व्यातोगोर्स्की मठा' जवळ थडग्यासाठी आवश्यक ती तयारी करण्यात आली. खड्डा खणण्यात रात्र गेली. सकाळी- (तेही पोलिसांच्या पहाऱ्यांत!) - चर्चमध्ये साधी सुटसुटीत प्रार्थना म्हणण्यात आली. स्वत: पुश्किनच्या कुळांनी आणि निकितानं शवपेटी वाहून आणली : थडग्यात उतरवली.

तुर्गेनेवनं एक मूठभर माती फेकली: निकितानं आणखी एक मूठ माती फेकली. उतरांनीही तेच केलं. मातीत माती मिसळली गेली. ज्या आईची जवळीक पुश्किनला जन्मात लाभली नाही, तिच्याच थडग्याशेजारी धरणीमातेच्या कुशीत त्यानं मरणोत्तर विश्रांती घ्यावी हे पुश्किनच्या जीवनकथेतील नाट्याचं वेगळंच रूप आहे. ज्या अंधाऱ्या रशियात पुश्किननं कधीच आपलं हृदय पुरलं होतं, त्याच अंधाऱ्या रशियात त्याचं शरीर पुरलं गेलं. पण पुश्किन मात्र पुरून उरला.

पुश्किनची जीवनकथा ही तत्कालीन रशियाची देखील जीवनकथा आहे: त्याच्या 'रानटी' किंवा 'निर्दय युगा'ची कहाणी आहे. तिला आत्माविष्काराचं अजरामर रूप कसं प्राप्त झालं ते त्याच्या वाङ्मयावरून स्पष्ट होईल.

॥२॥

—

पुश्किनची ‘काव्यं’ आणि ‘नाट्यं’

पुश्किनचं ‘काव्य’ आणि पुश्किनचं ‘नाट्य’ यांच्याबद्दल मी विवेचन करणार आहे. ‘पुश्किनची कविता’ असं न म्हणता मी ‘पुश्किनचं काव्य’ असा शब्दप्रयोग जाणून बुजून करीत आहे. ‘कविता’ (Poem) आणि ‘काव्य’ (Poetry) यांतील अंतर धूसर असतं : या दोहोंत एक बोलकं धुकं पसरलेलं असतं याची त्याला जाणीव आहे. कवितेत काव्य असतं : सामान्यत: असावं. पण काही वेळा कविता ही ‘काव्या’च्या पातळीवर पोचेलच अशी खात्री नसते.

रूढ समजाप्रमाणं ‘काव्य’ हे कवितेतून कधी कारंजासारखं उसळत असलं; कधी (बालकवींच्या) निळ्यासावळ्या झऱ्या सारखं झुळझुळत असलं; कधी अथांग सागरासारखं रौद्ररूप धारण करीत असलं; कधी वादळासारखं घोंगावत असलं: तरी ते कवितेप्रमाणंच ‘कथे’तून आणि ‘नाट्या’तून देखील असंच प्रकटत असतं.

वारा आणि कुमारिकेचं हृदय यांचा समानधर्म असणारा कवी हा गरुडासारखा असतो आणि त्याचं काव्य ही गरुडभरारी असते अशी पुश्किनची श्रद्धा आहे. निश्चल दमट हवेत गलबत त्याच्या श्वासाची हावरेपणानं वाट पाहात असताना वारा कडेकपारीत पानं वर उचलत असतो : धुळीचे कण वाहून नेत असतो. पर्वतावरून आणि मनोऱ्यावरून एखाद्या रोगट बुंध्यावर गरूड झेपावतो. रात्रीच्या अंधारावर प्रेम करणाऱ्या चंद्राप्रमाणं तरुण देस्दिमोना स्वत:च्या निग्रोवर प्रेम करते. कशासाठी ?

यासाठीच की, वाऱ्याला आणि गरुडाला
आणि कुमारिकेच्या हृदयाला नसतो कानून.

‘कवी’ (‘पएत’: १८२७) या कवितेत पुश्किननं म्हटलं आहे की, दिखाऊ जगाच्या चिंतांत भेदरटपणानं बुडून गेलेल्या कवीची पवित्र वीणा मौन --- आणि त्याचा आत्मा प्रशांत निद्रा चाखत असतो :

पण नुसता दैवी शब्द
तल्लख कानाला भिडतो तोच,
आत्मा कवीचा लागतो फडफडायला
जाग्या होत असलेल्या गरुडाप्रमाणं
होतो बेचैन ख्यालखुशालीत जगाच्या...

पण हा गरूड पर्वतशिखरावरून आणि मनोऱ्यावरून रोगट बुंध्यावर झेप घेईल तरी का ? ख्यालीखुशालींत रमतो तरी का ? त्याचंही उत्तर पुश्किननं लिहून ठेवलं आहे. ‘एलेगिया’ (१८३० : ‘Elegy’) या कवितेतल्या काही ओळी अशा -

उन्मत्त वर्षं सरलेली मौजमजेत पुरी
मला अवजड, न उतरलेल्या धुंदीपरी...
पण मदिरेसारखं, दु:ख गेलेल्या दिवसांतलं
जितकं जुनं, तितकं जास्त प्रबळ - माझ्या आत्म्यातलं

मदिरा आणि मदिराक्षी यांचा ‘भोग’ हा अखेर ‘भोग’ असतो : त्या भोगाआधी जाणवलेल्या सुखाचं बेचैनीत रूपांतर होऊन त्याला ‘मुरलेलं दु:ख’ या अर्थानं ‘भांग’ हे नाव प्राप्त होत असतं.

कवी हा ‘गरुड’ असला, तरी शेवटी ‘माणूस’च असतो. आकाशाची ओढ असली तरी तो ‘मातीचा पुत्र’ असतो. पण भरारी तर मारायचीच असते ‘कवीला’ (‘पएत’ : १८३०) या कवितेत पुश्किन कवीला सांगतो.

कवे ! नको मानूस मोलाचं प्रेम लोकांचं,
उन्मनी स्तोत्रांचा विरेल क्षणिक गोंगाट,
ऐकशील निवाडा मूर्खाचा अन् हसणं निर्विकार टोळक्यांचं
पण तू रहा उभा खंबीर, शांत आणि मुकाट
तू आहेस तयार : जग एकटा, वाटेनं खुल्या
जा; जिकडं खेचेल तुला स्वतंत्र मन ...

परंतु ‘इथे हे ओढिती मागे मला बांधोन पाशांनी’ असा अनुभव या गरुडांना येत असतो : विशेषत: रोगट बुंध्यावर झेपावल्यावर येत असतो.

कवी आणि काव्य यांविषयीची पुश्किनची ही भूमिका थोडक्यात पाहिल्या नंतरसुद्धा त्याच्या जीवनाचा आणि काव्याचा अन्वयार्थ काहीसा लागू शकतो, मला वाटतं.

पुश्किनच्या काव्यसंभारात प्रीतीची आणि स्वातंत्र्यप्रीतीची स्फुट कविता, चार पाच प्रमुख कथाकाव्यं आणि ‘यिव्गेनी अनेगिन’ ही पद्यबद्ध कादंबरी (‘रिमान व् स्तिखाख’) यांचा समावेश होतो. त्याचं ‘नाट्य’ ही देखील मुक्तछंदातील काव्यनिर्मितीच आहे.

पुश्किनची स्फुटकविता ही मुख्यत: गीतात्म (Lyrical) आहे. गीताचं आणि त्याच्या प्रेमकवितेचं प्रतिनिधित्व करणाऱ्या ‘काळी शाल’ (‘चोर्नाया : १८२९) या कवितेचा मी केलेला अनुवादच बोलका आहे.

याच काळातली 'रूस्लान आणि ल्युद्मिला' ('रुस्लान उ. ल्युद्मिया १८२०) ही हद्दपारीत जाण्यापूर्वीची पहिली दीर्घकविता, प्रेमाचीच कविता एका जादूगारानं लग्नघरातून पळवून नेलेल्या आणि एका सरदारानं केलेल्या ? राजकन्येची ही साधी पण चटकदार कहाणी आहे.

आता मी आपल्यापुढं स्वातंत्र्यप्रीती व्यक्त करणाऱ्या तीन कविता ठेवल्या आहेत. त्यांतील पहिली कविता पुश्किनच्या मनात क्रांतीची बीजं पेरते. चादायेव नावाच्या ज्येष्ठ मित्राला उद्देशून लिहिलेली आहे. कवितेचं नाव 'चादायेवला' ('चादायेवी : १८१८)

--ब्रिस्त' उठावानंतर सिबीरमध्ये हद्दपार करण्यात आलेल्या व तिथं सजा भोगणाऱ्या क्रांतिकारक मित्रांना पुश्किननं गुप्तपणानं पाठवली होती. तिचं नाव आहे 'खोल तळाशी सिबीरमधील खाणींच्या' (१८२३)

त्यांच्यासाठी ही कविता होती त्यांतील एका हद्दपारानं या कवितेला एका कवितेनेच उत्तर दिलं होतं. तिच्यातील या दोन ओळी फार फार मार्मिक आहेत :

कष्ट आमुचे मुळीच नव्हते गेलेले व्यर्थ,
ठिणगीमधुनी उठेल अजुनी ज्वाला एक समर्थ

कुसुमाग्रजांची 'क्रांतीचा जयजयकार' ही कविता आपल्याला आठवेल विशेषत: गाभ्यातील या दोन ओळी :

सरणावरती आज आमुची पेटतांच प्रेते
उठतिल त्या ज्वालांमधुनी क्रांतीचे नेते

या आठवतील.

गंमत अशी आहे : 'ठिणगी' ला रशियनमध्ये 'इस्क्र' म्हणतात. पुश्किननं आपल्या भूमिगत नियतकालिकाला 'इस्क्रा' हेच नाव ठेवलं होतं आणि त्याच्या शिरोभागी 'ठिणगीमधुनी उठेल अजुनी ज्वाला एक' एवढी ही ओळ ब्रीदवाक्य म्हणून लेनिन देत असे. पुश्किनचा लेनिनशी असणारा संबंध हा कसा आहे हे मला जाताजाता सांगायचं आहे.

तिसऱ्या कवितेचं नाव आहे 'अरिओन' (१८२७). पाच 'दिका'? बंडखोरांना फाशी दिल्याच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त लिहिलेली व -- ब्रिस्तांशी असणारं आपलं नातं रूपकात्मक (Allegorical) किंवा प्रतीकात्मक भाषेत स्पष्ट करणारी ही कविता आहे.

'अरिओन' हा एक प्राचीन ग्रीक कवी आणि गायक होऊन गेला. त्याच्याबद्दल दंतकथा अशी की, एकदा तो समुद्रात बुडत असताना, त्याच्या 'गाण्याने लुब्ध होऊन एका डेल्फिननं त्याला वाचवलं.

पुश्किन स्वत:साठी 'अरिओन' चं प्रतीक वापरतो. पण त्याला वाचवणारा हा 'डेल्फिन' कोण? त्सार ? पहिला निकोलाय ? की आणखी कुणी ? 'वाचलो' याचं समाधान व्यक्त न करता, 'वाचलो' असं सांगून तो खंत व्यक्त करतो असं मला वाटतं. त्या खंतीत, आपली 'वस्त्रं' (राजसेवेच्या या वादळामध्ये फक्त भिजली होती, ती आपणच किनाऱ्यावर खडकांखाली सुरक्षित ठेवली आहेत. या पुश्किनच्या निवेदनात फार मोठा अर्थ आहे. पुश्किनची कविता रूपकाचा - प्रतीकाचा आश्रय



वडील सर्गेय पुश्किन
(१७७०-१८४८)



आई नादेइज्दा (हन्निबाल)
(१७७५-१८३६)



बालक आलेक पुश्किन




आरिना रोदिओनोवा पुश्किनची दाई-नर्स
हिच्याकडून ऐकलेल्या लोक कथा व गीते त्याने साहित्यात वापरल्या.



तेरा वर्षाचा पुश्किन



विद्यालयात असतानाची पुश्किनची पहिली प्रेयसी
येकातेरिना बाकुनिना. त्याच्या सुरुवातीच्या तीस
कविता तिच्या भोवती गुंफलेल्या आहेत.



सेंट पीटर्सबर्ग जवळचा येकातेरिनिन्स्की पॅलेस. डाव्या बाजूच्या भागात पुश्किनची शाळा होती.




महाविद्यालयीन पुश्किन त्याच्या कविता परीक्षेच्या वेळी उपस्थित रसिकांना ऐकवितो. १८१५
(रेपिनने काढलेले तैलचित्र १९११)



प्योत्र शादायेवच्या विचारांचा (१७९४-१८५६)
पुश्किनच्या दृष्टिकोनावर फार मोठा प्रभाव पडला.

सेण्ट पीटर्सबर्गचा राजरस्ता. नेवस्की प्रॉस्पेक्ट १८२०





डिसेंबरच्या उठावात भाग घेणारी
जनरल रायेवस्कीची कन्या
मारिया वोस्कोन्स्काया (१८०५-६३)



सरदार वोरोन्त्सोवची पत्नी येलासावेता
(१७९२-१८८०)




सरदार व्याझेंस्कीची पत्नी वेरा
(१७९०-१८८६)




आन्ना केर्न (१८०० - १८७९)


पुश्किनच्या प्रेमाचा आणि प्रेमकवितांचा विषय झालेल्या ललना




हद्दपारीची दोनपेक्षा जास्त वर्षे पुश्किन आईच्या
मिखायलोवस्कोये येथे या इस्टेटीवर राहिला



ओसिपोव कुटुंबाचे मिखायलोवस्कोये जवळचे निवास स्थान.
येथे पुश्किन नेहमी त्याच्या मित्रांना भेटे.





'जिप्सी' या कवितेच्या हस्तलिखिताची पाने पुश्किनने
काढलेली रेखाचित्रेही त्यात आहेत. (१८२३)



१४ डिसेंबर १८२५ चा सशस्त्र उठाव - सीनेट चौक (जलरंगचित्र)

घेऊन वक्रोक्तीही कशी साधते याचं दर्शनही घडवील.

'अरिओन' या कवितेत व्यक्त होणारी खंत ही एका जातिवंत कवीची आणि क्रांती करणाऱ्या एका 'गुप्त गायका' ची खंत आहे.

यानंतरच्या त्याच्या प्रसिद्ध कविता म्हणजे 'दाक्षिणात्य कविता' ('युज्नीये पएमी'). हद्दपारीमध्ये किशिन्योव, आदेस्सा, क्रिमिया, बेस्सरेबिया इत्यादी सुंदर सुंदर ठिकाणी फिरत असताना, विशिष्ट मन:स्थितीत पुश्किननं लिहिलेल्या (१८२०-२४) चार कवितांचा हा गुच्छ आहे. ही कथाकाव्ये आहेत.

त्यांतल्या पहिल्या कथाकाव्याचं नाव आहे, 'काफ्काझचा कैदी' ('काफ्काझ्स्किय प्लेन्निक'). प्रत्यक्ष काफ्काझ्ला भेट दिल्यानंतर पुश्किनला स्फुरलेली ही कविता. या पर्वतप्रदेशातील एक मुलगी एका रशियन कैद्याच्या प्रेमात पडते. (हा रशियन कैदी कोण असेल याचा या पहिल्याच वाक्यावरून अंदाज येईल!) ती त्याला पळून जायला मदत करते आणि नंतर आपणहून पाण्यात बुडून मरते.

दुसऱ्या कथाकाव्याचं नाव आहे 'लुटारू भाऊ' ('ब्रात्त्या राझ्बोय्निकी'). दोघे लुटारू भाऊ असतात. ते एकदा व्यापारी जहाजावर धाड घालतात आणि मालाबरोबरच व्यापाऱ्याच्या तरुण मुलीला कैद करून आणतात. मोठा भाऊ तिच्या प्रेमात पडतो. त्याची आधीची एक प्रेमिका असते. ती मत्सरानं वेडी होते आणि नवी त्याच्यावर प्रेम करत नाही. जुनी वेडी झाली : नवी शहाणी झाली. ती लौकरच मरून जाते. पुढं ते तुरुंगातून पळून जातात. पायांत बेड्या असताना पोहत पोहत नदीपार होतात. त्यांच्या पलायनाचं वर्णन वाचल्यावर पुश्किनच्या एका मित्रानं लिहिलं : ''बरं झालं. पायांत बेड्या असताना पोहून पळ काढता येतो हे आम्हांला पुश्किननं सांगितलं हे छान झालं!''

तिसऱ्या कवितेचं नाव आहे 'बख्चिसरायचा झरा' ('बख्चिसराइस्किय फन्तान') बख्चिसराय हे पूर्वी क्रिमियावर राज्य करणाऱ्या तार्तर - खानांच्या राजधानीचं गाव. तिथल्या झऱ्याला अश्रूंचा झरा म्हणत. त्या झऱ्याच्या दर्शनानंतर लिहिलेलं हे कथाकाव्य आहे.

पुश्किनच्या 'दाक्षिणात्य कवितां'तील ही एक अत्यंत रोमँटिक अशी बायरनी खाक्याची कविता आहे. बायरनी 'छापाची' असं न म्हणता बायरनी खाक्या'ची असं मी मुद्दाम म्हणत आहे. पुश्किन हा 'रशियाचा बायरन' आहे : त्याच्यात 'बायरनिझम' आहे असं वरचेवर सांगण्यात येतं, 'बायरनिझम्' ला कोणता प्रतिशब्द वापरावा याचा विचार करताना मला 'बायरनी खाक्या' हा शब्द सुचला. त्यातून बायरनचे विशेष चांगल्या प्रकारे व्यक्त होतात असं मला वाटतं.

एक तार्तर खान त्याच्या कैदेत असलेल्या पोलिश राजकन्येवर प्रेम करतो. आणि जनानखान्यात तिचा तिच्या दावेदारणीकडून खून होतो. या कवितेबद्दल स्वत: पुश्किनला वेगळंच वाटत होतं. या कवितेवर प्रसिद्ध पार्शियन कवी सादी याच्या 'बोस्तां' मधल्या दोन ओळी त्यानं अवतरण म्हणून दिल्या होत्या. बखसरायच्या झऱ्याबद्दल सादीनं म्हटलं आहे :

वर्दी चष्मा चूं मा बसी दम जदन्द
ब रफ्तनद चूं चष्म बरहम जदन्द

या झऱ्याजवळ माझ्याप्रमाणं अनेकांनी श्वासोच्छ्वास केला आणि ते निमिषात निघून गेले. या ओळींचा अनुवाद करताना पुश्किननं म्हटलं :

बरेच जण, माझ्याप्रमाणं आले या झऱ्यावर;
पण काही आता नाहीत, दुसरे आहेत भटकत दूरवर.

स्वत: पुश्किनला आपल्या कवितेहून या ओळींचंच अधिक आकर्षण वाटत होतं.

'दाक्षिणात्य कविता'तली शेवटची कविता म्हणजे 'जिप्सी' (त्सिगानी अलेको या नावाचा एक रशियन तरुण शहरी जीवनाला कंटाळून आणि हताश होऊन भटकत भटकत जिप्सींच्या छावणीत येतो. (इथं एवढंच सांगतो, भाषिक दृष्ट्यादेखील 'अलेको' हे 'आलेक्सांद्र' चं रूप आहे.) तो झेंफिरा नावाच्या एका म्हाताऱ्या जिप्सीच्या पोरीवर प्रेम करायला लागतो. तिला त्याची ओढ वाटून ती त्याच्याशी लग्न करते. पण कोणतंही बंधन - लग्न सुद्धा - जिप्सी मनाला रूचणं शक्य नसतं. तिला दुसरा प्रियकर भेटतो. अलेको मत्सरानं बेभान होतो आणि तिच्या प्रियकराबरोबरच तिलाही ठार मारतो.

झेंफिराचा म्हातारा बाप अलेकोलो सांगतो : ''आमच्यांत ही संस्कृती म्हणजे आमचे कायदे वेगळे आहेत आणि तुमचे कायदे वेगळे आहेत.'' अलेकोला जिप्सींच्या टोळीतून हाकललं जातं. स्वत: पुश्किन हा बेस्सरेबियात हिंडत असता एका जिप्सी मुलीच्या प्रेमात पडला होता त्याचाच हा काव्यात्मक आविष्कार.

'बायरनी खाक्या' हा या 'दाक्षिणात्य कविता' चा प्रमुख विशेष. बायरनचा प्रभाव केवळ कवितेवरच पडला होता असं नव्हे. नेपोलियन बायरनचा 'नायक' म्हणून पुश्किननं त्याच्यावर पुन्हा एकदा वेगळ्या प्रकारची कविता लिहिली. कवितेपुरता बायरनचा 'नायक' हा त्याचा नायक बनला इथपर्यंत ठीक झालं. पण बायरननं जिचं चुंबन घेतलं होतं (निदान तशी बोलवा होती.) ती बायरनची 'नायिका' पुश्किनची देखील (प्रत्यक्षात!) बनली. किशिन्योवमध्ये भेटलेल्या या नायिकेचं नाव होतं : 'कॅलिप्सो पोलिक्रोनी'.

याच ठिकाणी त्याच्या नंतरच्या एका कथाकांव्याचा विचार मला करायचा आहे. त्याचं नाव 'ब्राँझचा घोडेस्वार' ('मेद्निय फ्साद्निक' : १८-- किंवा 'पीटर्सबर्गची कथा' असं आहे.)

'ब्राँझचा घोडेस्वार' हे ऐतिहासिक, सामाजिक आणि राजकीय पातळीवर वावरणारं काव्य आहे. पीटर्सबर्गची स्थापना करणारा थोर प्योत्र हा मोठा पण तो हुकूमशाहीचं प्रतीक म्हणून पुश्किननं रंगवला. त्याचा अश्वारूढ पुतळा हा या कथेतील यिव्गेनी या सामान्य कारकुनाच्या मागं धावत सुटतो. यिव्गेनी त्याला भितो : तसाच त्याला धमकावतो. पण अखेर नष्ट होतो. ही कथा पुन्हा रूपकाच्या / प्रतीकाच्या पातळीवर जाते : आणि गांजणारं 'निर्दय युग' व गांजले जाणारे पददलित यांच्यातील अपेशी संघर्षाचं 'ध्वनिकाव्य' बनते.

अन्यायी समाजात व्यक्तीची होणारी कुचंबणा, आपण समाजाला नको आहोत. आपण Superfluous Man आहोत ही सामान्य माणसाची जाणीव आणि भीतीसारख्या नाजूक भावनेची (प्रेमिकांबरोबरच) होणारी इतिश्री या कवितेत व्यक्त झाली आहे. यिव्गेनीच्या शोकात्मिकेला पुश्किननं फार मोठी आणि कमालीची अर्थपूर्ण परिमाणं प्राप्त करून दिली आहेत. त्यांतील एकाचा निर्देश करतो.

निसर्गही माणसाला सतावण्यात समाज आणि राजसत्ता यांना कशी साथ देत असतो ते ७ नोव्हेंबर १८२४ मध्ये पीटर्सबर्गमध्ये 'नेवा' नदीनं जलप्रलय करून सिद्ध केलं. त्या 'साथी'चं वर्णन पुश्किनच्या काव्यातील प्रतीकात्मक निसर्गकलाचं रूप स्पष्ट करतं. विशेषत: मानवी जीवनाचं प्रवाहपतितत्व व्यक्त करणाऱ्या ओळी फार अर्थपूर्ण आहेत. -

एकदा स्वत: थोर प्योत्रला नेवाच्या निर्जन तीरावर उभा असताना

निसर्गानं आधीच आहे ठरवलं इथं आम्ही
पाडावी खिडकी युरोपमध्ये डोकावण्याची

(पीटर्सबर्ग म्हणजे 'युरोपमध्ये डोकावण्याची रशियाची खिडकी' असं वर्णन केलं जातं!) त्यावेळी दिसलेलं दृश्य असं आहे :

किनाऱ्यावर एकाकी लाटांच्या
उभा राहिला तो, भारी विचारांनी भारावलेला,
आणि दूरवर होता टाकत नजर. त्याच्यासमोर
नदी होती वहात; बिचारी साल
तिच्यावरून होती जात तडफडत एकाकीपणानं.

माणूस म्हणजे प्रवाहातून एकाकीपणानं तडफडत वाहात जाणारी 'बिचारी साल' आहे. सत्य केवढ्या समर्थपणानं इथं प्रकट झालं आहे.

त्याच बरोबर 'माणसा' च्या कर्तृत्वाचा, थोर प्योत्रच्या 'सृजना' चा वाद करायला पुश्किन विसरत नाही. नेवाच्या निर्जनतीरावर आधी काय होतं आणि नंतर तिथं काय निर्माण झालं याचं रेखीव चित्र डोळ्यांसमोर उभं करणारा उतारा उद्धृत करण्याचा मोह मला आवरत नाही.

उलटलं शतक आणि नागरी तरुण, घेऊन
उत्तरेतील भूमीचं सौंदर्य आणि अद्भुतपण,
जंगलांच्या अंधारातून, चोरांच्या दलदलीतून
उठली वर दिमाखानं, गर्वानं;
जिथं आधी 'फिन्' - कोळी,
दुःखी सावत्रपुत्र सृष्टीचा
एकटाच खोलगट किनाऱ्यावरला
टाकायचा निगूढ पाण्यात
स्वतःचं दरिद्री जाळं, आत तिथं
सजग सजीव किनाऱ्यावर
करतात दाटीवाटी भव्य इमारती
वाड्यांच्या आणि मनोऱ्यांच्या; गलबतं
काफिल्यांनी सगळ्या टोकांहून पृथ्वीच्या
संपन्न धक्क्यांकडं येतात वहात;

चुनी खडकांची चुनडी धारण केली नेवानं,
पूल आहेत लोंबकळत पाण्यावर;
काळसर-हिरवट बागांनी
तिला टाकलंय् झाकळून बेटांनी,
आणि तरुण राजधानीसमोर
गेली काळवंडून म्हातारी मस्क्वा,
जशी नव्या त्सारित्सासमोर
राजवस्त्रातली विधवा.

ज्याला मी 'काव्य' म्हणतो-त्यातही ज्याला मी पुश्किनचं 'काव्य म्हणत आहे - ते 'काव्य' किती बहुरूपी असतं, पुश्किनची कामरूपिणी प्रीती आत्माविष्काराच्या किती 'परी' त्यांतून प्रकटवत असते याचा विचार करायला इथं अवकाश नाही. आताच उद्धृत केलेल्या ओळींतून भेटणारा 'सृष्टीच्या दुःखी सावत्रपुत्र' 'चुनी खडकांची चुनडी ल्यालेली नेवा' आणि दोन - धान्यांतील अंतर दाखवणारी चित्रदर्शी प्रतिमा.

यानंतर त्याच्या १८३१ ते १८३४ या काळातील लोककथांच्या जातीच्या काव्यांतील कहाण्यांचा ओझरता उल्लेख करतो. 'पोप आणि त्याचा -- बाल्दा यांची कहाणी' ('स्काझ्का आ पोपे इ आ राबोत्निके यिवो बाल्दे 'मृत राजकन्या आणि सात शृंगार यांची कहाणी' ('स्काझ्का आ म्योत्वॉय त्सारेव्ने इ आ सेमि बगातिऱ्याख'), 'त्सार सल्तानची कहाणी' ('स्काझ्का आ त्सारे सल्ताने') इ. कहाण्यांचा आशय मी सांगत बसत नाही. या कहाण्यांची काही पुस्तकं मी पाहिली आहेत ती झिनाबला तरी बालवाङ्मयासारखी दिसतात. या गोष्टीचा आधार घेऊन थोरांच्या कहाण्या सांगणं मी टाळतो.

परंतु पुश्किनच्या या कहाण्यांत त्याच्या कल्पनाचमत्कृतीचं (Fantacy) आणि तरीही अद्भुताकडून वास्तवाकडं - स्वप्नाकडून सत्याकडं जाण्याचं त्याचं बळ निश्चितपणानं दिसतं एवढं मात्र आवर्जून म्हणतो.

आता थोडसं 'यिव्गेनी अनेगिन' बद्दल. ही 'पद्यबद्ध कादंबरी' दिसायला आपल्याकडल्या खंडकाव्यासारखी असली तरी तिची जात महाकाव्यात्म कादंबरीची (Epic Novel) आहे. तिला महाकाव्य असंही म्हटलं असतं पण म्हणत नाही. कारण एखाद्या श्रेष्ठ कृतीला चटकन महाकाव्य म्हणणं, एखाद्या श्रेष्ठ कवीला हातचं काही राखून न ठेवता महाकवी म्हणणं हे आपल्याकडं बरं दिसत नाही.

या काव्यावरील सुरुवातीला असणारा बायरनचा प्रभाव 'चाईल्ड हॅरोल्ड' ची आठवण करून देत असला, तरी बायरॅनच्या मृत्यूनंतर तो कमी होत चालला होता.

लॉर्ड बायरननं विक्षिप्तपणानं खऱ्या
आच्छादला स्वप्नरंजनात हताश
अहंप्रामाण्यवाद निराश

हे पुश्किनचे उद्गार त्याच्यातील बदलाचे निदर्शक आहेत.

'यिव्गेनी अनेगिन' ही कवी पुश्किनची दृढ सामर्थ्य एकाच वेळी व्यक्त करणारी श्रेष्ठ कलाकृती आहे. त्याची 'कथा', त्याचं 'काव्य' आणि त्याचं 'नाट्य' यांचा इथं सुरेख संगम आढळतो. त्याला ही कृती हातावेगळी करायला आठ वर्षं (१८२३-३१) लागली.

'यिव्गेनी अनेगिन'ची कथा तशी गुंतागुंतीची नाही.

यिव्गेनी अनेगिन हा तरुण पीटर्सबर्ग मधल्या कोंडमाऱ्याला, ढोंगी दिखाऊपणाला, भोगलेल्या निरर्थक विलासांना - या सगळ्याला - कंटाळून, अगदी उबगून त्याच्या काकांच्या शेतीवाडीवर येतो. तो कविवृत्तीचा असतो. सुरुवातीला खेड्यातील जीवन त्याला आकर्षक वाटतं. पण अखेर तेही कंटाळवाणं ठरतं.

त्याच खेड्यात आलेल्या लेन्स्की या तरुण कवीशी त्याची ओळख होते : मैत्री होते. लेन्स्की हा तरुण पुश्किनचं, तर यिव्गेनी हा प्रगल्भ पुश्किनचं दर्शन घडवतो. त्याच्या परिचयाच्या लारिन - कुटुंबात त्याचं जाणंयेणं सुरू होतं. त्या कुटुंबातील ओल्गा आणि तत्त्याना या बहिणी तरुण असल्या तरी स्वभावानं आणि रूपानं एकमेकींहून वेगळ्या असतात. लेन्स्की धाकटीच्या म्हणजे ओल्गाच्या - प्रेमात पडतो. पुढचं वाक्य, 'यिव्गेनी थोरलीच्या प्रेमात पडतो' असं येणार असा कुणीही अंदाज करील. पण तसं होत नाही. ओल्गात काही 'प्राण' नाही असं अनेगिनचं मत असतं. त्या मानानं रूपानं साधी पण गुणानं वेधक अशी तत्त्याना त्याला अधिक बरी वाटते. परंतु तो तिच्या प्रेमाबिमात पडत नाही. ती मात्र त्याच्या प्रेमात पडते.

परंतु यिव्गेनी एखाद्या विद्वज्जड माणसाप्रमाणं ('पंडिता' प्रमाणं असं म्हणत नाही!) तिला उपदेशाचे डोस पाजतो. प्रेमबिम करणं बरं नाही अशा आशयाचं व्याख्यान देतो. फार तर तिच्यावर 'भावासारखं प्रेम करीन' असं उदार आश्वासन देतो.

मध्यंतरी ओल्गावरून लेन्स्की व यिव्गेनी यांचं द्वंद्व होऊन लेन्स्की मारला जातो. यिव्गेनी गाव सोडून जातो. कुठंही, केव्हाही घडतं तसंच घडतं. ओल्गाचं दुसऱ्या कुणाशी तरी लग्न होतं. तत्त्यानाला उजवण्यासाठी तिची आई तिला घेऊन शहरात जाते. तिचं एका 'प्रिन्स'शी लग्न होतं - ('प्रिन्स' हा एक हुद्दा आहे : 'प्रिन्स' म्हणजे राजपुत्र नव्हे.) - ती 'प्रिन्सेस' होते.

कालांतरानं एका नृत्यप्रसंगी यिव्गेनीची तिच्या नवऱ्याशी आणि तिच्याशीही भेट होते. तत्त्यानाला निवांत भेटण्याचा तो प्रयत्न करतो. एकदा भेटही होते. ती अखेरचीच ठरते. यिव्गेनी अक्षरशः तिच्या चरणांवर लोटांगण घालतो. त्याच्यावर आपलं प्रेम होतं, आहे : पण आता आपण दुसऱ्याच्या झालो आहोत, आपण त्याच्याशी इमानी राहू, एवढंच तत्त्याना त्याला सांगते आणि ही कादंबरी संपते.

इथं 'वाटेच्या वाटसरा' या तांब्यांच्या कवितेचा शेवट आठवतो.

कथा साधी वाटली तरी या कलाकृतीला अनेक परिमाणं लाभलेली आहेत. प्रसंग, व्यक्ती, समाजजीवन, निसर्ग यांची तिच्यांतील चित्रणं ही केवळ वर्णनपर (discriptive) नाहीत : तर ती अनेकार्थसूचक (evocative) आहेत. आणि रशियन जीवनाचाच नव्हे, तर एकंदर मानवी जीवनाचा 'यिव्गेनी अनेगिन'मधील आविष्कार हा वाङ्मयसृष्टीतील एक 'चमत्कार' आहे पुश्किनच्या प्रतिभेच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या परिपक्वतेचं ते रसाळ आणि गोमटं फळ आहे. ''Ripeness is all'' एवढंच या कृतीचं वर्णन खरं म्हणजे पुरेसं आहे.

बेलिन्स्कीनं पुश्किनला 'कवी-कलावंत' ('पएत-खुदोज्निक') म्हटलं ते किती सार्थ आहे हे पुढील निसर्गचित्र पुरेपूर पटवील. हासुद्धा निम्न-निसर्ग ('नीझकाया प्रिरोदा') आहे. हा खेड्यातल्या भूदासांचा हिवाळा आहे:

हिवाळा !...... शेतकरी सण साजरा करून
बिनचाकाच्या गाड्यावरून करतो नवी वाट;
त्याची घोडी बर्फ हुंगून
उधळते चौखूर कशीतरी सुसाट.
दोन चाकोऱ्या भूसभुशीत उमटवून,
जाते किबीत्का दूर निघून;
गाडीवान बसतो पुढच्या जागेवर,
लाल कमरपट्टा आणि कोट अंगावर.
इकडं आहे पळत पोर भूदासाचं
गाड्यात कुत्र्याला बसवून,
स्वतःला कल्पनेनं घोडा समजून;
खट्याळानं गोठवलंय् बोट कधीचं;
त्याला दुखणंबिखणं हास्यास्पद मनातून,
पण आई धमकावते त्याला खिडकीतून....

निसर्ग आणि मानव यांच्यांतले संबंध रंगवताना पुश्किननं शकून आणि अपशकून यांचं जे वर्णन केलं आहे ते पाहिलं की, रशियन मन हे आपल्या मनाहून वेगळं नाही याचा प्रत्यय येतो. तत्त्याना असल्या भाबड्या भाविकतेनं कशी अस्वस्थ होत असायची त्याचं हे वर्णन मजेशीर वाटेल.

ढोंगी मांजर चुलीवर बसून,
फुरफुरत पंजानं तोंड पुसतं :
ते निःसंशय चिन्ह तिच्याकरता होतं -
की, येणार पाहुणे, अचानक बघून
बारीक दुशिंगी कोर चंद्राची
आकाशात डाव्या बाजूची
ती थरथरायची आणि पांढरी पडायची.
जेव्हा कोसळणारी चांदणी
आकाशात काळोख्या उडायची
आणि विखरायची ... त्या क्षणी
तत्त्याना करायची घाई बेचैन होऊन
जोवर चांदणी नाहीशी व्हायची अजून -
इच्छा हृदयाची तिच्याकडं कुजबुजायची;
जेव्हा ठरलेली कुठंतरी असायची

तिची गाठभेट-काळ्या कपड्यांतली संन्यासिनी
किंवा अचपळ ससा शेतामधून
तिचा रस्ता गेल्यास ओलांडून,
काय होणार सुरू - हे भयानं न येऊन ध्यानी,
दुःखांच्या पूर्वसूचनांनी ओथंबत
राहायची ती दुर्दैवाची वाट बघत.
म्हणून पुश्किननं असं म्हटलं :
असा निसर्ग करतो आमची घडण
विसंवादाकडं झुकलेला.

या कादंबरीतलं संवादाचं सौंदर्यदेखील लक्षात घेण्यासारखं आहे. तत्त्याना आणि तिची न्यान्या यांच्यांतील एक संभाषण मला आठवतं. 'न्यान्या' म्हणजे दाई. पुश्किनची एक न्यान्या होती. तिचं त्याच्यावर मुलासारखं प्रेम होतं आणि पुश्किनचं तिच्यावर आईहूनही अधिक प्रेम होतं. आपल्या 'दाई' वर त्यानं एक सुरेख कवितापण लिहिली आहे. 'आई' वर काहींनी कविता लिहिल्या, 'बाई'वर पुष्कळांनी लिहिल्या. पण 'दाई' वर कविता लिहिणारा कदाचित पुश्किन हा एकमेव कवी असावा. तत्त्यानाच्या 'न्यान्या' त पुश्किनच्या दाईचे रंग मिसळलेले असावेत.

तत्त्याना एकदा प्रेमज्वरानं आजारी पडते. तिच्या न्यान्याला ती खरंच आजारी पडलेली आहे असं वाटतं. त्यावेळचा त्या दोघींतला हा संवाद ऐका :

''मी प्रेमात पडलेली'' पुटपुटली फिरून
म्हातारीला दुःखावेगात.
''जिवलग सजणी, तू आजारी अजून.''
''सोड एकटी मला; मी पडलेली प्रेमात.''

रघुनाथपंडिताच्या दमयंतीची अवस्था आणि ''औषध नलगे मजला'' हे तिचे उद्गार मला या ठिकाणी आठवतात.

अशा तऱ्हेचं प्रेमाचं चित्रण करताना पुश्किन कसा बदलत चालला होता याचंही दर्शन आपल्याला घडतं. ''थंड शुद्ध हिवाळ्या सारख्या । निष्ठूर, फिरवल्या न जाणाऱ्या 'स्त्रियांचा त्याला आलेला अनुभव त्याला - (यिव्गेनीला पण - ही कबुली द्यायला भाग पाडत होता :

आणि करतो कबूल : पळालो त्यांच्यापासून
जीव घेऊन; वाचली अगदी भिऊन
त्यांच्या भुवयांवर कोरीव अक्षरं नरकाची :
''सोडून दे आशा कायमी''

पण त्याचबरोबर उदात्त प्रेमाचं दर्शन त्याला घडलं होतं. तेच दर्शन त्याला इतरांनाही घडवायचं होतं. अखेरीस तत्त्याना यिव्गेनीला सांगते :

मी तुमच्यावर करते प्रेम (कशाला लपवायचं ?)
पण मी दुसऱ्याला दिली गेलेली दान,
मी राखीन जन्मभर त्याच्याशी इमान.

पुश्किन 'पिकत' चालला होता; परिपक्क होत चालला होता. त्याला जीवनदृष्टी येत चालली होती. पण जीवनदर्शन घडवत असताना पुश्किन काही वेळा विडंबनाचा सूर काढताना दिसतो. माणसाचं जीवन कसं आहे ते सांगताना पुश्किननं म्हटलं:

धन्य तो, जो बाल्यापासून होता तरुण,
धन्य तो, जो पिकला वेळेवर,
जो हळूहळू आयुष्याचं थंडपण
सोसू शकला वयाबरोबर;
ज्यानं चमत्कारिक स्वप्नांना नाही कवटाळलं,
ज्यानं जगाच्या झुंडींना नाही कधी टाळलं;
जो विशीत होता निधडा आणि रंगेला
आणि तिशीत किफायतशीर 'बायको' ळलेला
जो पन्नाशीत झाला मोकळा पुरता
स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्या ऋणांतून;
ज्यानं कीर्ती, धन आणि प्रतिष्ठा परतफेड म्हणून
मिळवली गाजावाजा न करता
ज्याच्याबद्दल ठामपणानं म्हणाले जन्मभर :
अप्रतिम माणूस अमुकअमूक तर

असाच विडंबनाचा सूर मृत्यूविषयक सत्य सांगताना देखील पुश्किन काढतो -

असंच ! विस्मरण अलिप्त
कबरीपाशी पाहतं आमची वाट
शत्रूंचा, मित्रांचा, प्रेमपत्रांचा गोंगाट
एकदम थंडावतो, इस्टेटीसाठी फक्त
वारसांचा प्रक्षुब्ध घोळका
चालवतो अशोभनीय गलका

कवीच्या मृत्यूवरलं भाष्यदेखील असंच उपहासप्रचुर आहे. एखादा कवी अल्पायुषी ठरला की, आपण म्हणतो : ''फार वाईट झालं ! तो अजून जगायला हवा होता. नंतर त्यानं काय छान लिहिलं असतं !'' (एखादा कवी फार वर्ष जिवंत राहिला की, आपण हळहळ व्यक्त करतो : ''अरेरे ! अजून ते जिवंत आहेत हो !'') पण खरोखरच अल्पायुषी ठरलेला कवी जगला असता तर काय झालं असतं ? लेन्स्कीच्या मरणासंबंधी पुश्किन लिहितो :

पण कदाचित असंही झालं असतं : कवीची
प्रतीक्षा करीत राहिलं असतं नशीब मामुली.
गेली असती निघून वर्षं यौवनाची :
त्याच्यातली धग आत्म्याची असती थंडावली.
पुष्कळच तो असता पालटला :
असता मुकला काव्य देवतांना; असता लग्नाळला;
खेड्यात सुखांत आणि गुराढोरांत
असता राहिला मिरवत जाडजूड झग्यात.
असतं आणलं जीवन, खरंच खरोखर;
संधिवात असता चाळिशीत जोडला,
असता खाल्ला, प्याला, कंटाळला, जडावला, रोडला;
आणि अखेर स्वतःच्या अंथरुणावर
असता संपला मध्यभागी पोरांच्या.
रडणाऱ्या बायांच्या आणि डॉक्टरांच्या

नेमकं हेच बायरनच्या मृत्यूनंतर पुश्किननं म्हटलं होतं. पुश्किन आदेस्सामध्ये असताना बायरन वारला. त्यावेळी आपला मित्र व्याझेम्स्की याला पुश्किननं कळवलं : ''बायरनबद्दल तुला वाईट वाटतंय, पण त्याच्या काव्याची वैभवशाली अखेर यादृष्टीनं त्याच्या मृत्यूचं मला समाधान वाटतं. त्याच्या तारुण्यापासून वायरनची प्रतिभा कोमेजत गेली... तिच्यात चढती भाजणी नव्हती, तो एकदम 'पिकला' आणि परिपक्क झाला... गायला आणि एकदम अबोल झाला.. आणि तिच्या पहिल्या सुरेल लकेरी त्याच्याकडं कधीच परत आल्या नाहीत.''

यापेक्षा वेगळी अशी, जीवनाचा अर्थ सांगणारी आणि भव्य प्रतिमासृष्टी डोळ्यापुढं उभी करणारी 'यिव्गेनी अनेगिन' मधलीच एक कविता आहे. ती अशी :

हाय ! जीवनाच्या नांगरलेल्या सरींत,
पिढ्या - क्षणिक सुगीच्या रूपानं,
'दूरदर्शी'च्या गूढ इच्छेनं, -
उगवतात, पिकतात, गळून पडतात;
दुसऱ्या त्यांच्यामागून जातात
असा आमचा झंझावाती वंश एकवेळ
वाढतो, फोफावतो, उसळतो
आणि थडग्यांत गर्दीनं पणजोबांना घुसळतो,
येईल, येईल, आमचीही वेळ;
आमचीही नातवंडं भल्या प्रहराला
जगातून हाकलतील आम्हांला !

परंतु याचा अर्थ पुश्किन उदास होत चालला असा नव्हे. तो परिपक्क होत चालला होता.

म्हणून तो पुढं सांगतो :

सध्यातरी धुंद व्हा पुरते,
या हलक्याफुलक्या जीवनाचं तुम्ही !
त्याची निरर्थकता मला समजते
आणि थोडासाच त्यात गुंतलेला मी.

समर्थ जीवनदर्शन घडवणाऱ्या आणि जीवनावर भाष्य करणाऱ्या अशा 'यिव्गेनी अनेगिन' च्या अखेरीस येणाऱ्या काही ओळी आपल्या पुढे मी ठेवतो :

धन्य तो, ज्यानं फार आधीच सोहळा जिण्याचा
सोडला मागं; तळापर्यंत न पिता
पेला मदिरेचा - भरलेला पुरता

या कादंबरीतून व्यक्त होणारा जीवनाचा असीमपणा आपण स्वत:च पुरता जाणला की नाही : आपण घडवायचं होतं तेवढं जीवनदर्शन घडवू शकलो की नाही याविषयी स्वत: पुश्किनलाच संदेह असावा, म्हणूनच :

आणि विमुक्त कादंबरीचा असीमपणा

मी जादूच्या स्फटिकामधून
नाही वेगळा स्पष्ट ओळखला अजून

असं त्यानं म्हटलं, पुश्किनचं 'काव्य' हा त्याचा स्वत:चा आणि त्याच्या कवितासखीचा (स्फटिकासारखा) 'आत्मा' आहे याची साक्ष मात्र पटल्यावाचून राहात नाही.

पुश्किनचं 'नाट्य' म्हणजे 'अंध फोर्तुनाचा आणि लोकांचा दुष्टावा.' ('फोर्तुना' म्हणजे नियती : इंग्लिश (Fortune चं मूळ लॅटीन रूप.) अंध नियती आणि मानव यांच्यातील संघर्ष म्हणजे 'नाट्य' असं नेहमी म्हटलं जातं पण अंतर्विरोध (Paradox) हा 'नाट्या'चा गाभा आहे; जे जे अंतर्विरोधी (Paradoxical) आहे ते ते 'नाट्यात्म' वाटत तरी असतं. म्हणूनच मी 'नाट्या'ला कवितासखीचे 'भ्रम-विभ्रम' असं म्हटलं, एक परिचित उदाहरण सांगतो :

मऊ मेणाहून । आम्ही विष्णुदास ।
कठीण वज्रास । भेदू ऐसे ॥

हा तुकारामांचा अभंग. त्यातील Paradox निदान मला तरी 'नाट्यात्म' वाटतो.

हा अंतर्विरोध नियती आणि मानव यांच्या परस्परसंबंधांतून व्यक्त होणारा असो; माणसा-माणसांच्या भावसंबंधातून प्रकट होणारा असो; शास्ते आणि शासित यांच्या अत्यंत प्रेमाच्या नात्यातून वेडावणं दाखवणारा असो; किंवा माणूस नावाच्या विलक्षण गुंतावळ्यातून चकित करीत राहणारा असो; तो अंतर्विरोध 'नाट्य' म्हणून कधी करुण, तर कधी प्रसन्न; कधी दारूण; तर कधी सुंदर बनून आपल्यापुढं उभा राहात असतो.

पुश्किनच्या 'नाट्या'चा विचार करीत असताना, मानवी जीवनातील आणि 'माणूस' नावाच्या

विलक्षण गुंतावळ्यातून Paradox चा पुश्किनच्या आधीच्या एका रशियन कवीने केलेला उच्चार मला आठवतो.

वृद्ध दिर्जाविननं पाहिलं आमच्याकडं
आणि आशीर्वादिलं जाताना थडग्याकडं

असा ज्याचा मोठ्या आदरानं पुश्किननं उल्लेख केला त्या दिर्जाविनच्या पुढील काव्यपंक्ती म्हणजे पुश्किनच्या 'नाट्य' कल्पनेचा जणू गाभा आहेत :

'त्सार मी, गुलाम मी,
मी कृमी नि देव मी.

खरंच माणूस हा त्सार असतो तसाच गुलाम असतो : कृमी असतो तसाच देव असतो.

पुश्किनची पहिली नाट्यकृती म्हणजे 'बोरीस गोदुनोव' (१८२५). तिला ऐतिहासिक नाटक म्हणायला हरकत नसली तरी 'नाट्यात्म बखर' (Dramatic Chronical) असंही तिचं वर्णन केलं जातं. हेही एक 'तोतयाचं बंड'च आहे.

महाभयंकर इवान ('इवान ग्रेझ्निय') हा वारल्यावर त्याचा मुलगा फ्योदोर गादीवर आला. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या दिमित्री नावाच्या भावाचा सिंहासनावर हक्क होता. पण त्याचा खून करण्यात आला. फ्योदोरचा खुनी मेहुणा बोरीस गोदुनोव हा राज्यावर आला. दिमित्रीचा तोतया ग्रिष्का अत्रेप्योव हा आपण दिमित्री आहोत असं सांगत पुढं आला. त्यानं बंड केलं. बोरीस मरण पावला. बंड यशस्वी झालं. बोरीसच्या मुलानं (त्याचंही नाव फ्योदोरच !) विष घेऊन प्राणत्याग केला.

बोरीस हा त्सार खरा; पण त्याची लोकांमुळं गुलामाहून वाईट अवस्था झाली होती. लोकांबद्दलचा आपला अनुभव सांगताना 'असा असतो लोकांचा न्याय !' असे उद्‌गार काढण्यापूर्वी बोरीस म्हणतो :

... जिवंत सत्ता लोकांना वाटत असते घृणास्पद,
त्यांना जमतं करायला प्रेम फक्त मृतांवर,
वेडे असतो आम्ही, जेव्हा लोकांची खळबळ
अगर भयानक किंकाळी करते बेचैन आमच्या हृदयाला !
देवानं लादली आमच्या धरणीवर उपासमार,
लोक लागले कण्हायला वेदनांत नष्ट होताना
मी उघडली त्यांच्यासाठी कोठारं; मी सोनं
उधळलं त्यांच्यावर; मी त्यांच्यासाठी काढली कामं -
पण त्यांनी मला, संतापून दिले शिव्याशाप !
अग्निप्रलयानं त्यांची घरं केली बेचिराख
मी बांधली त्यांच्यासाठी नवी घरकुलं
पण त्यांनी अग्निप्रलयाबद्दल मला लावला बोल !...

त्सारला असे पुरून उरणारे लोक त्सार आपल्यावरच अन्याय करतो असं म्हणत असतात. बोरीसच्या राजवटीबद्दल या नाटकातील पुश्किन (पुश्किन हे पात्रच पुश्किननं रंगवलेलं आहे) म्हणतो :

... काय फायदे आहेत यांत की, उघड उघड देहदंड नाहीत,
की, रक्ताळलेल्या वधस्तंभावर देशभर
आम्ही नाही गात स्तोत्रं इय्यसूची,
की, आम्हांला नाहीत जाळत चौकात; आणि त्सार
आपल्या राजदंडानं नाही सावडत कोळसे ?
की, खात्री आहे आपल्याला आपल्या दरिद्री आयुष्याची ?
आमची दररोज करीत असतात प्रतीक्षा - अपमान,
तुरुंग, सिबीर, यतिवेश अगर बेड्या;
आणि मग - वैराणात उपाशी मरण अगर गळफास
अत्यंत नावाजलेली घराणी आमच्यांतली कुठं आहेत ?
कुठं आहेत प्रिन्स सित्स्की, कुठं आहेत शेस्तुनोव,
रोमोनोव; पितृभूमीची आशास्थानं ?
तुरुंगात बंद विजनवासात छळानं पीडित.

यांतील सत्य काय ? यांमध्ये न्यायी कोण आणि अन्यायी कोण ? कवी पुश्किन हा कुणाच्या बाजूचा ? असे प्रश्न या नाटकातील बोरीस (त्सार); ग्रिगोरी अत्रेप्योव (तोतया); पुश्किन - शुयस्की (बंडखोर उमराव) पीमेन - पत्रिआखं (धर्मगुरू) आणि 'लोक' यांच्या चित्रणातून निर्माण होतात.

या नाटकातील 'लोक' या पात्राची निर्मिती हा पुश्किनच्या सृजनशीलतेचा अनन्यसाधारण विक्रम आहे. मतांमुळं त्सारपेक्षा मोठे असणारे हे लोक चंचल आहेत तसेच एकनिष्ठ आहेत; लाचार आहेत तसे हटवादी आहेत; उत्साही आहेत तसे हताश आहेत. त्यांना आपल्यावर राज्य करणारा कुणीतरी हवाच असतो: प्रसंगी त्याच्याविरुद्ध दंड थोपटणं हेही त्यांना आवडत असतं. 'रामाय स्वस्ति ! रावणाय स्वस्ति !' असं म्हणणारी ही जनता असते. ''ही जनता अमर आहे !'' हे खरं आहे.

बोरीसनं सिंहासन स्वीकारावं म्हणून ही जनता आर्जवं, विनवण्या, प्रार्थना आणि अश्रुपात करते. (रडू येत नाही. पण रडलं पाहिजे म्हणून दुसऱ्याकडे 'कांदा आहे का ?' असं विचारणारा या लोकांतला एक माणूस पुश्किननं रंगवला आहे !) पण हीच जनता-हेच लोक तोतयाचं बंड यशस्वी झाल्यावर बोरीसच्या पोरांची गठडी वळायला त्याच्या घरावर चालून जातात.

'बोरीस गोदुनोव' ही नाट्यकृती अनेक चकव्यांच्या जागांनी भरलेली आहे. त्सारचं मनोगत व्यक्त केलं म्हणून पुश्किन 'त्सारचा मित्र' ठरतो काय ? 'लोक' हे पात्र रंगवून जनतेचं सत्यचित्रण केलं म्हणून तो 'लोकांचा मित्र नव्हता' हे सिद्ध होतं काय ?

सगळ्यांत विनोद असा की, या नाट्यकृतीवर सेंसॉरनं 'राजनिष्ठ' अशी मुद्रा मारली. पुश्किनला बरीच समज (Understanding) आली होती. विलक्षण समंजसपणानं तो त्सारकडं

पाहात असल्याचं दिसतं. पण दिसतं तसं नसतं. त्याहून वेगळं आणि अधिक काही त्यात असतं. एका देववेड्याचं (God's fool) पात्र निर्माण करून त्यानं त्याच्या मुखातून त्सार ही खुनी आहे हे त्सारलाच ऐकवलं. वेड्याच्या मुखातून त्सारला सत्य सुनावणारा पुश्किन किती शहाणा होता हे निदान आपल्या तरी ध्यानात येईल. पुश्किनच्या त्सारला आणि सेंसॉरला, 'मला काय त्याचं ? ते बोरीसबद्दल आहे' असंही वाटलं असेल, तर तेही बरोबरच आहे ! तोही समंजसपणाच आहे.

वास्तविक राजसत्ता आणि लोक यांचं आणि त्यांच्यांतील संघर्षाचं हे विडंबनपर 'नाट्य' होतं : पण ते इतकं काव्यात्मक झालं आहे - (ग्रिगोरी आणि मरीना यांच्यांतील प्रेमप्रकरणामुळं 'रोमँटिक' सुद्धा) - इतकं समतोल झालं आहे की, हा सगळाच भूलभुलैय्या ठरावा ! विडंबनपरतेचा विचार क्षणभर बाजूला ठेवला, तरी 'माणसा' तील त्सार आणि गुलाम; कृमी आणि देव हे व्यक्त करण्यात पुश्किनला इथं मोठंच यश मिळालं आहे. 'माणूस' मग तो कुणीही असो- समजून देण्याचा प्रयत्न पुश्कि न त्याच्या 'परी'नं कसा करतो त्याचं हे चांगलं उदाहरण आहे. पुश्किनची वक्रोक्ती बऱ्याच वेळा सरलोक्ती वाटते :हीही 'नाट्य' व्यक्त करणारी त्याची एक 'परी'च असते.

'बोरीस गोदुनोव' नंतर (१८३०) पुश्किननं 'कंजूष सरदार' ('स्कुपोय रित्सार'), 'मोत्सार्त आणि साल्येरी' व 'दगडी पाहुणा' ('कामेन्निय गोस्त') ही तीन Opera सारखी वाटणारी मुक्तछंदातील 'नाट्यं' लिहिली.

'कंजूष सरदार' मध्ये एक कवडीचुंबक 'बरोन' आणि त्याचा अल्बेर नावाचा तरुण मुलगा यांच्यांतील 'पितापुत्र-संघर्ष' रंगवला आहे. संघर्षाचं मूळ अर्थातच बापाच्या चिक्कूपणात आहे. पुश्किन आणि त्याचे कंजूष वडील यांच्यांतील प्रेमाचा (!) हा सहजगत्या झालेला आविष्कार आहे. बरोन ड्यूककडं मुलानं आपल्याला मारण्याचा - लुटण्याचा प्रयत्न केला अशी तक्रार करतो : पुश्किनच्या वडिलांनी मुलाबद्दल अशीच तक्रार केली होती.

या तक्रारीचं रूपांतर अक्षरश: दोघांच्या द्वंद्वात होण्याचा प्रसंग प्रत्यक्ष ड्यूकपुढं घडतो. ड्यूक ते द्वंद्व थोपवतो. पण बापलेकांनी इतकं हमरीतुमरीवर यावं याचं, कसले हे दिवस आले याचं त्याला दु:ख होतं.

अल्बेरच्या ज्यू - मित्रानं त्याला बापावर विषप्रयोग करण्याचं सुचवण्यात 'कृमी' आणि अल्बेरनं तसं करण्याचं नाकारण्यात 'देव' मात्र प्रकट होताना दिसतो. 'मी आहे त्सार' असं स्वत:च्या धनराशीपुढं उभं राहून म्हणणारा म्हातारा बरोन त्या संपत्तीचा गुलाम असतो आणि एखाद्या कृमीसारखं क्षुद्र जीवन जगत असतो.

तरुण माणूस पैशांत 'चाकर' पाहतो : तर म्हातारा त्यांत 'मित्र' पाहतो असं ज्यूनं म्हटल्यावर अल्बेर उद्‌गारतो :

छे ! माझा बाप ना चाकर, ना मित्र
पाहतो त्यांच्यामध्ये : पण पाहतो 'धनी'; स्वत:च करतो त्यांची सेवा.
आणि कशी करतो सेवा ? अलज्जयन गुलामासारखी,
साखळबंद कुत्र्यासारखी, बिनऊबदार खुराड्यात
राहतो; पितो पाणी; खातो कोरडे तुकडे;

संबंध रात्र नाही झोपत; सारखा पळतो आणि भुंकतो

निर्घृण द्रव्यलालसा आणि धनसंचय (Hoarding) यांच्यावर पुश्किनचं उपरोधाचं शस्त्र चालवावं हा त्याच्या आणि त्याच्या देशाच्या प्रकृतीला साजेसंच आहे; सुसंगत आहे.

'मोत्सार्ट आणि साल्येरी' ही दोन संगीतकार कलावंतांची कहाणी आहे. साल्येरीला मोत्सार्टचे गुण मान्य असतात; प्रिय असतात. पण त्याचं बेफिकीर जीवन त्याला पसंत नसतं. कलेतील कमालीची उंची गाठणारा मोत्सार्ट प्रत्यक्ष जीवनात कमालीची खालची पातळी गाठतो हे त्याला खुपतं. शिवाय त्याच्याबद्दल साल्येरीला असूया वाटत असते. याचं पर्यवसान साल्येरीनं त्याच्या मद्याच्या प्याल्यात विष घालण्यात होतं. मैत्रीच्या पाल्याचं विषाच्या पाल्यात रूपांतर होईल याची मोत्सार्तला कल्पनाही नसते.

स्वत: पुश्किन हा Mozartian disdain मध्ये : 'मोत्सार्टच्या उन्मनी'त राहात असे असं त्याच्या एका अभ्यासकानं म्हटलं आहे. मोत्सार्ट हा आपला समानधर्मा म्हणून पुश्किननं या नाट्यकृतीत त्याला (मारून देखील) अमर केलं असावं.

साल्येरीतील संगीतपूजक 'देव' जसा त्याला दाखवायचा होता तसाच मत्सरानं वळवळणारा 'कृमी' देखील रंगवायचा होता. मोत्सार्ट तर स्वत:चं देवपण स्वत:लाच न कळणारा 'संगीताचा देव' आहे. पण त्याचं बेफिकीर, उन्मन जीवन हे काहींना 'कृमी' प्रमाणं वाटे हे सांगताना पुश्किनला जाता जाता स्वत:च्या अशा जीवनावरही सूचक भाष्य करायचं असावं असं मला वाटतं.

या नंतरची त्याची नाट्यकृती म्हणजे 'दगडी पाहुणा' : किंवा, 'संगमरवरी पाहुणा'. दगडी पाहुणा म्हणजे जरा चमत्कारिक वाटतं, म्हणून त्याचं मी 'संगमरवरी पाहुणा' हे जे रूपांतर केले आहे ते आपण मान्य करून घ्या. ही नाट्यकृती डॉन वॉनची कहाणी आहे. पण मी 'डॉन वॉन' असं न म्हणता 'दोन जुआन' असं म्हणणार आहे. दोन जुआन हा प्रेमासाठी प्रसिद्ध. पुश्किन हा देखील त्याच्या काळातला दोन जुआन म्हणून ओळखला जात होता आणि त्याच्या 'दोन जुआन यादी'चा - खरं म्हणजे 'जवान यादी'चा - मी यापूर्वीच्या विवेचनात उल्लेख केलेला होता. प्रेमाचा कवी, प्रमाथी भावनांचा भाट, सौंदर्याचा आणि सौंदर्यवतींचा भोक्ता म्हणून पुश्किनला हा दोन जुआन इथं रंगवायचा आहे. वास्तविक तो माद्रिदमधल्या एका कमांडरचा खून केल्याबद्दल हद्दपार झालेला होता. पण तो चोरून माद्रिदमध्ये येतो. (पुन्हा पुश्किनचं हद्दपार झालेल्यांशी असणारं जवळचं नातं इथं जाणवतं. मग तो गोविंद असो, किंवा दोन जुआन असो; त्यांच्याविषयी आपणही हद्दपार आहोत या भावनेनं वाटणारी आंतरिक ओढ इथंही प्रकट होते.) ज्या कमांडरला त्यानं मारलेलं असतं त्याच्या बायकोला त्यानं पाहिलेलं नसतं आणि तिनं त्याला पाहिलेलं नसतं तिचं नाव असतं दोना अन्ना. 'दोना' म्हणजे बाई; 'दोन' म्हणजे बुवा असं म्हणायला हरकत नाही. 'दोना' या शब्दाचा स्पॅनिश अर्थ मला माहीत नाही : पण इटालियनमध्ये त्याचा अर्थ 'बाई' असा होतो. दोना अन्ना म्हणजे अन्नाबाई. पण इतक्या सुंदर बाईला 'बाई' म्हणायचं म्हणजे जरा कठीण आहे !

तर एका संध्याकाळी लेपोरेल्लो नावाच्या आपल्या जोडीदाराबरोबर दोन जुआन माद्रिदमध्ये चोरून प्रवेश करतो. आणि गावाबाहेर दफनभूमीजवळ थांबतो. त्यावेळी त्याला दिसतं की, कुणीतरी

स्त्री दफनभूमीकडं येते आणि आतल्या एका संगमरवरी थडग्याकडं जाते. थडग्यापासून थोड्या अंतरावर एक संगमरवरी पुतळा असतो. दोन जुआनला त्या पुतळ्याची ओळख पटते. कारण तो 'त्या' कमांडरचा पुतळा असतो. ती स्त्री आत गेलेली त्यानं पाहिली आणि त्याला लांबून असं दिसलं की ती त्या सुंदर थडग्यावर झुकली आणि तिचा मुक्त काळाभोर केशपाश त्या संगमरवरावर विखुरला. पण ही दोना अन्ना काही त्याला सबंध दिसली नाही. पण जात असताना बुरख्यातून फक्त तिची पावलं दिसली. पण लेपोरल्लो त्याला म्हणतो : ''तुला काय ? नुसती पावलं दिसली तरी कल्पनेनं तू तिला संबंध पाहू शकतोस. कारण तू दोन जुआन् आहेस.'' नंतर त्याला दोना अन्ना पुरती पाहायला मिळते आणि खरोखरच सुंदर असते. तो मोहित होतो. आणि मग ती रोज तिथं येते हे पाहून, 'फादर'चं रूप घेऊन तो एक दिवस दफनभूमीजवळ थांबतो. ती येते : तिला वाटतं आज कुणी नवीन फादर आलेला आहे. तो तिच्याबरोबर आत जातो. ती त्याला म्हणते... ''चला फादर, तुम्ही आज माझ्या प्रार्थनेच्या सुरात सूर मिसळा.'' पण याचा सूर वेगळाच लागलेला असतो. तो म्हणतो : ''मला तुमच्या तुमच्या सुरांत माझा पापी सूर मिसळता येणार नाही.'' ती विचारते : ''कां ?'' तो सांगतो : ''कारण... दोनचार दिवस मी तुम्हांला पाहतो आहे. तुमच्याबद्दल मला फार... मी वेगळा माणूस आहे : तुम्ही समजता तसा फादर वगैरे नाही आहे. मी दोन दिएगो नावाचा गृहस्थ आहे. आणि मला तुमच्या बद्दल फार फार फार ... फार फार वाटतं.'' (फार फार म्हटलं की त्यात सगळं काही येतं !)

ती म्हणते : ''त्याचं काय आहे... हे कबरस्तान आहे. इथं माझ्या नवऱ्याच्या थडग्याजवळ, दुरून पुतळा पाहतो आहे अशा वेळी तुम्ही असा विषय काढणं... आणि तेही अंगावर असा यतिवेश असताना... हे काही बरं नाही.''

''इथं बोलता येत नसेल तर तुम्ही बोलावलं तर मी तुमच्या घरी येईन ना.'' शेवटी तो इतका गळी पडल्यावर दोना अन्ना म्हणाली, ''ठीक आहे. उद्या तुम्ही संध्याकाळी - जरा उशिराच - माझ्या घरी या. कारण हल्ली मी पुरुषांना भेटत नसते. माझं 'हे असं' झाल्यापासून त्यांच्याशी बोलत नसते.''

खरं म्हणजे पहिल्या दिवशीच कबरस्तानाजवळ भेटलेल्या एका फादरनं त्याला हे सांगितलेलं असतं. या बाई कोण, कुठल्या याची दोन जुआननं फादरकडं चौकशी केल्यावर त्यानं सांगितलं होतं की या बाई अशा आहेत. यानं विचारलं होतं : ''त्या सुंदर आहेत काय ?''

मग आधीचा तो खराखुरा फादर म्हणाला होता : ''आम्ही मठवासींनी स्त्रियांच्या सौंदर्याबद्दल बोलणं बरं नव्हे. पण तरीसुद्धा सत्य न सांगणं हे पाप ठरेल; म्हणून सांगतो की ही बाई अत्यंत सुंदर आहे.'' त्या वेळी त्या फादरनं त्याला हेही सांगितलं होतं :''पण ती पुरुषाशी कधीच बोलत नसते.'' त्यावेळी दोन जुआननं त्याला विचारलं : ''मग ती तुमच्याशी कशी बोलते ?'' तो म्हणाला : ''आमची गोष्ट वेगळी आहे. कारण आम्ही फादर आहोत.'' पुश्किन असा सहज विनोद करतो.

'हा' चमत्कारिक फादर जेव्हा दोना अन्नाला दिसला तेव्हा तिलाही कुतूहल वाटलं असावं की, हा कोण का असेना; फादर असेना नाहीतर दोन दिएगो असेना - हा काय म्हणतो ते तरी पाहू; आणि म्हणून ती त्याला दुसऱ्या दिवशी संध्याकाळी घरी बोलावते.

दोन जुआन मोठ्या आनंदात दफनभूमीच्या बाहेर येतो आणि आपल्या जोडीदाराला - लेपोरेल्लोला - म्हणतो : ''वा !'' लेपोरेल्लो विचारतो : ''का ? काय झालं ?'' तुम्ही हा वेष चढवून गेला होता. तेव्हा तिनं तुमचे आशीर्वाद घेतले असतील.'' तो म्हणतो : ''नाहीं, तसं नाही. उद्या मला तिनं घरी बोलावलेलं आहे. संध्याकाळी. तेव्हा तू असं कर. समोर तो पुतळा आहे ना ? तो - कमांडरचा पुतळा ? त्याच्याकडं जा आणि त्याला सांग : 'माझा धनी, दोन जुआन हा तुला आमंत्रण देतो आहे की, उद्या रात्री, तू तुझ्या त्या सुंदर विधवेच्या घरी, तिचं दार राखायला तू ये. कारण मी तिथं जाणार आहे ?''

लेपोरेल्लो म्हणतो : ''काय सांगताय् तुम्ही ? मी जाऊन त्या पुतळ्याला हे सांगायचं ? हे सांगायचं ? आणि तेही पुतळ्याला ?''

''हो.''

''जमणार नाही''

''जा तर खरा, असा काय भितोस ? जा.''

लेपोरेल्लो पुढं जातो. त्या मोठ्या पुतळ्याकडं पाहून दोन जुआनला हसू आलेलं असतं. तो म्हणतो : ''काय गंमत आहे या लोकांची !'' प्रत्यक्षात हा माणूस जेमतेम चार फूट नव्हता; तो माणूस केवढा अगडबंब इथं दाखवला आहे ! फार मोठा विनोद आहे !'' असा पुतळ्यांवरचा विनोद देखील पुश्किननं जाता जाता केलेला आहे. (पुश्किनच्या पुतळ्याचं चित्र मी पाहिलं आहे. पण तिथं त्यानं केलेल्या विनोदाला मात्र वाव नाही.)

तेव्हा हा लेपोरेल्लो पुतळ्याकडं जातो आणि सांगतो की माझ्या धन्यानं असं असं निमंत्रण दिलं आहे. आणि गंमत अशी की तो पुतळा मान हलवतो. हा ओरडत येतो : अगदी फाल्गुनी वाद्य वाजवत परत येतो. आणि म्हणतो : ''मेलो ! मेलो !''

''अरे काय झालं ? सांगितलंस का तू त्याला?''

''हो. मी सांगून आलो. त्यानं मान हलवली.''

''अं? काहीतरी काय सांगतोस ?''

''नाही. तुम्ही स्वत: जाऊन पहा.''

दोन जुआन स्वत: जाऊन त्याला पुतळ्याला सांगतो आणि पुतळा परत मान हलवतो. आणि मग दोघेही चकित होऊन तिथून निघून जातात.

दुसऱ्या दिवशी रात्री ठरल्याप्रमाणं दोन जुआन हा दोना अन्नाच्या घरी जातो. (अर्थात्, लेपोरेल्लोला त्यानं बरोबर नेलेलं नसतं. कारण अशा नाजूक प्रसंगी त्यानं एकट्यानं जाणं स्वाभाविक आहे.) त्यांची भेट होते. बोलता बोलता तिच्या नवऱ्याविषयीचा विषय निघतो. त्या कमांडरचा आणि त्याच्या मृत्यूबद्दलचा. अजून ती इतकी सुंदर आहे आणि तरीही विधवा आहे याबद्दल साहजिकच दोन जुआन हळहळ व्यक्त करतो. नंतर विषय निघतो तो त्याच्या खुन्याबद्दलचा, दोन जुआन तिला विचारतो : ''तू तुझ्या नवऱ्याचा खुनी पाहिला आहेस का ?'' ''ती म्हणते'' ''नाही''

''तुला त्याच्याबद्दल काय वाटतं?''

''काय वाटणार ? माझ्या नवऱ्याचा खून करून त्यानं माझं सर्वस्व हिरावून घेतलं. त्यामुळं त्याच्याबद्दल वाटायचं तेच मला वाटतं.''

''तो तुझ्यापुढं उभा राहिला तर तू काय करशील?''

''क्षणाचाही विचार न करता मी त्याच्या छातीत तलवार खुपसेन.''

मग तिला तो जे काही सांगतो, त्यात केवढं नाट्य आहे आणि इथं अभिनयाला देखील केवढा वाव आहे हे नाट्यविशारदांनी ध्यानात घ्यावं. तो सांगतो : ''तर मग ही इथं आहे छाती.''

''म्हणजे ? तुम्ही दोन जुआन ? नाही.''

''होय. मीच तो.''

आपण खरंच कोण आहोत हे तो लपवून ठेवत नाही. जे घडलं होतं त्याचं स्पष्टीकरण तो देतो. आणि दोना अन्ना त्याचा स्वीकार करते.

एवढ्यात दार ठोठावलं जातं आणि अशावेळी साहजिकच दोना अन्ना दोन जुआनला आत कुठंतरी लपायला सांगते. ती दार उघडते. किंचाळते आणि खाली कोसळून पडते. संगमरवरी पाहुणा आत आलेला असतो. दोन जुआन पुढं जातो. त्याच्याशी पुतळा हस्तांदोलन करून बोलू लागतो : ''तुझ्या निमंत्रणाप्रमाणं मी आलो आहे.'' त्याच्या दगडी हातांच्या पकडीत दोन जुआनचा नुसता हातच नव्हे तर त्याचा प्राणही कासावीस व्हायला लागतो. तो अस्वस्थ व्हायला लागतो : अर्धमेला होतो. नंतर पुरताच मरतो.

इथं हे नाट्य संपतं. ही नाट्यकृती संपते. या ठिकाणी केलेलं प्रेमाचं चित्रण हे आपल्याकडल्या प्रेम आणि मरण या कृतीचं स्मरण करून देणारं जसं आहे, तसंच प्रेमासाठी मरण पत्करणारा दोन जुआन रंगवताना पुश्किननं आपल्या प्रेमकथांसंबंधी जे बोललं जातं त्याला परस्पर उत्तर दिलं असण्याची : आपलं प्रेम हे जातिवंत प्रेम कसं आहे हे या नाट्यकृतीतून सुचवलं असण्याची शक्यता आहे.

शेवटी : 'मत्स्यांगना' ('रुसाल्का' : १८३२) या पुश्किनच्या काव्यनाट्याचा ओझरता उल्लेख मी करतो. एका पाणचक्कीवाल्या म्हाताऱ्याच्या तरुण पोरीला एका 'प्रिन्स' कसा फशी पाडतो आणि नदीत जीव दिल्यानंतर ती मत्स्यांगना बनून अखेर कसा बदला घेते याचं हे अद्भुत चित्र आहे. प्रेम करताना स्वतंत्र - (अगदी त्सारसारख्या स्वतंत्र - असणारा हा प्रिन्स लग्न करताना मात्र रूढींचा 'गुलाम' आहे. या नाट्यकृतीचा शेवट अतिशय सुबक आणि परिणामकारक आहे. पुश्किनचा एक सर्फच्या मुलीशी जुळलेला संबंध आणि त्याच्यापासून तिला झालेली अपत्यप्राप्ती या दंतकथेतील 'सत्य' इथं 'नाट्य' बनलं असण्याची शक्यता आहे असं मला वाटतं.

पुश्किनच्या वाङ्मयासंबंधी जे विवेचन मला करायचं होतं ते संपूर्ण केलं आहे असं नाही : केलं नाही असंही नाही. वास्तविक पुश्किनच्या प्रमुख वाङ्मय कृतींचा विचार मी केलेला आहे. कदाचित एक प्रश्न आपल्या मनात येईल तो असा की, पुश्किनचं आणि आमचं काय नातं आहे : आज, आजच्या संदर्भात हा पुश्किन आम्हांला का स्मरणीय वाटावा ?

पुश्किनच काय, तर पुश्किनचा हा देश, पुश्किनची ही संस्कृती, पुश्किनची भाषा ही आपल्याला इतकी जवळची आहे की ती आपल्याला भारतीयांना बिलकूल परकीय वाटू नये. आणि जेव्हा आज देशादेशांमधील भिंती कोसळून पडल्या पाहिजेत; संबंध जग एक झालं पाहिजे; त्यावेळी तर निदान आपल्या शेजारी असलेल्या, आपल्या संस्कृतीशी जवळीक असलेल्या, पुश्किनच्या भाषेचा,

पुश्किनच्या वाङ्मयाचा नुसता आस्वादच नव्हे, तर अभ्यासही झाला पाहिजे.

कारण एकाच गोष्टीचा मी ओझरता उल्लेख करतो की, संस्कृतला रशियन इतकी जवळची आहे; पालीला इतकी निकटची आहे, की या दोन भाषांतील आपण वापरत असलेले कितीतरी शब्द रशियनमध्ये आढळत असल्यानं ती भाषा आपल्याला आपलीच वाटावी अशी आहे. ही स्वतंत्र विवेचनाचा विषय असल्यानं केवळ दोन-तीन उदाहरणं देतो.

संस्कृतमधला 'मध' हा रशियनमधला 'म्योद्' असतो. संस्कृतमधला 'चषक' रशियनमध्ये 'चाषका' होतो : 'नक्त' ही 'नोच' बनते. ज्याच्यावर आपण रोज बसतो तो 'दिवान' : रशियनांचा पण 'दिवान'च असतो.

त्यांचे रीतिरिवाज आणि आपले रीतिरिवाज हे किती सारखे आहेत हाही स्वतंत्र विषय आहे. पण गंमत म्हणून सांगतो. देवापुढं दिवा लावण्याचा उल्लेख रशियन वाङ्मयात - पुश्किनच्या वाङ्मयात - येतो. एवढंच नव्हे, तर पाहुण्यांचं स्वागत करीत असताना त्याच्याकडं - सोल् स्लेब' म्हणजे मीठ आणि पाव हे एका तबकात घालून, ते वस्त्रानं झाकून पाहुण्याला दिले जातात. 'मीठ आणि पाव' व आमची 'मीठभाकर' यांत काय फरक आहे याचा मनोमनी शोध घ्यावा.

तुलनात्मक वाङ्मयाभ्यासाची तर नितांत गरज आहे. वाङ्मयांचे तौलनिक अभ्यास (Comparative Literature) करण्याचे नवे नवे उपक्रम हाती घेण्याची मोठी आवश्यकता आहे. वेगवेगळ्या दिशांनी वेगवेगळ्या भाषांच्या संदर्भात तौलनिक वाङ्मयाभ्यास झाले पाहिजेत. आणि याची जाणीव पुश्किन सारख्या श्रेष्ठ प्रतिभावंताचं वाङ्मय वाचत असताना तीव्रतेनं होते. मला कुणीतरी विचारलं, ''पुश्किन ज्या काळात लिहीत होता त्या काळात आपल्याकडं मराठी वाङ्मयाची परिस्थिती काय होती ?'' मी त्यांना एवढंच म्हणालो : ''पुश्किनच्या काळाचा, त्याच्या जन्ममृत्यूच्या सनांचा मी पुन्हा एकदा उच्चार करतो. आपण महाराष्ट्रातल्या, मराठीतल्या त्या कालखंडावर नजर टाका. १७९९ ते १८३७.''

तुलना करायची असते ती श्रेष्ठ - कनिष्ठ ठरवण्यासाठी करायची नसते. पण तुलनेनं, एका विशिष्ट कालखंडात वेगवेगळ्या ठिकाणी नवनिर्मिती करणारी प्रतिभावंत मनं कशी निर्माण झाली, याचा आपल्याला आवाका येणं, एका विशिष्ट (Perspective) प्राप्त होणं शक्य असतं. यासाठी त्या कालखंडांवर दृष्टिक्षेप टाकायचा असतो. त्या काळात आमच्याकडं काही नव्हतं, पण रशियात पुश्किनसारखा आधुनिक रशियन वाङ्मयाचा जनक निर्माण झाला अशा तऱ्हेचं विधान करण्यात फारसं हशील नसतं; तसं विधान करूही नये.

पुश्किनबद्दल बोलणं हा एक मोठा आनंद होता / आहे. पुश्किनच्या बरोबर पुश्किनच्या वाङ्मयविश्वात फिरणं हाही अलौकिक समाधानाचाच भाग. पुश्किनचं जग त्याच्याबरोबर हिंडून आपण पाहिलं. त्यानंच 'यिव्गेनी अनेगिन'च्या शेवटी म्हटल्याप्रमाणं, या जगात फिरून शेवटी आपण आता किनाऱ्यावर आलो आहोत. आपण किनाऱ्याबरोबरच, त्या जगाचं, त्या जगातल्या अद्भुत मानवी जीवनाचं, त्यातल्या सौंदर्याचं, त्यातल्या सुखदुःखांचं भान ठेवूया. आणि माणसाचं जीवन कुठंही, कोणत्याही काळात सारखंच असतं हे सत्य पटवण्याचं पुश्किनचं सामर्थ्य या किनाऱ्यावर उतरल्यावर आठवूया : ते लक्षात ठेवूया. आणि पृथ्वीवर निरनिराळ्या

ठिकाणी मातीचा रंग वेगळा असला, तरी तिच्यावर छत्र धरणारं आकाश मात्र सगळीकडं सारखंच असतं. कुठं ते निळं असेल, कुठं गहिरं असेल; कुठं निरभ्र असेल तर कुठं झाकळलेलं असेल; एवढंच. या पृथ्वीवर जरी सुख निर्माण झालं नाही, तरी इथं शांती असावी हे स्वप्न पुश्किननं जन्मभर उराशी जपलं होतं. पुश्किनच्या अभ्यासाची - विशेषत: आज - मला यासाठी गरज वाटते की, जेव्हा पृथ्वीवर एक नवा वसंतऋतू येण्याची आवश्यकता आहे; असा वसंतऋतू येत असल्याची चाहूल काही ठिकाणी लागते आहे; अशावेळी तर स्वत: वसंतऋतू असलेल्या, वसंतऋतूचं प्रतीक असलेल्या पुश्किनचं, पुश्किन नावाच्या सकाळचं आपण स्मरण केलं तर, आपल्याकडं देखील वसंत फुलायला, वसंताचे वारे वाहायला ते पुष्कळ साहाय्यक ठरेल. जिच्या 'रूपा'चा, 'आत्म्या'चा आणि 'विभ्रमा'चा मी आपल्याला थोडाफार परिचय करून दिला त्या पुश्किनच्या कवितासखीचा आपल्यालाही ध्यास लागला तर धन्यता वाटेल.

१ । काळी शाल :

टाकतो नजर वेड्यासारखा शालीवर काळ्या,
आणि वेदना टाकते चिरून आत्म्याला थंडावलेल्या.
जेव्हा होतो मी भाबडा आणि बराचसा पोरकट,
करत होतो प्रेम एका ग्रीक पोरीवर उत्कट.

खुबसुरत पोरीनं केले माझे लाड पुष्कळ,
पण लौकरच पोचलो मी काळ्या दिवसांजवळ.
एकदा मी विलासी पाहुण्यांना बोलवलं,
तिरस्करणीय ज्यूनं माझं दार ठोठावलं;

''तुझ्याकडं आहेत जेवत दोस्त (तो कुजबुजला),
पण फसवलंय् तुझ्या ग्रीक पोरीनं तुला.''
मी दिलं त्याला सोनं आणि दिल्या शिव्या त्याला
आणि बोलावलं माझ्या घरातल्या गुलामाला.

आम्ही निघालो; मी सुटलो सुसाट घोड्यावरून,
आणि दुबळी खंत राहिली मनात मौन धरून.
पाहिला न पाहिला मी ग्रीक पोरीचा उंबरा,
डोळे अंधारले, मी कोसळलो पुरा.....
दूरच्या खोलीत शिरतो मी एकटा....

बेइमान पोरीला होता चुंबत अर्मेनियन छाकटा;
सगळा झाला अंधार; तळपतं पातं;
थांबवायचं चुंबन नीचाला जमलं नव्हतं.

तुडवलं मी पुष्कळ धड शिरावेगळं
आणि पोरीकडं पांढऱ्याफटक मुक्यानं पाहिलं.

मला आठवतं आर्जव....वाहणारं रक्त....
नष्ट झाली ग्रीक पोर....प्रेम झालं नष्ट !

निष्प्राण तिच्या डोक्यावरली काळी शाल खेचून,
रक्ताळलेलं पातं मी निमूट दिलं फेकून.

गुलामानं माझ्या, जेव्हा सांजावत होतं,
'दुनाय'च्या लाटांत त्यांची फेकली प्रेतं.

तेव्हापासून नाही चुंबत डोळे जादूगार,
तेव्हापासून नाहीत माहीत रात्री बेदरकार.
टाकतो नजर वेड्यासारखा शालीवर काळ्या,
आणि वेदना टाकते चिरून आत्म्याला थंडावलेल्या.

●

२ । चादायेवला :

प्रीतीच्या, आशेच्या, धिम्या कीर्तीच्या
काही काळ पोसलं आम्हांला भ्रमानं,
लोपल्या क्रीडा यौवनाच्या,
स्वप्नाप्रमाणं, सकाळच्या धुक्याप्रमाणं;
तरी आमच्यांत धगधगते आकांक्षा अजून;
जोखडाखाली सत्तेच्या प्राणघातक
अंत:करणानं उतावळ्या उत्सुक
देशाची हाक ऐकतो ध्यान देऊन.
आम्ही पाहतो वाट झुरणीनं आनंदाच्या
क्षणांची मुक्तीच्या पावन,
जसा पाहतो वाट प्रेमिक चिरयौवन
क्षणांची इमानी भेटीच्या.
जोवर स्वातंत्र्यानं आहोत पेटत आपण,
हृदयं जिवंत सन्मानासाठी जोवर,
माझ्या मित्रा, देशाला करू अर्पण
आत्म्याचे उद्रेक सुंदर !
दोस्त, विश्वास ठेव : तो चढेल उगवून,
तारा भाग्याचा मनोहर;
रशिया उठेल झोपेतून खडबडून
आणि हुकूमशाहीच्या अवशेषांवर
ठेवतील आपली नावं लिहून !

●

३. खोल तळाशी सिबीरमधील खाणींच्या :

खोल तळाशी सिबीरमधील खाणींच्या
ठेवा जपून अभिमानी धीर,
जाणार नाहीत व्यर्थ तुमचे करुणोदात्त श्रम
आणि विचारांचे उत्तुंग उन्मेष.
दुर्दैवाची इमानी बहीण -
आशा-उदास अंधारकोठडीत
जागवील उत्साह आणि उल्हास,
येईल अपेक्षित इष्ट वेळ :
प्रेम आणि सौहार्द तुमच्यापर्यंत
येऊन पोचेल विषण्ण कड्या कुलुपांतून,
जसा तुमच्या दु:शासित गुहांपर्यंत
पोचतो माझा मुक्त आवाज.
शृंखला अवजड पडतील गळून,
अंधारकोठड्या कोसळतील - आणि स्वतंत्रता
तुमचं करील स्वागत हर्षानं प्रवेशद्वाराशी,
आणि तुमचे भाई तुम्हांला तलवार देतील परत.

४. अरिओन :

आम्ही होतो पुष्कळजण जहाजात;
काहींनी शिडं उभारली,
दुसऱ्यांनी एकदिलानं घुसवली
समर्थ वल्ही खोलवर, नीरवतेत.
चाकावर झुकून, आमचा कर्णधार चतुर
मुक्यानं होता चालवत अवजड जहाज;
आणि मी - निश्चिंत विश्वासानं तुडुंब-
नाविकांसाठी होतो गात....एकदम मांडी लाटांची
आघाताबरोबर विस्कटून बनली घोंगावणारं वादळ.
झाले नष्ट कर्णधार आणि नाविक !....
फक्त मी, गुप्त गायक-
किनाऱ्यावर फेकला गेलो वादळानं;
मी पहिली स्तोत्रं आहे गात
आणि ओली 'वस्त्रं' माझी
आहे सुकवत उन्हात खडकाखाली

संगमरवरी पाहुणा

(नाट्य-काव्य)

दृश्य १

(दोन जुआन आणि लेपोरेल्लो)

दोन जुआन

पाहू या वाट इथं, रात्र होण्याची. हं, अखेर
गाठली आपण माद्रिदची वेस; लौकरच तरंगेन मी
ओळखीच्या रस्त्यांवर, मिशा अंगरख्यानं लपवून
आणि भिवया टोपीनं. काय वाटतं तुला ? ओळखणार
नाही ना कुणी मला ?

लेपोरेल्लो

होय ! कठीणच आहे दोन जुआनला ओळखणं !
असले त्याच्यासारखे आहेत पुष्कळ !

दोन जुआन

थट्टा करतोस ?
पण खरंच, कोण बरं ओळखू शकेल मला ?

लेपोरेल्लो

रात्रीच्या पहिल्या प्रहराचा एखादा पहारेकरी,
अगर रस्त्यावरचा एखादा झिंगलेला गाणारा-बजावणारा,
अथवा तुझाच भाईबंद - कुणी उतावळा शिलेदार
बगलेत तरवार अडकवलेला, नखशिखान्त पोषाखातला.

दोन जुआन

कोसळणार काय म्हणा संकट, जरी ओळखलं तरी !

एवढंच की नको भेटायला मला खुद्द राजाच. तरीही,
मी कुणाला तसा साऱ्या माद्रिदमध्ये नाही भीत.

लेपोरेल्लो

पण उद्याच राजाच्या कानी जाईल की,
दोन जुआन विजनवासातून परवानगीशिवाय
माद्रिदमध्ये झालाय् हजर. तेव्हा सांगा,
तो तुमचं काय करील?

दोन जुआन

पाठवील माघारी.
पण नक्कीच माझं डोकं नाही उडवणार.
असं बघ, मी नाही कधीच सरकारचा गुन्हेगार.
मला हद्दपार केलं त्यानं माझ्याबद्दलच्या प्रेमापोटीच;
ज्याची मी कत्तल केली, त्याच्या नातेवाईकांनी
घेऊ नये सूड, करू नये अवमानित मला, म्हणून.

लेपोरेल्लो

ठीक, तसंच आहे खरं.
मग तिकडंच का नाही राहात सुखरूप निवान्त ?

दोन जुआन

वेड्या लेपोरेल्लो !
मी जवळ जवळ मेलोच होतो कंटाळ्यानं तिथं.
काय ते लोक ! काय तो मुलुख ! आणि आकाश ?
निव्वळ, पडदा धुराचा. आणि तेथल्या बायका ?
- इकडं देतोय्स ना लक्ष माझ्या वेड्या लेपोरेल्लो ?
आमच्या अंदालुझियाच्या सामान्यातल्या सामान्य
कुणबिणींच्या मोबदल्यात नसत्या स्वीकारल्या मी
त्यांच्यातल्या उत्तमातल्या उत्तम लावण्यवती, खरंच,
नसत्या स्वीकारल्या. अर्थात् एक एवढं मला कबूल
करायलाच हवं की सुरुवातीला आवडल्या मला त्या-
त्यांच्या निळ्या डोळ्यामुळं, त्यांच्या गौर कांतीमुळं;
त्यांच्या विनयामुळं, त्यांच्यातील नवलाईच्या
नव्हाळीमुळं.
पण कृपा देवाची, लौकरच कळून चुकलं, दिसलं मला -
की पापिणी त्या; आणि उमजलं की त्यांच्यांत

नाही जीव तसा....सगळ्या बाहुल्या मेणाच्या.
आणि आता आपल्या!... पण हे बघ, ही जागा
दिसते परिचयाची; ओळखलीस की नाही ?

लेपोरेल्लो

कसं बरं नाही ओळखणार ? अंतोनच्या मठाची तर
पक्की आठवण मला. तुम्ही मला तिथल्या झाडीत
सोडून गेलात निघून, आणि सांभाळीत बसलो मी
घोडे तिथं - खरंच किती कंटाळवाणं काम होतं ते !
आणि धनीसाहेब, तुम्ही मात्र खात्रीनं अधिक मजेत
इथं घालविला काळ. माझ्यापेक्षा.

दोन जुआन

(विचारात गढून)

बिचारी इनेझा !

नाही ती आता या जगात, एके काळी किती उत्कट
प्रेम केलं मी तिच्यावर !

लेपोरेल्लो

इनेझा ! हां, आठवलं....काळ्याभोर डोळ्यांची
छोकरी ! तीन महिने लागले तिची मर्जी मिळवायला
तुम्हाला....अखेर सैतानानंच दिला मदतीचा हात.

दोन जुआन

जुलैचा महिना....आणि ती रात्र, एक चमत्कारिक
आकर्षण
आढळलं मला तेव्हा तिच्या उदास नजरेत,
आणि बधिर ओठांत. सारंच मुलुखावेगळं.
मला आठवतं, तुला नव्हती वाटली ती लावण्यवती.
आणि खरंच, नव्हतं तिच्यात अस्सल सौंदर्य.
डोळे, नुसते डोळे आणि नजर - अशी नजर मी
अन्यत्र कुठंच नव्हती पाहिली. आणि स्वर तिचा
होता मृदू आणि क्षीण - दुखणाईत स्त्रीच्याप्रमाणं.
नवरा तिचा होता निष्ठुर पशू, बदमाष, पण
उमजलं मला तेही उशिराच. बिचारी इनेझा !

लेपोरेल्लो

त्या गोष्टीचं काय आता ! तिच्यानंतर दुसऱ्याही
होत्याच...

दोन जुआन

तेही खरंच,

लेपोरेल्लो

आणि हयात असली तरी आणखीही अजून दुसऱ्या....

दोन जुआन

होय, तसंच.

लेपोरेल्लो

बरं, पण आता या सायंकाळी अंधाऱ्या माद्रिदमध्ये
कुणा बयेकडं जायचं आपण?

दोन जुआन

अर्थात् लाउराकडं ! सरळ तिच्याकडंच जाईन मी - स्तुतीची फुलं
उधळायला.

लेपोरेल्लो

चला, छान.

दोन जुआन

थेट तिच्या दाराशीच. आणि दुसराच कोणी पाहुणा
असेल घेत पाहुणचार अगोदरपासून, तर
त्याची रवानगी खिडकीतून सरळ खाली !

लेपोरेल्लो

तसंच करायला हवं. चला. रंगात आलो आहोत आपण.
मेल्या त्या गेल्या. त्या बायांचा विचारही आता
नाही दीर्घकाळ सतावत आपल्या मनाला,
(मठवासी प्रवेश करतो)

मठवासी

येईल ती आता इकडं.
पण कोण ही मंडळी ? दोना अन्नाची माणसं ?

लेपोरेल्लो

छे; छे; आम्हीच आमचे स्वत:चे धनी, आणि
करतो आहोत भटकंती आमच्याच मौज-मजेखातर.

दोन जुआन

पण पाहाता आहात कुणाची वाट तुम्ही ?

मठवासी

दोना अन्नाची. येणार आहे ती थडग्याकडं
आपल्या नवऱ्याच्या.

दोन जुआन

दोना अन्ना !
अरे बायको की काय त्या कमांडरची - मारल्या
गेलेल्या...
आठवत नाही मला....कोणी मारलं बरं त्याला ?

मठवासी

त्या पाखंडी, बेशरम, बदफैली दोन जुआननं.

लेपोरेल्लो

हो ! खरंच ! दोन जुआनची कीर्ती आहे पसरली.
प्रशांत मठातसुद्धा ! आणि गाताहेत स्तोत्रं त्याची
हे मठवासी !

मठवासी

कदाचित् असेल माहीत तुम्हाला तो ?

लेपोरेल्लो

माहीत ? छे :! बिलकूल नाही.
पण असते तरी कुठं स्वारी ही सध्या ?

मठवासी

दूर दूर आहे पाठविला त्याला
विजनवासात, हद्दपार करून.

लेपोरेल्लो

बरं झालं, बला गेली.

जेवढा अधिक दूर, तेवढं अधिक चांगलं.
अशा साऱ्या बदफैली नराधमांना तर माझ्यासारख्यानं
पोत्यात घालून फेकलं असतं समुद्रात.

दोन जुआन

काय, काय म्हणतोय्स तू ?

लेपोरेल्लो

गप्प बसा हो. मी मुद्दामच....

दोन जुआन

तर इथं पुरलं आहे त्या कमांडरला, नाही ?

मठवासी

हो इथंच, आणि त्याच्या बायकोनं उभारलं आहे स्मारक
त्याचं, येत असते रोज ती इकडं, करायला प्रार्थना
दिवंगताच्या आत्म्याच्या शांतीसाठी आणि ढाळायला
आसवं
त्याच्या थडग्यावर.

दोन जुआन

विलक्षणच म्हणायची ही विधवा !
आणि दिसायला जरा ठाकठीक ?

मठवासी

खरं म्हणजे नको विचलित व्हायला
आम्ही मठवासींनी सौंदर्यानं स्त्रियांच्या. पण आहे पाप.
खोटं बोलणं. नाही शक्य नाकारणं परमेश्वराच्या
प्रेषितालाही
तिचं अलौकिक सौंदर्य.

दोन जुआन

तरीच. उगाच नव्हता मत्सरी बनला दिवंगत कमांडर,
दोना अन्नाला ठेवायचा तो कोंडून घरात,
नाही कुणीही आमच्यापैकी साधं पाहू शकला तिला...
मला तर आवडेल बोलायला तिच्याशी दोन शब्द....

मठवासी

छे: ! दोना अन्ना पुरुषाशी नसते बोलत
कधीही.

दोन जुआन

मग तुमच्याशी तरी कशी फादर ?

मठवासी

माझी गोष्ट वेगळी. हे कपडे संन्याशाचे.
मठवासी ना मी. पण आलीच बघ ती इकडं. (दोना अन्ना प्रवेश करते.)

दोना अन्ना

फादर, उघडा दारं.

मठवासी

ही बघा उघडली लगेच, सिनोरा. पाहात होतो
तुमचीच वाट मी. (दोना अन्ना मठवासी यामागून जाते.)

लेपोरेल्लो

काय, कशी काय वाटली बाई ?

दोन जुआन

विधवेच्या काळ्या शोकवस्त्राच्या
बुरख्यात दर्शनच तिचं पुरतं अशक्य. कशीबशी नाजुक टाच
तेवढी मला दिसली ओझरती.

लेपोरेल्लो

तेवढंही पुरेसं तुम्हाला. तुमची कल्पनाशक्तीच टाकील
भरून इतर तपशील - विचारांच्या वायुवेगानं.
एखाद्या चित्रकाराप्रमाणं ती करील ते चित्र पूर्ण.
तिच्या लेखी सारखंच - असो सुरुवात कोठूनही.
भिवयांपासून असो की टाचेपासून.

दोन जुआन

ऐक, लेपोरेल्लो,
मी तिच्याशी करून घेणार आहे ओळख.

लेपोरेल्लो

व्वा ! जरूर करून घ्याल !

छान कल्पना आहे नाही! प्रथम नवऱ्याची वाट लावायची,
आणि नंतर त्याच्या विधवेच्या अश्रूंचा करायचा पंचनामा.
खरंच, कसलीच नाही उरली शरम !

दोन जुआन

बघ, रात्र झालीय् खरी, पण
चंद्रप्रकाशानं अंधार उजळवून टाकण्यापूर्वी - चंद्रोदय
होण्यापूर्वीच - आपण असायला हवं माद्रिदमध्ये.
(जातो.)

लेपोरेल्लो

हा स्पॅनिश उमराव !
आणि एखाद्या मामुली चोरासारखा पाहातो वाट
रात्र होण्याची, घाबरतो चंद्रोदयाला. कसलं हे
जिणं, परमेश्वरा ! त्याचे हे जगावेगळे उपद्व्याप -
डोक्याला हा नसता ताप तरी सहन करायचा
मी किती काळ ? आता तर अगदी हद्द झाली !

दृश्य २

(खोली. लाउराकडचं रात्रीचं जेवण.)

पहिला पाहुणा

शपथेवर सांगतो तुला, लाउरा, यापूर्वी कधीच
तू इतक्या परिपूर्णतेनं नव्हती केलीस भूमिका -
खरंच दैवीच होता आज संध्याकाळचा अभिनय.
तू स्वत:ची भूमिका किती अचूक घेतली होतीस समजून !

दुसरा

किती खुलवलीस ती ! केवढ्या समर्थपणानं !

तिसरा

केवढ्या कलात्मकतेनं !

लाउरा

होय, मला होता जमला
आज प्रत्येक हावभाव आणि शब्द.

मी मुक्तपणानं केलं होतं स्वाधीन स्वत:ला स्फूर्तीच्या.
शब्द होते वहात अंत:करणातून - माझेच स्वत:चे शब्द.
नव्हतं ते निर्जीव पाठांतर.

पहिला

खरं आहे.
आणि आतासुद्धा डोळे तुझे आहेत चमकत
आणि गाल झाले आहेत लाल, स्फूर्तीची ज्योत
तेवते आहे तुझ्यात तेवढ्याच उज्ज्वलपणे.
लाउरा नको देऊस विझू तिला निष्फळ;
गा, लाउरा, गा काहीतरी नवीन.

लाउरा

द्या तर मला तुमची गितार.
(गाते.)

सगळे

वा: ! शाब्बास ! शाब्बास ! अद्‌भुत! अप्रतिम !

पहिला

धन्यवाद जादुगारिणी ! तू हृदय
गुंगवतेस आमचं आपल्या जादूनं.
जीवनातील नाना सुखोपभोगात
एकट्या प्रेमालाच देतं संगीत स्वत:चं स्थान;
पण प्रेम देखील मधुर संगीतच....पहा -
खुद्द कार्लोसही, तुझा हा विमनस्क पाहुणा, हेलावलेला.

दुसरा

काय सूर ! कशा थरारून जाताहेत हृदयाच्या तारा !
पण शब्द कुणाचे, लाउरा ?

लाउरा

दोन जुआनचे.

दोन कार्लोस

काय ? दोन जुआन.

लाउरा

ते जुळवले कधी तरी, कसे तरी,

माझ्या त्या सच्च्या मित्रानं. माझ्या लहरी प्रियकरानं.

दोन कार्लोस

तुझा तो दोन जुआन पाखंडी आणि हरामखोर;
आणि तू, तू मूर्ख !

लाउरा

तुला वेड बिड लागलंय् की काय ?
आताच सांगते तुझे तुकडे तुकडे करायला
माझ्या नोकरांना; असलास तू जरी मोठा स्पॅनिश 'उमराव'.

दोन कार्लोस

(उठतो.)
बोलाव तर त्यांना.

पहिला

लाउरा, पुरे आता; दोन कार्लोस, रागावू नकोस. ती विसरली......

लाउरा

हेच ना ? की, जुआननं सरळ द्वंद्वात
मारलं ठार त्याच्या सख्ख्या भावाला ?
खरं आहे; खंत हीच की नव्हता तो.

दोन कार्लोस

मूर्खच मी, विनाकारण रागावलो.

लाउरा

अहाहा ! स्वत:च कबूल करतोस की, आपण मूर्ख म्हणून.
तर मग मिळवू या दोस्तीचा हात.

दोन कार्लोस

मी अपराधी. लाउरा,
माफ कर मला. पण जाणतेस तू, नाही शकत ऐकू
ते नाव मी अलिप्तपणानं....

लाउरा

पण नाइलाज आहे माझा - सतत येतं
माझ्या जिभेवर ते नाव, दोन कार्लोस.

एक पाहुणा

ठीक. गेला ना तुझा रुसवा, रागावणं ? खात्री पटव.
लाउरा, गा आणखी.

लाउरा

हो, निरोपादाखल.
जायची झालीय् वेळ आणि रात्रही. पण काय बरं मी गाऊ
हं, ऐका.

(गाते.)

सगळे

सुरेख ! अप्रतिम !

लाउरा

अच्छा तर, सद्गृहस्थहो.

पाहुणे

अच्छा, लाउरा.

(बाहेर जातात. लाउरा दोन कार्लोसला थांबवते.)

लाउरा

तू, रागोबा ! रहा इथं माझ्याकडं,
तू मला आवडलास; तू दोन जुआनची
आठवण करून दिलीस मला - तुझं तळमळीचं
शपथेवर बोलणं आणि दातओठ खाणं !

दोन कार्लोस

नशीबवान गडी खरा दोन जुआन !
इतकं तू त्याच्यावर करायचीस प्रेम ?

(लाउराचा होकारार्थी आविर्भाव.)

अतिशय ?

लाउरा

होय, अतिशयच.

दोन कार्लोस

आणि करतेस प्रेम त्याच्यावर अजूनही ?

लाउरा

काय ? या क्षणाला ?
नाही, नाही. अशक्य आहे मला प्रेम करणं
दोघांवर एकाच वेळी.
आता प्रेम करते आहे ते तुझ्यावरच.

दोन कार्लोस

सांग, लाउरा;
कितवं वर्ष तुला ?

लाउरा

अठरावं.

देन कार्लोस

तू आहेस तरुण....आणि असशील तरुण
आणखी पाच किंवा सहा वर्षं. सभोवती तुझ्या
आणखी सहा वर्षं ते होत राहतील गोळा -
करतील तुझे लाड, मर्जी मिळविण्यासाठी तुझी.
देतील भेटी, बोलतील गोड,
रात्रीच्या गवाक्ष-संगीतास राहतील रिझवत,
आणि तुझ्यासाठी एकमेकांना ठार देखील मारतील
चव्हाट्यावर रात्री. पण जेव्हा
काळ जाईल सरून, जेव्हा तुझे डोळे
दिसतील भकास आणि पापण्या सुरकतून काळवंडतील,
पहिल्यांदाच पांढरे केस तुझ्या अंबाड्यात चमकतील,
आणि लागतील म्हणायला तुला म्हातारी,
तेव्हा...काय म्हणतेस तू?

लाउरा

तेव्हा ? कशासाठी
त्यासंबंधी करायचा विचार ? कशासाठी हें बोलणं ?
की, तुझ्या नेहमी असल्याच कल्पना ?
ये - उघड ती खिडकी. किती शांत आकाश!
निश्चल उष्ण हवा; रात्र लिंबानं
आणि 'लाव्रा'नं आहे घमघमत; झगझगीत चंद्र
आहे चमकत निळाईवर घनदाट आणि काळ्या,

आणि पहारेकरी आहेत ओरडत
लांबवलेल्या सुरात : 'से रे नो ऽऽ!'
आणि दूरवर, उत्तरेत - पॅरिसमध्ये -
कदाचित असेल नभ मेघांनी झाकळलेलं,
असेल थंडगार पाऊस पडत आणि असतील वारे वहात.
पण आम्हांला त्याचं काय? ऐक, कार्लोस,
मी सांगतेय् तुला लाडकंसं स्मित करायला...
- हं, अस्सं!

दोन कार्लोस

काय जादूगारीण आहेस तू !
(दारावर खडखड.)

दोन जुआन

ए ! लाउरा !

लाउरा

कोण आहे तिकडं ? कुणाचा हा आवाज ?

दोन जुआन

उघड दार....

लाउरा

खरंच ! ....अरे, देवा ! ....
(दार उघडते, दोन जुआन प्रवेश करतो.)

दोन जुआन

नमस्ते. काय, कसं काय ?.....

लाउरा

दोन जुआन ! ! .....
(लाउरा त्याच्या गळ्यात पडते.)

दोन कार्लोस

हे काय ! दोन जुआन !.....

दोन जुआन

लाउरा, माझ्या लाडके !

(तिचं चुंबन घेतो.)
हा कोण इथं तुझ्याकडं, लाउरा ?

दोन कार्लोस

मी - दोन कार्लोस.

दोन जुआन

काय पण अनपेक्षित भेट !
तुझा समाचार घ्यायला बरं वाटेल मला - पण उद्या!!

दोन कार्लोस

नाही ! आत्ताच होऊन जाऊ दे !

लाउरा

दोन कार्लोस, पुरे !
तुम्ही नाहीत रस्त्यावर - तुम्ही आहात माझ्या घरात
कार्लोस, कृपा करून निघून जा येथून बाहेर.

दोन कार्लोस

(तिचं न ऐकता)

वाटच पाहात होतो मी.
माणसा, ये समोर. तुझ्याजवळ तलवार आहेच.

दोन जुआन

एवढा जर तुला
नसेल निघत धीर, तर तुझी मर्जी !
(लढतात.)

लाउरा

अग बाई ग ! जुआन !.....
(स्वत:ला बिछान्यावर झोकून देते.)
(दोन कार्लोस कोसळतो.)

दोन जुआन

ऊठ, लाउरा, संपलं !

लाउरा

काय झालं ?

मारलंस त्याला ! छान ! माझ्या खोलीत !
काय करू मी आता, बेमुर्वत सैताना ?
कुठं मी फेकू त्याचं हे प्रेत ?

दोन जुआन

थांब जरा. असेल कदाचित तो जिवंत अजून.

लाउरा

(प्रेत निरखते.)

होय ! आहे जिवंत !! धिक्कार असो तुझा.
थेट छातीत भोसकलं आहेस - नक्कीच नाही चुकायचा
तुझा नेम. सफाईदार तिकोनी जखम. पण रक्ताचा
थेंबही नाही ठिबकत. श्वासही बंद झालाय् पुरता. आता ?

दोन जुआन

मी तरी काय करू ?
त्यानंच आपणहून ओढवून घेतलं मरण.

लाउरा

जुआन, जुआन,
किती त्रासदायक हे सारं....सदान्‌कदा उपद्व्याप तुझे....
आणि तरीही नेहमीच निरपराधीपणाचा दावा....
जाऊ दे. कुठनं आलास तू ? खूप वेळ झालाय् का
तुला इथं येऊन ?

दोन जुआन

आताच तर आलो मी -'
तेही चोरट्यानं, गुपचूप. शिक्षेची माफी न मिळालेला.

लाउरा

आणि लगेच केलीस आठवण तुझ्या या लाउराची !
छानच केलंस. पण....पण विश्वास नाही माझा
तुझ्यावर.
जात असशील योगायोगानं इथून जवळून, आणि
सहज गेली असेल नजर घरावर माझ्या....

दोन जुआन

तसं नाही ग माझ्या लाउरा.
बघ विचारून हवं तर लेपोरेल्लाला. मुक्काम माझा
आहे शहराच्या बाहेर एका रद्दी गोठ्यात. मी आलो
माद्रिदमध्ये ते लाडक्या लाउराला भेटण्यासाठीच....

(तिचं चुंबन घेतो.)

लाउरा

माझ्या जिवलगा !
पण थांब....प्रेतासमोर हे सारं....छे !
ठेवायचं तरी कुठं त्याला ?

दोन जुआन

काय झालं.... पडू दे ते तिथंच. पहाट होण्याआधीच
घेऊन जाईन त्याला माझ्या बुरख्याखाली लपवून
आणि देईन ठेवून एखाद्या चव्हाट्यावर.

लाउरा

ठीक. पण घे खबरदारी
की पाहाणार नाही कुणी तुला. किती चांगलं झालं ते
की तू आलास मिनिटभर उशिरा. तुझी दोस्त मंडळी
होती इथं
जेवायला माझ्याबरोबर. एवढ्यातच गेले ते निघून बाहेर.
काय झालं असतं तुझी - त्यांची भेट झाली असती तर ?

दोन जुआन

ते जाऊ दे, एक मला सांग लाउरा
की बराच काळ करीत होतीस तू प्रेम त्याच्यावर?

लाउरा

का ? कुणावर ? तू बरळतोय्स असं दिसतं.

दोन जुआन

कबूल कर लाउरा,
सांग मला - किती वेळा तू केलीस प्रतारणा माझी

माझ्या पाठीमागं ?

लाउरा

आणि तू - छेलबटाऊ - तू सुद्धा ?

दोन जुआन

सांग मला....पण नकोच. हलवायला हवं त्याला
प्रथम. मग बोलू या नंतर.

दृश्य ३

(कमांडरचा पुतळा.)

दोन जुआन

असो. घडतं सारं काही ते भल्यासाठीच. झाला
तसा निष्काळजीपणाच ठार करण्यात दोन कार्लोसला;
आणि तेव्हापासून आहे मी लपून उथं, होऊन
शालीन मठवासी. पण इथंच पाहायला मिळतेय्
दररोज....दिवंगत कमांडरची बायको - ती लावण्यवती
विधवा.
तिनंही पाहिलेलं दिसतं मला. या घटकेपर्यंत
राखला आहे आब आम्ही एकमेकांचा, दूर राहून.
पण आहे करणार आज संभाषण तिच्याशी.
आली आहे वेळ. सुरुवात करायची कशी पण
बोलायला ?
''करतोय् तुमच्याशी बोलण्याचं धाडस....'' पण नको.
''सिनोरा....'' छे ! बोलेन झालं मनाला सुचेल ते
पूर्वतयारीवाचून, रचीत शीघ्र प्रेमाची गाणी ....
तिच्याविना जातोय् कंटाळून हा पुतळा कमांडरचा.
पुतळा ! केवढं प्रचंड बलदंड शरीर दाखवलंय् त्याचं !
कसे बळकट बाहू ! दुसरा हर्क्युलसच जणू !
पण प्रत्यक्षात दिवंगत कमांडर होता किती खुजा
आणि खुरटा ! प्रत्यक्षातला कमांडर राहून उभा
आपल्या चवड्यांवर, लांबवून आपल्या हाताचं बोट
नसता शकला करू स्पर्श पुतळ्याच्या नाकाला.
जेव्हा 'एस्कुर्याल' मागं पडली होती आमची गाठ,

तेव्हा झेपावला स्वत:हून आणि भोसकला गेला
माझ्या तरवारीच्या टोकावर - जमा टाचणीवर टोळ,
आणि संपली त्याची अखेरची धडपड ! पण होता तसा
मानी, साहसी आणि तडफदार.
वा: ! इकडंच येतेय् ती.

(दोना अन्ना प्रवेश करते.)

दोना अन्ना

पुनश्च हे मठवासी फादर इथं ! (त्याला उद्देशून) फादर,
मी आणला व्यत्यय तुमच्या चिंतनात - क्षमस्व.

दोन जुआन

नाही, सिनोरा. उलट मीच मागायला हवी क्षमा तुमची.
कदाचित तुमच्या पवित्र दु:खाला मुक्तपणं वाहू देण्यात
मीच आणतोय् अडथळा, माझ्या या उपस्थितीनं.

दोना अन्ना

नाही, फादर, माझ्या अंतर्यामीच असतो हा शोक.
पण तुमच्या उपस्थितीत माझ्या केविलवाण्या प्रार्थना
भिडू शकतील स्वर्गापर्यंत विनम्रपणे.
विनविते तुम्हाला -
मिळू दे तुमचाही स्वर माझ्या स्वरात, करतांना प्रार्थना.

दोन जुआन

मी...मी करायची प्रार्थना तुमच्याबरोबर दोना अन्ना!
मी नाही पात्र भाग्याला असल्या, धजणार नाही मी
पापी ओठांनी पुनरुच्चार करायला तुमच्या पवित्र
प्रार्थनेचा. नुसता दुरून आदरानं राहीन पाहात मी
तुमच्याकडं. जेव्हा टेकून गुडघे हळूच, टेकता माथा
तुम्ही फिकट संगमरवरावर, आणि तुमचे काळेभोर केस
विखुरलेले - तेव्हा वाटतं,
गुप्तपणे थडग्याला या, देते भेट देवदूती कुणी.
पण बेचैन हृदयात माझ्या नाही झरत प्रार्थना
या क्षणी, होतो नि:शब्द, चकित आणि करतो विचार - भाग्यवंत तो,
ज्याचं थंडगार संगमरवरी थडगं
झालेलं उबदार तिच्या स्वर्गीय श्वासांनी, आणि

भिजलेलं तिच्या कोवळ्या प्रेमाश्रूंनी....

दोना अन्ना

काय तरी चमत्कारिक बोलणं!

दोन जुआन

कसं बरं सिनोरा?

दोना अन्ना

मी....विसरलात तुम्ही.

दोन जुआन

काय? की बापडा, अपात्र मठवासी मी?
की पापी आवाज माझा नको घुमायला इथं
इतक्या मोठ्यानं?

दोना अन्ना

मला वाटलं की...नाही, नाही कळलं मला...

दोन जुआन

हाय! दिसतं मला : तुम्हाला कळलं आता
सगळं काही. सगळं!

दोना अन्ना

काय कळलं?

दोन जुआन

हेच की, मी नाही मठवासी!
क्षमा करा! भीक मागतो तुमच्या चरणापाशी क्षमेची...

दोना अन्ना

अरे, देवा! उठा, उठा... कोण तर तुम्ही?

दोन जुआन

दुर्दैवी बळी हताश वासनेचा.

दोना अन्ना

अरे माझ्या देवा! इथंसुद्धा, या थडग्यापाशी!

जा; बाहेर आत्ताच, जा राहू द्या मला एकटीला.

दोन जुआन

एकच क्षण, दोना अन्ना, एकच क्षण!

दोना अन्ना

जर कुणी आलं....!

दोन जुआन

दार आहे बंद. एकच क्षण, दोना अन्ना!

दोना अन्ना

काय? काय हवंय् तुम्हाला माझ्यापासून?

दोन जुआन

माझं मरण!

जर आला मला मृत्यू या क्षणी तुमच्या चरणांपाशी
तर पुरू देत हा दीन देह इथं -
पण तुमच्या प्रिय नवऱ्याच्या थडग्याशेजारी नव्हे,
नव्हे इथं, नव्हे जवळ. दूर कुठं तरी तिकडं -
दाराशी, अगदी उंबरठ्याच्या खाली.
नवऱ्याच्या दिमाखी थडग्यावर
वाकून ढाळायला केशकलापाची चवरी आणि अश्रू,
तुम्ही याल जेव्हा -
तेव्हा व्हावा स्पर्श तुमच्या पावलांचा, किंवा
तुमच्या वस्त्राच्या किनारीचा हलकेच माझ्या दगडी थडग्याला.

दोना अन्ना

वेड तर नाही ना लागलं तुम्हाला!

दोन जुआन

म्हणजे इच्छा करणं
मरणाची, ही खूण का वेडाची? दोना अन्ना!
जर असतो मी वेडा, तर असती केली इच्छा
जिवंत राहाण्याची, असती बाळगली मी आशा
तुमचं अंत:करण नाजूक प्रेमानं हेलावून टाकण्याची;
जर असतो मी वेडा, तर हेलावल्या असत्या रात्री

तुमच्या गच्चीखाली - तुम्हाला जागवत गवाक्ष - गीतांच्या
संगीतानं; नसतो राहिलो लपून वेषांतरित;
उलट धडपडलो असतो नजरेत भरण्यासाठी तुमच्या;
जर असतो मी वेडा, तर नसतो राहिलो असा
तळमळत निमूट.

दोना अन्ना

म्हणून का होता तुम्ही हे सारं सोसत मुकाट्यानं ?

दोन जुआन

योगायोग - केवळ योगायोग - दोना अन्ना,
लावत आहे मला बोलायला. नाहीतर तुम्हाला कधीच
नसतं कळालं माझं गुपित - कारुण्यानं ओथंबलेलं.

दोना अन्ना

खरंच, बराच काळ प्रेम करताय् तुम्ही माझ्यावर ?

दोन जुआन

बराच काळ की नुकताच - कळत नाही - माझं मलाच;
कळतं ते एवढंच की, तेव्हापासून समजली किंमत
मला या क्षणभंगुर जीवनाची; तेव्हापासूनच
समजला मला 'सुख' या शब्दाचा अर्थ.

दोना अन्ना

जा, जा येथून, भयंकर माणूस आहात तुम्ही.

दोन जुआन

भयंकर ! कसा बरं ?

दोना अन्ना

भीती वाटतेय् मला तुमचं ऐकून घ्यायची.

दोन जुआन

राहतो मी गप्प; पण नका लोटू दूर त्याला,
ज्याला तुमचं दर्शन हेच एकमेव सुख आयुष्याचं.
मी नाही बाळगत धीट, उतावळ्या आशा,
मी काहीही नाही मागत;

जर जगण्याची जन्मठेपच असेल वाट्याला माझ्या,
तर निदान तुमचं दर्शन तरी नित्य राहावं घडत.

दोना अन्ना

जा, कृपया जा येथून, असल्या जागी
नसतात करत कोणी अशी भलतीसलती बोलणी.
उद्या घरी या माझ्या. पण द्या आश्वासन मला
शपथेवर, की जपाल, सांभाळाल माझ्या प्रतिष्ठेला;
जराही ढळ न लावता.
मी तुमचं करीन स्वागत - नंतर - संध्याकाळी.
खरं तर विधवा झाल्या दिवसापासून नाही भेटले
मी कुणालाच आतापर्यंत.

दोन जुआन

देवदूती ! दोना अन्ना !
केवढं समाधान दिलंत तुम्ही या अभागी दु:खार्ताला !
तुम्हालाही देवो परमेश्वर तसंच उदंड सुख....

दोना अन्ना

कृपया आता तरी जा. राहू द्या मला थोडं एकटं.

दोन जुआन

आणखी एक क्षणभर.....

दोना अन्ना

आता खरोखर निघायलाच हवं मला.
तशात प्रार्थनेची मन:स्थितीही गेली पार बिघडून.
तुम्ही चाळवलंत मला इहपर बोलांनी तुमच्या.
गेल्या कित्येक दिवसांत नव्हतं मी ऐकलं असलं काही.
या उद्या घरी.....

दोन जुआन

नाही बसत अजून विश्वास माझा माझ्या सुदैवावर;
नाही हिंमत होत आनंदनिर्भर होण्याची.....
उद्या मी तुम्हाला भेटेन ! तेही इथं नव्हे. आणि
नव्हे चोरून!

दोना अन्ना

उद्या. होय उद्या.
काय नाव तुमचं ?

दोन जुआन

दिएगो दे काल्वादो.

दोना अन्ना

अच्छा, तर दोन दिएगो. घेते मी निरोप.
(जाते.)

दोन जुआन

लेपोरेल्लो !
(लेपोरेल्लो प्रवेश करतो.)

लेपोरेल्लो

काय हुकूम महाशय ?

दोन जुआन

प्रिय लेपोरेल्लो !
मी आहे सुखी ! उद्या सायंकाळी...उशिरानं...
दोस्ता, तयार रहा उद्या...
अगदी लहान मुलासारखा झालाय् मला आनंद !

लेपोरेल्लो

बोललात दोना अन्नाशी तुम्ही ? शक्य आहे,
बोलली असेल ती तुमच्याशी दोन प्रेमळ शब्द;
किंवा फादर! दिला असेल तुम्ही आशीर्वाद तिला !

दोन जुआन

नाही, लेपोरेल्लो, नाही ! भेट - दोघांची भेट -
ठरली आहे खास !

लेपोरेल्लो

खरंच !
विधवांनो, तुम्ही शेवटी सगळ्या अशाच !!

दोन जुआन

मी आहे सुखी !
वाटतं कवटाळावं साऱ्या जगाला प्रेमानं. गावं गाणं.

लेपोरेल्लो

पण कमांडर ? काय म्हणेल तो याबद्दल ?

दोन जुआन

तुला वाटतं, तो लागेल करायला मत्सर ?
मुळीच नाही; मोठा समंजस माणूस आहे तो.
आणि थडग्यात गाडला गेल्यापासून, त्याचं
उकळतं रक्त असेल झालं पार थंड....

लेपोरेल्लो

नाही, महाशय, पहा तरी त्याच्या पुतळ्याकडे.

दोन जुआन

का बरं ?

लेपोरेल्लो

वाटतं, की आहेत त्यांचे डोळे रोखलेले
रागानं तुमच्यावर....

दोन जुआन

खरंच ? तर माझ्या लेपोरेल्लो,
हो पुढं आणि दे आमंत्रण त्यालाही भेटीचं
माझ्याकडे. नाही, माझ्याकडे नाही - दोना अन्नाकडे.
तिच्या घरी, उद्या.

लेपोरेल्लो

पुतळ्याला भेटीला बोलवायचं ! कशासाठी ?

दोन जुआन

फालतू गप्पागोष्टी करण्यासाठी निश्चितच नाही !
जा, देऊन ये निमंत्रण पुतळ्याला
दोना अन्नाकडे उशिराचं सायंकाळी यायला, आणि
राहायला उभं दारापाशी पहाऱ्यासाठी.

लेपोरेल्लो

लहर येते तुम्हाला
करायची चमत्कारिक थट्टा कुणाचीही. जरा
विचार तर करा - कोण आहे ती स्वारी याचा.

दोन जुआन

हो पुढं.

लेपोरेल्लो

पण....

दोन जुआन

पुढं हो म्हणून सांगितलं ना.

लेपोरेल्लो

'सर्व पुतळ्यांत अत्यंत वैभवशाली, आदरणीय असलेल्या
हे पुतळ्या ! माझा धनी दोन जुआन
विनम्रपणानं देतोय् तुला निमंत्रण
भेटीला यायला...' देवाशपथ, सांगायचं कसं
कशासाठी बोलावलंय् ते...वाटते मला भीती.

दोन जुआन

भ्याडा ! मी आहे ना इथं.

लेपोरेल्लो

ठीक आहे तर.
'हा माझा धनी दोन जुआन देतोय् निमंत्रण
तुला भेटीला यायला उद्या संध्याकाळी उशिरा
तुझ्या सहचारिणीच्या घरी, आणि राहायला
उभं दाराशी तिच्या....'

(पुतळा संमतिदर्शक डोके हलवतो.)

बापरे !!

दोन जुआन

काय झालं ?

लेपोरेल्लो

बापरे ! बापरे ! मेलो !!

दोन जुआन

अरे, झालं तरी काय तुला ?

लेपोरेल्लो

(डोके हलवीत, थरथरत -)
तो...तो पुतळा....हाय देवा !

दोन जुआन

अभिवादन करतोय्स तू !

लेपोरेल्लो

नाही, मी नाही, दोन जुआन.
त्या पुतळ्यानंच हलवलं शिर !

दोन जुआन

काय मूर्खपणाची बडबड चालवलीय्स तू !

लेपोरेल्लो

जा, तुम्ही स्वत:च या पाहून.

दोन जुआन

रड्या कुठला ! बघ जातोय् मी स्वत:च.

(पुतळ्याला)

'कमांडर, मी निमंत्रण देतोय् तुला यायला
तुझ्या विधवेकडे उद्या रात्री - असेनच मीही तिथं -
आणि राहायला उभं पहाऱ्यासाठी दारात
तिच्या. काय ? येशील ना ?'

(पुतळा पुन्हा आपलं शिर हलवतो.)

अरे देवा !!

लेपोरेल्लो

नव्हतो का मी सांगत दोन जुआन तुम्हाला....

दोन जुआन

चल. निघू या आपण ताबडतोब इथून.

दृश्य ४

(दोना अन्नाची खोली)

दोना अन्ना

मी स्वागत केलं खरं तुमचं, दोन दिएगो,
पण वाटतं भय, की माझं उदास संभाषण
वाटेल तुम्हाला कंटाळवाणं - शोकमग्न विधवा मी
राहाते आठवत सर्वकाळ स्वत:ची बरबादी.
मिसळतात स्मितं माझी आसवांत - एप्रिलप्रमाणं.
पण सांगा, बोलत का नाही तुम्ही काहीच ?

दोन जुआन

खरोखर, शब्दांत नाही करता येत व्यक्त
आनंद मला याचा - की शेवटी लाभला एकान्त
या सुंदर दोना अन्नासमवेत इथं. तिथं नव्हे,
नव्हे थडग्याशेजारी त्या सुखी दिवंगताच्या -
आणि पाहतोय् तुम्हाला असं - नव्हे गुढगे टेकून,
विनीत होऊन संगमरवरी नवऱ्यापुढं.

दोना अन्ना

दोन दिएगो;
अस्सं, तर आहात मत्सरी तुम्ही. माझा नवरा
छळत तर नाही तुम्हाला अजून थडग्यातून ?

दोन जुआन

कशाला करीन मी मत्सर त्याचा ?
तो तर होता तुमच्या पसंतीचा नवरा,

दोना अन्ना

नाही, आईनंच माझ्या
द्यायला लावला माझा हात दोन अल्वारच्या हाती.
कारण आम्ही होतो गरीब आणि होता श्रीमंत
दोन अल्वार.

दोन जुआन

नशीबवान माणूस ! त्यानं खजिने रिते आपले
ओतले चरणांपाशी एका देवतेच्या, अन् मोबदल्यात
चाखला त्यानं स्वर्गीय आनंद ! जर का मी पूर्वीच,

तुम्हाला असतो ओळखत, केवढ्या उल्हासानं माझी प्रतिष्ठा; माझी
श्रीमंती, सगळं असतं दिलं,
सगळं - एका कृपाळू कटाक्षासाठी;
होऊन गुलाम मी सांभाळली असती तुमची क्षुल्लक मर्जीही.
सगळ्या तुमच्या लहरी मी असत्या जाणल्या
काय हवं आहे ते तुमचं तुम्हालाच कळण्यापूर्वी;
तुमचं जीवन व्हावं केवळ अखंड किमया म्हणून.....
हाय ! नियतीनं योजलं माझ्यासाठी दुसरंच.

दोना अन्ना

दिएगो, नका बोलू पुढं; मी करतेय् पाप,
तुमचं घेताना ऐकून; तुमच्यावर प्रेम करणं अशक्य मला,
विधवेनं पाहिजे असायला थडग्याशीसुद्धा इमानी,
कधी जर कळलं तुम्हाला, दोन अल्वार किती
माझ्यावर करायचा प्रेम ! हं, दोन अल्वारनं नक्कीच
नसतं केलं स्वागत स्वत:च्या प्रेमात पडलेल्या स्त्रीचं;
जरी असता तो विधुर, तो राहिला असता इमानी
वैवाहिक प्रेमाशी.

दोन जुआन

नका छळू हृदयाला
माझ्या, दोना अन्ना, सतत उल्लेखानं
नवऱ्याच्या, बस्स झाली तुम्ही मला केलेली शिक्षा,
जरी शिक्षेला त्या असलो मी पात्र,

दोना अन्ना

का बरं ?
तुम्ही माहीत बांधलेले पवित्र बंधनांनी माझ्याप्रमाणं
कुणाशीही. खरं ना ? प्रेम करताना माझ्यावर,
तुम्ही माझ्या दृष्टीनं आणि परमेश्वराच्या दृष्टीनं आहात
निरपराधी.

दोन जुआन

तुमच्या दृष्टीनं ! अरे देवा !

दोना अन्ना

खरंच का तुम्ही आहात अपराधी
माझ्या दृष्टीनं ? सांगा, कोणत्या बाबतीत ?

दोन जुआन

नाही !

नाही, कधीच नाही.

दोना अन्ना

दिएगो, आहे तरी काय असं ?

तुम्ही माझ्या दृष्टीनं नाहीत निरपराधी ? कोणत्या
बाबतीत - सांगा.

दोन जुआन

नाही ! काहीही झालं तरी नाही !

दोना अन्ना

दिएगो, विचित्रच आहे सारं.

मी तुम्हाला विनवते, करते आज्ञा.

दोन जुआन

नाही, नाही.

दोना अन्ना

छान ! असाच तुम्ही माझ्या इच्छेला देणार मान !
आणि आत्ताच तुम्ही काय सांगितलं मला ?
की तुम्ही तर केली असती सेवा माझी, माझा गुलाम होऊन.
मी संतापेन, दिएगो. द्या उत्तर -
कोण्या बाबतीत माझ्या दृष्टीनं अपराधी तुम्ही?

दोन जुआन .

नाही धीर होत. तुम्ही द्वेष करायला लागाल माझा, नक्कीच.

दोना अन्ना

नाही, नाही. केली आहे मी तुम्हाला आधीच क्षमा.
पण जाणून घ्यायचं मला....

दोन जुआन

नका करू इच्छा जाणायची

ते महाभयंकर, खुनी रहस्य.

दोना अन्ना

इतकं महाभयंकर ! मुद्दामच छळताहात मला.
किती ताणली गेलीय् उत्सुकता माझी....

आहे तरी काय ते रहस्य ? का म्हणून मांडताहात

छळवाद माझा ?

मी तुम्हालाही नव्हते ओळखत - मला शत्रू देखील
नाहीत आणि नव्हते. अपवाद फक्त एकाचाच -
माझ्या नवऱ्याच्या खुन्याचा.

दोन जुआन

(स्वत:शी)

गोष्टी या थराला आल्या !

सांगा मला, तो दुर्दैवी दोन जुआन
आहे तुम्हाला परिचित ?

दोना अन्ना

नाही, नाही पाहिलं मी त्याला कधीच.

दोन जुआन

पण तुम्ही बाळगत असाल मनात

त्याच्याबद्दलचं वैर?

दोना अन्ना

होय, सांभाळावी लागतेच प्रतिष्ठा कर्तव्यापोटी.
पण तुम्ही दूर न्यायचा प्रयत्न करताय् मला
माझ्या प्रश्नापासून, दोन दिएगो,
मला हवंय् उत्तर....

दोन जुआन

काय कराल, जर भेटला तुम्हाला

दोन जुआन ?

दोना अन्ना

तर मी त्या दुष्टाच्या

खुपसेन छातीत तलवार.

दोन जुआन

तर मग दोना अन्ना

कुठं आहे तुमची तलवार ? इथं आहे छाती माझी.

दोना अन्ना

दिएगो !!

काय म्हणताय् तुम्ही ?

दोन जुआन

मी नाही दिएगो, मी आहे जुआन.

दोना अन्ना

अरे देवा ! नाही, हे शक्य नाही !
मुळीच नाही बसत विश्वास यावर माझा !!

दोन जुआन

आहे दोन जुआनच मी.

दोना अन्ना

खोटं !

दोन जुआन

मी मारलं ठार
नवऱ्याला तुमच्या; आणि मला नाही वाटत खंत
त्याबद्दल - नाही पश्चात्तापही जरा देखील मनात.

दोना अन्ना

काय ऐकतेय् मी ? नाही, नाही, हे शक्य नाही !

दोन जुआन

मी दोन जुआन, आणि मी तुमच्यावर करतोय् प्रेम.

दोना अन्ना

(खाली कोसळत)
कुठं आहे मी ?.... कुठं ? मला चक्कर येतेय्...

दोन जुआन

परमेश्वरा ! काय झालं तिला ?
काय होतंय् तुम्हाला, दोना अन्ना ?
ऊठा, ऊठा, जाग्या व्हा, भानावर या; तुमचा दिएगो,
गुलाम आहे चरणांपाशी तुमच्या.

दोना अन्ना

एकटी सोडा मला !
(क्षीणपणानं)

अरे, तुम्ही माझे वैरी - तुम्ही लुटलंत माझं
सर्वस्व, माझ्या जीवनातलं....

दोन जुआन

प्रियतम जीवा ! हा आघात...भयंकर आघात...कबूल
पण मी सर्वस्वानं आहे तयार त्याची भरपाई करायला, तुमच्या
चरणांपाशी पाहतो वाट फक्त आशेची.
करा आज्ञा - कवटाळीन मी मृत्यूला,
करा आज्ञा - राहीन मी जिवंत केवळ तुमच्यासाठी....

दोना अन्ना

तर हाच तो दोन जुआन....

दोन जुआन

खरं ना, तो होता रंगवलेला तुमच्यापुढं
दुष्ट, राक्षस म्हणून ? लाडक्या दोना अन्ना !
आणि अफवा नसेल सर्वस्वी खोटी.
थकल्या भागल्या विवेकावर कदाचित हे ओझं पापाचं...
तसा बराच काळ होतो मी
व्यभिचाराचा इमानी दास. पण त्या वेळेपासून
जेव्हा तुम्हाला पाहिलं मी;
मला वाटतं, माझा पुनर्जन्म झाला पुरता.
तुमच्यावर करताना प्रेम, करतो मी प्रेम सद्गुणावर
आणि पहिल्यांदाच नम्रपणानं त्याच्यापुढं
थरथरते गुडघे झुकवतो आहे खाली.

दोना अन्ना

हं, जाणते मी की आहे दोन दुआन संभाषणचतुर.
ऐकलं होतं मी की तो आहे, धूर्त फशी पाडणारा,
म्हणतात लोक - तुम्ही आहात पाखंडी व्यभिचारी,
तुम्ही प्रत्यक्ष राक्षस, किती बायाबापड्या
नासवल्यात तुम्ही ?

दोन जुआन

पण नाही एकीवरही त्यांच्यातल्या
आजवर मी केलं प्रेम.

दोना अन्ना

तर मग ठेवायला हवा विश्वास
की, दोन जुआन पडलाय् प्रेमात पहिल्यांदाच,
आणि नाही आढळली त्याला माझ्यात नवी शिकार.

दोन जुआन

जर मला तुम्हाला फसवायचीच असती इच्छा,
कबूल केलं असतं का मी, सांगितलं असतं का मी
ते नाव - जे तुम्ही नाही ऐकू शकत ?
कुठं बरं दिसते यात प्रतारणा, डावपेच ?

दोना अन्ना

इलाजच नाही तुमच्यापुढं काही बोलण्याचा....
पण कसं शकला येऊ तुम्ही उकडं ? गेला असतात
तुम्ही ओळखू इथं कोणाकडूनही,
आणि तुमचं मरण ओढवलं असतं निश्चित.

दोन जुआन

पर्वा कशाला मरणाची ? मधुर क्षणासाठी मीलनाच्या
बिनतक्रार देऊन टाकीन मी प्राणही.

दोना अन्ना

पण कसं बरं इथून बाहेर पडणार
तुम्ही, दोन जुआन? किती बेफिकिरी, आततायीपणा !

दोने जुआन

(तिच्या हाताचं चुंबन घेत.)
आणि तुम्ही बिचाऱ्या जुआनच्या प्राणाची
करताहात चिंता ! याचा अर्थ असाच ना, दोना अन्ना,
की नाही उरला तुमच्या सदय अंत:करणात
तिरस्काराचा लवलेशही ?

दोना अन्ना

जर का करता आला असता तिरस्कार तुमचा मला
तर झालं असतं चांगलं !
घ्यायला हवा निरोप आता परस्परांचा - झालीय् वेळ.

दोन जुआन

पण पुन्हा कधी भेटायचं आपण ?

दोना अन्ना

मला नाही ठाऊक.
पण कधीतरी, नक्कीच.

दोन जुआन

मग उद्या ?

दोना अन्ना

पण कुठं ?

दोन जुआन

इथंच.

दोना अन्ना

हं....दोन जुआन, किती मनानं दुबळी मी !

दोन जुआन

आणि मला क्षमा केल्याची खातरजमा म्हणून....
आता एक विश्रब्ध चुंबन....

दोना अन्ना

पुरे, चला, निघा आता.

दोन जुआन

एकच, फक्त एकच विश्रब्ध....

दोना अन्ना

किती हटवादी आहात तुम्ही !! या इथं, अस्सं....
पण कसली खडखड ऐकू येतेय् दारावर ?
लपा....लपा लवकर, दोन जुआन !

दोन जुआन

अच्छा ! भेटू पुन्हा माझ्या लाडके !
(बाहेर जातो आणि पुन्हा आत पळत येतो.)
अरे बापरे !

दोना अन्ना

काय झालं तुम्हाला ? आई ग !
(कमांडर पुतळा प्रवेश करतो.
दोना अन्ना मूर्च्छित होऊन कोसळते.)

पुतळा

मी बोलावल्याप्रमाणं आलोय्.

दोन जुआन

अरे देवा ! दोना अन्ना !

पुतळा

असू दे तिला तशीच.
संपलंय् सगळं. थरथरतोय्स तू, दोन जुआन.

दोन जुआन

मी ? नाही. मीच दिलं होतं आमंत्रण तुला
आणि तयार आहे तुझ्या स्वागतासाठी.

पुतळा

दे तर मला तुझा हात.

दोन जुआन :

हा घे.... ओय्....किती घट्ट आहे पकड
त्याच्या दगडी हाताची !
पुरे, सोड मला, सोड - सोड माझा हांत....
मी मेलो - संपलं सारं - हाय दोना अन्ना !
(जमिनीत गडप होतात.)

मत्स्यांगना
(नाट्य-काव्य)

('न्नेप्र' चा किनारा, चक्की, चक्कीवाला,
त्याची मुलगी.)

चक्कीवाला

छे ! तशाच तुम्ही सगळ्या तरुण पोरींनो,
सगळ्या बिनडोक तुम्ही, खरंच जर गुलाम झाला
तुमचा, हेवा करण्यासारखा माणूस; तर नाही का सोपं ?
तसंच आवश्यकही, त्याला तुम्ही स्वत:मध्ये गुंतवून ठेवणं ?
आणि कसं ? चतुर चोख वर्तनानं;
कधी घालायची भुरळ, कधी लडिवाळपणानं;
प्रसंगी बेताबेतानं सहजगत्या
लग्नाबद्दल बोलायला लागायचं; पण सगळ्यांत महत्त्वाचं
जपायचं स्वत:चं प्रतिष्ठित कौमार्य,
अमोल भांडार; ते -
शब्दासारखं - एकदा द्याल तर परत नाही मिळणार.
आणि जर नसेल खरोखर लग्नाची आशा,
तर कमीत कमी आहे शक्य
कोणता ना कोणता फायदा स्वत:साठी - अगर लाभ
उठवणं आप्तासाठी, पण जरा विचार पाहिजे करायला;
''नाही चिरंतन तर करणार तो. प्रेम माझ्यावर
आणि लाडही माझे.'' पण नाही ! कुठून
तुम्हाला सुचणार विचार भल्या गोष्टींचा ! असंच ना ?
तुम्ही क्षणात होता वेड्या; तुम्ही खूष
पुरी करायला फुकट इच्छा त्याची;

तयार सबंध दिवस लोंबकळायला गळ्यात
प्रिय मित्राच्या; पण प्रिय मित्र
निमिषातच होतो अदृश्य, मागमूसही नाही ठेवत; आणि तुम्ही
राहतां मागं कफल्लक, छे! तुम्ही सगळ्या बिनडोक!
नव्हतं सांगितलं का मी तुला शंभरवेळा;
"ए, पोरी, काळजी घे; होऊ नकोस अशी मूर्ख,
मुकू नकोस तू सुखाला स्वत:च्या,
नको निसटू देऊस तू राजकुमाराला आणि अविचारानं
नको करूस घात स्वत:च स्वत:चा, काय झालं निष्पन्न?...
बैस आता, निरंतर त्याबद्दल
जे कधीच मिळवणार नाहीस परत.

मुलगी

पण कशावरून
तुला वाटतं, की टाकून दिलं त्यानं मला?

चक्कीवाला

कशावरून काय? पण कितीवेळा
आठवड्यात तो चक्कीकडे येत असायचा?
अं? चांगला दररोज, आणि काहीवेळा
दोनदासुद्धा दिवसात - आणि मग क्वचित, अधिकच क्वचित
लागला यायला - आणि आज तर झाले नऊ दिवस,
आम्ही पाहिलं नाही त्याला. काय म्हणतेस?

मुलगी

तो असेल कामात; थोडी का असते त्याला चिंता?
काही झालं तरी तो नाही चक्कीवाला - त्याच्यासाठी नसतं
पाणी काम करत. वारंवार तो असतो सांगत,
की सगळ्या कामांत त्याचं काम अत्यंत अवघड.

चक्कीवाला

होय, विश्वास ठेव त्याच्यावर. केव्हा करतात काम राजकुमार
आणि काय असतं त्याचं काम? करायची शिकार कोल्ह्यांची,
सशांची.
झोडायच्या मेजवान्या, दुखवायचं शेजाऱ्यांना,
आणि मारायच्या भुलथापा तुम्हांला, बिचाऱ्या मूर्ख पोरींना.

तो स्वत:च करतो कामकिती वाटते कीव!
आणि माझ्यासाठी मात्र पाणी!....पण मला उसंत
नसते दिवसा, नसते रात्री, आणि जरा बघ:
कधी इथं, कधी तिथं असते आवश्यक दुरुस्ती,
कुठं झीज, कुठं गळती, आता जर का तू राजकुमाराकडं,
पुन्हा चक्की उभारण्यासाठी, मागितलेस
निदान थोडे तरी पैसे, तर होईल अधिक बरं.

मुलगी

हां!

चक्कीवाला

काय झालं असं?

मुलगी

शूऽऽ! मी ऐकतेय टापा
त्याच्या घोड्याच्या....तोच, तोच!

चक्कीवाला

तर बघ, पोरी,
विसरू नकोस माझा सल्ला, लक्षात ठेव....

मुलगी

आलाच तो, आलाच तो!
(राजकुमार प्रवेश करतो. मोतद्दार त्याचा घोडा घेऊन जातो.)

राजकुमार

काय कसं काय लाडके? कसं काय चक्कीवाले?

चक्कीवाला

दयाळू राजकुमारा,
चांगलं झालं, आलास. फार, फारच दिवस झाले
तुझे चमकदार डोळे आम्ही पाहिले त्याला.
जातो तुझ्यासाठी तयार ठेवायला फराळ.
(बाहेर जातो.)

मुलगी

हं, अखेर तुला झाली आठवण माझी!

नाही का वाटली शरम, तुला असं दीर्घकाळ छळायची
मला निरर्थक निर्दय प्रतीक्षेनं ?
काय बरं माझ्या डोक्यात नाही आलं?
कसल्या कसल्या भयानं स्वत:लाच मी नाही भिववलं ?
कधी वाटलं, की घोड्यानं तुला फेकलं
डोहात अगर नदीत; की अस्वलानं
तुझ्यावर घनदाट जंगलात केली मात,
की पडलास आजारी तू, की उडालं प्रेम माझ्यावरलं -
पण धन्यवाद देवाला ! जिवंत आहेस तू, सुखरूप
आणि करतोय्स प्रेम अजून पहिल्यासारखंच माझ्यावर;
खरं ना ?

राजकुमार

पहिल्यासारखंच, माझ्या देवदूता;
नव्हे, जास्तच पहिल्यापेक्षा.

प्रेमिका

तरीही तू
उदास; काय झालंय् तुला ?

राजकुमार

मी उदास ?
तुला वाटतंय् तसं. नाही; मी हर्षोत्फुल्ल
नेहमीच, जेव्हा केवळ तुला असतो पहात.

ती

नाही.
जेव्हा तू असतोस हर्षोत्फुल्ल; दुरूनच माझ्याकडं
लगबगीनं येतोस आणि ओरडतोस : कुठंय् माझं कबूतर,
काय करतंय् ते ?'' आणि मग घेतोस चुंबन
आणि विचारतोस प्रश्न : आनंदी आहे ना मी तुझ्या भेटीनं
आणि होते का अपेक्षित तुला इतक्या लौकर ?
पण आज - ऐकतोय्स माझं तू न बोलता,
नाहीस घेत मिठीत, नाहीस चुंबत माझे डोळे,
तू कशानं तरी बेचैन, नक्कीच. पण कशानं ?
खरंच माझ्यावर रागावला तर नाहीस ना तू ?



मिखायलोवस्कोयेच्या वास्तव्यात (१८२६) पुश्किन त्याचा मित्र इवान पुश्चिन यास कविता वाचून दाखवीत आहे.



पुश्किनने काढलेले स्वत:चे पोट्रेट १८२९



चित्रकार सोकोलेवने काढलेले पुश्किनचे जलरंगचित्र.



पुश्किनची सौंदर्यवती पत्नी नातालिया गोंचारोवा
(१८१२-१८६३)



निकोलाय गोगोल (१८०९-५२)
पुश्किनचा आवडता सुप्रसिध्द वास्तववादी साहित्यक



मिखाईल लरमोन्तोव (१८१४०-४१) थोर कवी.
पुश्किनवर लिहिलेल्या मृत्युगीतावद्दल त्याला
कॉकेशस मध्ये हद्दपार केले.



एमेलिअन पुगाचेव (१७४४-१७७५) १७७० मध्ये झालेल्या रशियन शेतकऱ्यांच्या बंडाचा नेता.
पुश्किनने या बंडावर आधारित कॅप्टनची मुलगी ही कादंबरी लिहिली.



२७ जाने. १८३७ रोजी पुश्किन आणि दान्ते यांच्यात द्वंद्वयुध्द झाले. यातच पुश्किनचा अंत झाला. नौमोवने काढलेलं तैलचित्र. (१८८४)



स्वातोगोर्स्कच्या चर्चयार्डमध्ये राष्ट्रकवी पुश्किनची कबर आहे.



सेंट पीटर्सबर्गमधील पुश्किनच्या घरातील त्याची अभ्यासिका.
आता हे घर पुश्किन म्युझिअम केले गेले आहे



शिल्पकार ओपेकुझिनने केलेला राष्ट्रकवी पुश्किनचा पुतळा, मॉस्को १८८०.
या पुतळयाचे अनावरण सुप्रसिध्द रशियन कादंबरीकार दस्तयेवस्की याने केले.



ओ किप्रेन्स्कीने काढलेले पुश्किनचे तैलचित्र. १८२७

राजकुमार

मला नाही इच्छा निष्कारण ढोंग करायची
तुझं आहे बरोबर; हृदयात मी वहात आहे दुःख
अवजड - तूही ते करू शकणार नाहीस
प्रेमळ लडिवाळपणानं नाहीसं,
हलकं अगर सहभागी होऊन आपलंसं.

ती

पण खुद्द मला तुझ्याबरोबर न भोगणं
एकही दुःख - रहस्य माझ्याकडं कर उघड -
परवानगी देशील - तर मी रडेन; नाही दिलीस -
तर एका अश्रूनं मी तुला नाही शिणवणार.

राजकुमार

कशासाठी मी रेंगाळू ? जितकं अधिक लौकर, तितकं अधिक
चांगलं
माझ्या लाडके, तू जाणतेस; नाही जगात
अक्षय आनंद : ना उच्च कुल,
ना सौंदर्य, ना सामर्थ्य, ना वैभव,
काहीही नाही सुटू शकत दुर्दैवातून.
आपणसुद्धा; - खरं ना माझ्या कबुतरा ?
आपण होतो सुखी; कमीत कमी
मी होतो सुखी तुझ्याबरोबर, तुझ्या प्रेमानं.
आणि भविष्यात माझं काहीही झालं,
कुठंही असलो मी, तरी सारखा असेन आठवत
तुला, माझ्या सजणी; जे मी गमावत आहे त्याची
कशालाही जगात नाही घेता येणार जागा.

ती

मला तुझा एक शब्दही अजुन नाही कळत,
पण खरंच मला वाटतं भय. आपल्याला दैव धमकावतंय्,
करतंय् तयारी आपल्या अज्ञात दुःखाची,
ताटातुटीची कदाचित.

राजकुमार

तू ताडलंस बरोबर.
ताटातूट आपली दैवानं आहे ठरवलेली.

ती

कोण आपल्याला करणार अलग ? खरंच का तुझ्यामागून
यायला कुठंही मी नाही समर्थ ?
मी पोऱ्यासारखा करीन वेष. इमानानं राहीन
तुझी सेवा करीत; प्रवासांत, स्वारीत
अगर युद्धात - युद्धाला मी नाही भिणार -
नुसती जरी पहात असेन तुला. नाही. नाही, नाही विश्वास
बसत,
अगर काढून घ्यायचे आहेत तुला माझे विचार,
अगर माझ्याशी रिकामी थट्टा चालवली आहेस.

राजकुमार

नाही, माझ्या मनात थट्टा नाही येत आज,
तुझे विचार काढून घ्यायची नाही आवश्यकता मला,
नाही झालो सज्ज जायला मी दूरच्या वाटेवर,
ना युद्धावर - मी घरीच आहे राहणार,
पण पाहिजे घ्यायला मला तुझा निरोप कायमचा.

ती

जरा थांब, आता मला कळलं सगळं....
तू करणार लग्न.
(राजकुमार गप्प राहतो.)
तू करणार लग्न !....

राजकुमार

काय करायचं ?
स्वत: तूच दे निर्णय. राजकुमाराला नसतं स्वातंत्र्य,
तरुण कुमारींप्रमाणं - नाही मनाप्रमाणं
त्याला मैत्रिणी स्वत:च निवडता येत; पण अपेक्षांप्रमाणं
इतर लोकांच्या; लाभासाठीं परक्यांच्या...
तुझं दु:ख निववतील देव आणि काळ.
विसरू नकोस मला, ही घे आठवण म्हणून
जाळी - ये, तुला मी स्वत:च घालतो.
आणखी स्वत:बरोबर आणलाय् मी कंठा -
घे, तो. इथं आहे हे आणखीन् : बापाला

मी याचं दिलं होतं वचन. देऊन टाक त्याला.
(तिच्या हातात सोनं असलेली थैली देतो.)
अच्छा

ती

जरा थांब, तुला सांगायलाच पाहिजे मी....
नाही आठवत....काय....

राजकुमार

आठव.

ती

तुझ्यासाठी.
मी सगळ्याला तयार....नाही, ते नाही....जरा थांब -
शक्य नाही, की कायमचं खरोखरच
मला तू टाकून देऊ शकशील....तरीही ते नाही....
हां! आठवलं मला : आज माझ्या
हृदयाखाली तुझं मूल सळसळलं.

राजकुमार

दुर्दैवी ! काय करायचं ? निदान त्याच्यासाठी
जप स्वत:ला; मी नाही टाकून देणार
तुझ्या मुलाला आणि तुला.
वेळ आल्यावर, कदाचित येईन स्वत:
तुम्हाला भेटायला. शांत हो, रडू नकोस.
आलिंगन देऊदे तुला अखेरचं
(बाहेर जात)
हूं! संपलं - मन जणू काही झालं हलकं.
मी अपेक्षिलं वादळ; पण काम पडलं पार
अगदी शांतपणानं.
(बाहेर जातो.)
(ती निश्चल राहते.)

चक्कीवाला

पाहिजे तर
आत या चक्कीकडं.....पण कुठंय् बरं तो ?

सांग, कुठंय् राजकुमार आपला ? अबबब ! काय
जाळी ! सबंध रत्नामाणकांची !
अशी चमकतेय्! आणि कंठा ! ठीक, मी म्हणतो :
काय शाही भेट ! वा: ! तो खरा दाता !
आणि हे काय ? थैली ! पैसे तर नव्हेत ना ?
पण का बरं तू राहिलीस गप्प, नाहीस देत उत्तर,
नाहीस उच्चारत शब्दही ? की तू
अनपेक्षित आनंदामुळे झालीस मूढ,
की तुझी दातखीळ बसली ?

मुलगी

नाही विश्वास बसत,
शक्य नाही हे मी एवढं त्याच्यावर केलं प्रेम....
की, पशू आहे तो ? की त्याचं अंत:करण
आहे केसाळ - रखरखीत ?

चक्कीवाला

कुणाबद्दल बोलतेस तू ?

मुलगी

सांग, बाबा, कशी शकले असते आणू
राग मी त्याला? एका आठवड्यात खरंच का
माझं सौंदर्य झालं नाहीसं ? अगर त्याला
कुणी विष प्यायला लावलं ?

चक्कीवाला

काय झालंय् तुला ?

मुलगी

बाबा, तो गेला निघून. तिकडं आहे तो दौडत ! -
आणि मी वेडीनं त्याला जाऊ दिलं,
मी झग्याच्या टोकाला त्याला नाही ठेवलं पकडून,
मी नाही लोंबकळले लगामाला घोड्याच्या !
निदान खरंच त्यानं वैतागानं असते छाटले
माझे हात कोपरापर्यंत; निदान तिथंच
त्यानं असतं चिरडलं मला स्वत:च्या घोड्यानं !

चक्कीवाला

तुला भ्रम झालाय् !

मुलगी

माहीत आहे ना, राजकुमाराला नसतं स्वातंत्र्य,
तरुण कुमारीप्रमाणं - नाही मनाप्रमाणं त्याला
निवडता येत बायको स्वत:ची....पण असतं स्वातंत्र्य त्याला
नक्कीच, भुरळ घालायचं, शपथा घ्यायचं, रडायचं,
आणि म्हणायचं : "तुला मी नेईन
माझ्या सुरेख वाड्यात, गुप्त महालात सौधावरल्या
आणि सजवीन रेशमामध्ये आणि लाल मखमलीमध्ये." रेशीम
त्याला असतं स्वातंत्र्य गरीब पोरींना शिकवायचं
मध्यरात्री शीळ ऐकताच उठणं
आणि पहाटेपर्यंत चक्कीमागं बसणं.
त्याला वाटतं सुख राजस हृदय रिझवण्यात
आमच्या व्यथांनी. आणि मग : "अच्छा,
जा पुढं, कबूतरा, कुणीकडंही पाहिजे तिथं;
कर प्रेम, मनात येईल त्याच्यावर."

चक्कीवाला

असं आहे तर प्रकरण.

मुलगी

पण कोण बरं त्याची वधू ? कुणाला
त्यानं बसवलं माझ्या जागी ? खरंच मी घेईन जाणून,
मी जाईन तिथं, मी सांगेन त्या दुष्टेला :
दूर हो राजकुमारापासून; असं बघ - दोन लांडग्या
नसतात फिरत एकाच दरीत."

चक्कीवाला

मूर्ख !
खरंच जर राजकुमारानं स्वत:ची निवडली वधू,
कोण अडवू शकणार त्याला ? आहे हे असं.
नव्हतं का म्हटलं मी तुला....

मुलगी

आणि शक्य झालं त्याला,
भल्या माणसासारखा, माझा निरोप घेणं.
आणि मला देणग्या देणं - काय !
पैसे देखील ! पुन्हा स्वत:लाच विकत घ्यावंसं वाटलं त्याला,
त्याला होतं करायचं माझं तोंड बंद सोन्याचांदीनं,
म्हणजे नाही पसरायची त्याच्याबद्दलची अपकीर्ती
आणि नाही पोहोचायची तरुण बायकोपर्यंत.
होय. कशी बरं विसरेल मी - तुला देऊन टाकायला
ही चांदी सांगितलं होतं त्यानं; त्यासाठी,
की होतास भला तू त्याच्याशी; की मुलीला
त्याच्यामागं जाऊ दिलंस उंडगायला; की तिला
ठेवलं नाहीस काबूत कडकपणानं....लाभ तुला देतेय्
माझी हानी.

(त्याला थैली देते.)

बाप

(अश्रू आणून)
कशासाठी मी राहिलो जिवंत !
काय देवानं लावलं ऐकायला ! पाप लागेल तुला सख्ख्या बापाची
अशी कटू हेटाळणी केल्याबद्दल.
एकुलती पोर तू माझी जगात,
एकुलता आनंद माझ्या म्हातारपणाचा.
कसं झालं नाही मला तुझ्याकडे लक्ष द्यायला ?
देवानं केली शिक्षा मला त्यासाठी, की दुबळेपणानं
मी पाडलं पार बापाचं कर्तव्य ?

मुलगी

हा:! घुसमटतंय् !
थंडगार साप माझा गळा आहे आवळत....
सापासारखा, सापानं विळखा घातला त्यानं मला,
नव्हे मोत्यांच्या कंठ्यानं.

(गळ्यातला कंठा तोडून टाकते.)

चक्कीवाला

भानावर ये.

मुलगी

असे मी
तुकडे तुकडे करीन तुझे दुष्ट सर्पा,
माझ्याशी ताटातूट करणाऱ्या नतद्रष्टा!

चक्कीवाला

तुला भ्रम झालाय्, खरंच, भ्रम झालाय्,

मुलगी

(डोक्यावरली जाळी काढून टाकते.)
इथं आहे मुकुट माझा,
लज्जास्पद मुकुट! आताच तर होता ठेवला मुकुट डोक्यावर,
कावेबाज वैऱ्यानं; जेव्हा मी केला होता त्याग
सर्वस्वाचा, जे पूर्वी प्रिय वाटायचं मला,
आम्ही मुकलो मुकुटाला. नाहीसा हो, माझ्या मुकुटा!

(न्हेप्रमध्ये जाळी फेकते.)

आता सगळं संपलं.

(स्वत:ला नदीत झोकून देते.)

म्हातारा

(कोसळत)
हाय! दुर्दैवा, दुर्दैवा!

(राजकुमाराचा वाडा
लग्न. वधूवर टेबलापाशी बसले आहेत.
पाहुणे. पोरींचा गानवृंद)

लग्न जुळव्या

उल्हासानं आपण लावलं लग्न
ठीक; चिंततो आरोग्य राजकुमारा, तरुण राजकुमारीसह.
देवो देव तुम्हाला जीवन प्रेमाचं आणि सहकार्याचं,
आणि आम्हांला झोडायला मेजवान्या.
का बरं, सुंदर पोरींनो, तुम्ही राहिलात गप्प ?
की, धवल हंसींनो; गेलांत मरगळून?
अगर सगळी गाणी तुम्ही टाकलीत गाऊन?
की, तुमचे कंठ गाण्यामुळं झाले कोरडे ?

गानवृंद

लग्नजुळव्या, लग्नजुळव्या,
अडाणी लग्न जुळव्या !
वधूसाठी गेले,
बागेत थांबले
बीयरचं पीप लवंडलं,
सगळ्या कोबींवर सांडलं,
खांबापुढं झुकले,
खांबाला आवर्जून म्हटले :
''खांबा रे, खांबा,
खात्रीच्या खांबा,
दाखव ना रस्ता पुढचा
वधूकडं जायचा.''
लग्नजुळव्या, ओळख तर खरं,
बटवा तर हातात घे बरं,
बटव्यात पैसा लागला खुळखुळायला.
सुंदर पोरी हाताळायला.

लग्नजुळव्या

टोमणे मारणाऱ्या पोरींनो, कसलं निवडलं तुम्ही गाणं!
तिकडं, तिकडं चला घ्या, निंदू नका लग्नजुळव्याला.
(पोरींना पैसे देतो.)

एक आवाज

खड्यांतून, सोनेरी वाळूतून
होती वहात जलद नदी,
जलद नदीत होत्या भटकत दोन मासोळ्या,
दोन मासोळ्या, दोन ताज्यातवान्या,
आणि ऐकलीस का तू, बहिणुले,
बातमी आमच्याकडची, नशिबाबद्दलची?
कसं संध्याकाळी आमच्याकडं सुंदर पोरीनं बुडवलं स्वत:ला,
बुडतांना प्रियकराला कसे दिले शिव्याशाप-

लग्नजुळव्या

सुंदरींनो ! पण हे गाणं कशासाठी?
ते दिसत नाही लग्नाचं गाणं; नाही.
कुणी निवडलं हे गाणं ? अं ?

पोरी

मी नाही -
मी नाही - आम्ही नाही.....

लग्नजुळव्या

मग कुणी बरं गायलं ते ?
(पोरींच्यात कुजबूज आणि गोंधळ.)

राजकुमार

मला माहीत आहे कुणी.
(टेबलापासून उठतो आणि हळू आवाजात मोतद्दाराला सांगतो.)
ती इकडंच आहे लपली.
अगदी जलद काढ हुडकून तिला. मग काढ माहिती,
कुणी केलं धाडस तिला आत सोडायचं.
(मोतद्दार पोरींच्याजवळ जातो.)

राजकुमार

(जागेवर बसतो; स्वत:शी)
ती.कदाचित,
असेल तयार इथं करायला मोठा गहजब,
म्हणजे शरमेनं नाही मला कळणार, कुणीकडं
लपावं हेसुद्धा.

मोतद्दार

मला नाही सापडली ती.

राजकुमार

शोध. मला माहीत आहे, ती आहे इथं. तिनं
गायलं ते गाणं

पाहुणा

काय पण ! मध' !
डोक्यात आणि पायात असा काही झिणझिणतोय् -
वाईट एवढंच, जरा आहे कडवट : गोड केल्यास नाही वाईट.
(वधू-वर चुंबन घेतात. क्षीण किंकाळी ऐकू येते.)

राजकुमार

तीच ! आता तिची मत्सरी किंकाळी.
(मोतद्दाराला)
काय ?

मोतद्दार

मला नाही सापडली ती कुठंच.

राजकुमार

मूर्ख

करवला

(उठत)
नाही का झाली वेळ आपण राजकुमारीला नवऱ्यावर सोपवायची
आणि वधू-वरांवर दारांत पुष्पवृष्टी करायची ? (सगळे
उठतात)

लग्नजुळव्या

होतोय् उशीर, झाली वेळ. द्या तर कोंबडी.
(वधू-वरांना भाजलेली कोंबडी खाऊ घालतात. मग
पुष्पवृष्टी करतात आणि शयनगृहाकडं नेतात.)

लग्नजुळव्या

सुकुमार राजकुमारी, रडू नकोस, भिऊ नकोस,
आज्ञाधारक हो.
(वधूवर शयनगृहात जातात, पाहुणे सगळे पांगतात,
लग्नजुळव्या आणि करवला यांच्याखेरीज.)

करवला

कुठं आहे पेला ? सबंध रात्र
खिडक्यांखाली मी असेन फेऱ्या घालत,

तर मला बळकट करणं मद्यानं नाही वाईट.

लग्नजुळव्या

(त्याच्यासाठी पेला भरतो.)
इकडं आहे, पी आरोग्यासाठी.

करवला

हूं, धन्यवाद.
सगळं सुरेख पार पडलं, खरं ना ?
लग्नही झालं चांगलं एकंदरीत.

लग्नजुळव्या

होय, धन्यवाद देवाला;
सगळं होतं सुरेख, - एकच नव्हतं चांगलं.

करवला

पण काय ?

लग्नजुळव्या

पण तो होता अपशकुन, की नाहीत गायल्या गाणं
लग्नाचं; देव जाणे होतं कसलं ते.

करवला

खरंच या पोरी - मुळीच नसतं शक्य त्यांना
खोडसाळपणा न करणं. थक्क करणारीच ना गोष्ट,
मुद्दाम मोडतां घालायची लग्नात राजकुमाराच्या.
जाऊ दे मला बसायला घोड्यावर.
अच्छा, मानलेल्या पित्या.
(बाहेर जातो.)

लग्नजुळव्या

हूं, मन नाही थाऱ्यावर !
नाही चांगल्या वेळेवर जमवलं आम्ही हे लग्न.

(सौधावरला महाल.
राजकुमारी आणि दाई)

राजकुमारी

शूऽऽ ! तुताऱ्या वाजवत आहेत वाटतं; नाही, तो नाही येत.
हं, दाई; जेव्हा होता वाग्दत्त वर,
तेव्हा तो माझ्यापासून पाऊलही नाही सरकायचा.
नाही काढून काढायचा, नजर माझ्यावरली.
लग्न केलं त्यानं, आणि सगळं झालं असं.
हल्ली मला अगदी पहाटे करतो जागी
आणि लगेच सोडतो स्वत:साठी चढवायला घोड्यावर खोगीर;
मग रात्रीपर्यंत कुठं भटकतो देव जाणे;
येतो परत; क्वचित प्रेमळ शब्द
बोलतो माझ्याशी; क्वचित प्रेमळ हातानं
थोपटतो माझा गोरा चेहरा,

दाई

राजकुमारी, पुरुष म्हणजे कोंबडा;
कुकूच्-कू ! पंखानं पकाक्पक आणि मग बाहेर.
आणि स्त्री म्हणजे बिचारी कोंबडी;
रहा बसून आणि उबव पिलावळ,
जोवर प्रियकर - तोवर तो बसतो घरी;
नाही पीत, नाही खात, राहतो पहात, लावतो टक.
केलं लग्न की - चिंता लागतात वाटायला.
कधी असतं आवश्यक शेजाऱ्यांना भेटणं,
कधी शिकारीला जाणं ससाण्यांबरोबर,
तर कधी युद्धावर नेतो सैतान,
तिकडं, इकडं - आणि घरी नाही बसत.

राजकुमारी

काय वाटतं तुला ? खरंच नसेल ना त्याची
कुणी प्रेमिका चोरटी ?

दाई

बस्स; करू नकोस पाप :
पण कुणाला तुझ्या जागी तो आणणार ?
तुझ्याजवळ सगळं काही आहे : मोहक सौंदर्य,
सद्वर्तन आणि शहाणपण, जरा विचार कर :

तुझ्यात नाही, तर कुणात आढळणार त्याला
असलं निधान ?

राजकुमारी

जर ऐकल्या देवानं माझ्या प्रार्थना
आणि माझ्याकडं पाठविली मुलं ! तर मला तेव्हाच
जमेल पुन्हा नवऱ्याला स्वत:कडं खेचायचं....
अरेच्या ! भरलंय् आवार शिकाऱ्यांनी. नवरा
घराकडं आलाय् तर. पण हे काय ? तो नाही दिसत.
(शिकारी प्रवेश करतो.)
राजकुमाराचं काय, कुठंय् तो ?

शिकारी

राजकुमारानं केलीय आज्ञा घराकडं
निघून जायची आम्हांला.

राजकुमारी

पण कुठंय् तो स्वत: ?

शिकारी

राहिला मागं
एकटाच, जंगलात झेप्रच्या किनाऱ्यावरल्या.

राजकुमारी

आणि तुम्ही धजलांत सोडायला मागं राजकुमाराला
तिथं एकटा; काय तत्पर सेवक तुम्ही !
आत्ता जा परत, आत्ता त्याच्याकडं सुटा दौडत !
सांगा त्याला, की मी पाठवलं तुम्हाला.
(शिकारी बाहेर जातो.)
हाय, माझ्या देवा ! जंगलात रात्रीच्या वेळेला
हिंस्र श्वापदं, क्रूर माणसं,
जंगली राक्षस - बराच अवसर धोक्याला.
जलदीनं लाव मेणबत्ती मूर्तीपुढली.

दाई

निघालेच, माझ्या लाडके, निघालेच....

(न्नेप्र. रात्र.)

मत्स्यांगना

हर्षभरित घोळक्यानं
खोलखोल तळातून
आम्ही रात्री येतो वर,
आम्हांला चंद्र देतो ऊब.
असतं सुखद आम्हांला रात्रीच्या वेळी
नदीचा तळ सोडून; देणं
असतं सुखद स्वच्छंदी डोक्यानं
उंच नदी जाणं कापून,
देणं एकमेकींना हाका,
निनादणारी हवा टाकणं थरथरून,
आणि ओले-हिरवे केस
तिच्यात सुकवणं आणि झटकणं.

एकटी

चूप-चूप ! झुडुपांखाली
काहीतरी खुसखुसतंय् अंधारात.

दुसरी

चंद्रात आणि आपल्यात
कुणीतरी फिरतंय् धरणीवर.
(लपतात.)

राजकुमार

ओळखीच्या उदास स्थळांनो !
मी ओळखतो परिसरातल्या वस्तू -
इथं आहे चक्की ! ती कधीच आहे मोडकळलेली;
आनंदी आवाज तिच्या चाकांचा झाला आहे शांत;
थांबलंय् जातं - दिसतंय उघड, मेला म्हाताराही.
बिचाऱ्या पोरीसाठी नसेल रडला तो फार काळ.
वाट तिकडं आहे वळली - ती झालीय् अडगळीची,
फार-फार काळ इकडं कुणीच नाही आलं;
तिकडं बाग होती कुंपण घातलेली; खरंच का
झाली असेल तिचीच ही घनदाट झाडी ?

हं - इथंच आहे ओक आवडता; इथंच ती.
मिठी मारून मला, कोसळली आणि झाली गप्प...
असंच ना ?....
(झाडांकडं जातो. पानं वर्षाव करतात.)
काय याचा अर्थ ? पानं,
पड्न फिकी, एकदम मिटली आणि सळसळत
लागली पडायला राखेसारखी माझ्यावर.
माझ्यासमोर आहे उभा तो - वठलेला आणि काळवंडलेला,
शापित वृक्षासारखा.
(चिंध्यांतला अर्धनग्न म्हातारा प्रवेश करतो.)

म्हातारा

काय,
कसं काय, जावईबुवा ?

राजकुमार

कोण तू ?

म्हातारा

मी इथलं गिधाड.

राजकुमार

शक्य असेल का ? हा तर चक्कीवाला.

म्हातारा

का म्हणून चक्कीवाला !
मी विकली चक्की स्वयंपाकी भुतांना.
आणि पैसे टाकले देऊन सांभाळायला.
मत्स्यांगनेला, माझ्या द्रष्ट्या मुलीला.
ते वाळूत न्नेप्र-नदीच्या आहेत पुरलेले.
त्यांच्यावर एकाक्ष - मासोळी ठेवते पहारा.

राजकुमार

दुर्दैवी, तो झालाय वेडा. त्याचे विचार
विखुरलेले, वादळानंतरच्या ढगांसारखे.

म्हातारा

का नाही आलास तू संध्याकाळी आमच्याकडं ?

आमच्याकडं होती मेजवानी, तुझी आम्ही बरीच पाहिली वाट.

राजकुमार

कुणी पाहिली वाट माझी ?

म्हातारा

कुणी पाहिली वाट ? उघडच; मुलीनं.
तू जाणतोस, मी सगळं पाहतो बोटांमधून,
आणि देतो स्वातंत्र्य तुम्हांला; बस् दे ती
तुझ्याबरोबर पाहिजे तर रात्रभर, कोंबडा आरवेपर्यन्त,
नाही चकार शब्द बोलणार मी.

राजकुमार

बिचारा चक्कीवाला !

म्हातारा

मी कसला चक्कीवाला; सांगितलं तुला.
मी गिधाड, आणि नाही चक्कीवाला. चमत्कारिक घटना;
जेव्हा (आठवतं तुला ?) फेकून दिलं स्वत:ला तिनं
नदीत, मी गेलो धावत तिच्या मागावरून
आणि त्याच खडकावरून उडी टाकावी असं वाटलं; पण
अचानक
जाणवलं : दोन बळकट पंख
आहेत फुटले मला एकदम काखेतून
आणि अधांतरी उचललं त्यांनी. त्या वेळेपासून
कधी इथं, कधी तिथं असतो उडत; कधी मारतो चोच
मेलेल्या गायीला; तर कधी थडग्यावर
बसतो आणि करतो कावकाव.

राजकुमार

काय केविलवाणी दशा !
कोण बरं तुझी घेतं काळजी?

म्हातारा

होय, माझी
काळजी घेणं नाही वाईट. झालोय् मी म्हातारा
आणि खट्याळ. धन्यवाद; माझी घेते काळजी

छोटी मत्स्यांगना

राजकुमार

कोण ?

म्हातारा

माझी नात.

राजकुमार

आहे अशक्य
समजणं त्याचं बोलणं. म्हाताऱ्या, तू इथं जंगलात
भुकेनं तरी मरशील, अगर श्वापद तुला
टाकेल खाऊन. नाही का इच्छा तुला यायची माझ्या वाड्यात
माझ्याबरोबर राहायला ?

म्हातारा

तुझ्या वाड्यात ? नाही ! धन्यवाद !
भुलवशील, आणि मग माझा, कदाचित,
गळा आवळशील मोत्यांच्या कंठ्यानं. इथं आहे मी जिवंत
खातापिता आणि स्वतंत्र. नाही करीत इच्छा तुझ्या वाड्याची.
(बाहेर जातो.)

राजकुमार

आणि या सगळ्याला मी आहे दोषी ! आहे भयानक
वेडं होणं. त्याहून अधिक सोपं मरणं.
मृताकडं पाहतो आम्ही आदरानं,
करतों त्याच्यासाठी प्रार्थना. मरण करतं समान
त्याच्याशी सगळ्यांना. पण माणूस, वेड
लागलेला, राहात नाही माणूस.
असतं निरर्थक दान वाणीचं त्याला; नाही ठेवत ताबा
शब्दावर तो; त्याच्यात स्वत:च्या भावाची
श्वापदाला पटते ओळख; तो लोकांना हास्यविषय;
त्याच्याबाबत सगळेजण मोकाट; देव त्याला देत नाहीं न्याय.
दुर्दैवी म्हातारा ! त्याच्या दर्शनानं माझ्यातल्या
पश्चात्तापाच्या सगळ्या वेदना झाल्या जाग्या !

शिकारी

इथं आहे तो. कसंबसं त्याला काढलं शोधून !

राजकुमार

कशासाठी आलांत तुम्ही इथं ?

शिकारी

राजकुमारीनं आम्हांला पाठवलं.
तिला चिंता वाटत होती तुझ्याबद्दल.

राजकुमार

आहे असह्य
तिची चिंता ! की मी आहे कुक्कुलं बाळ,
आणि मला पाऊलही टाकणं नाही शक्य दाईशिवाय !
(बाहेर जातो.)
(मत्स्यांगना पाण्यावर प्रकट होतात.)

मत्स्यांगना

काय बहिणींनो ? जमिनीवर स्वच्छ
नको का गाठायला त्यांना त्वरेनं ?
खळबळीनं. खो-खो हसण्यानं आणि शिळेनं
नको का भिववायला त्यांच्या घोड्यांना ?
झाला फार उशीर, राया अंधारातल्या,
आहे गारठत खोल तळ,
कोंबडे आरवले वस्तीवर,
मावळला चंद्र.

एकटी

जरा थांबूया अजून, बहिणुले.

दुसरी

नाही; झाली वेळ, झाली वेळ जायची,
पाहते वाट आपली राणी,
आपली कडक बहीण,
(अदृश्य होतात.)

(नेप्रचा तळ.
मत्स्यांगनांचा वाडा.
मत्स्यांगना आपल्या राणीशेजारी लोकर कातत आहेत.)

राणी

थांबवा कातणं, बहिणींनो सूर्य मावळला.
स्तंभासारखा, चंद्र आहे प्रकाशत आपल्यावर. बस्स.
जा पोहत वर, आकाशाखाली बागडायला;
पण नका कुणाला सतावू आज,
करू नका साहस, पादचाऱ्यांना गुदगुल्या करायचं;
कोळ्यांचं जाळं जड करायचं
गवतानं आणि चिखलानं आणि मुलाला पाण्याकडं
भुलवायचं माश्यांच्या कहाण्यांनी.
(छोटी मत्स्यांगना प्रवेश करते.)
कुठं होतीस तू ?

मुलगी

जमिनीवर होते गेले
मीं आजोबाकडं. सारखा सांगत असतो तो मला
त्याच्यासाठी नदीच्या तळातले गोळा करायला ते पैसे,
जे कधीतरी पाण्यात आपल्याकडं
त्यानं होते फेकले. मी बराचवेळ ते शोधले;
पण पैसे म्हणजे कसले, मला नाही माहीत.
तरीपण मी नेले त्याच्यासाठी
मूठभर रंगीबेरंगी शिंपले.
तो अतिशय झाला त्यांनी खूष.

मत्स्यांगना

वेडगळ कंजूष !
जरा ऐक, पोरी. आज तुझ्यावर
ठेवतेय् भरंवसा मी. आपल्या किनाऱ्यावर आज
येईल एक पुरुष. नजर ठेव त्याच्यावर
आणि त्याला भेट - तो आपल्याला जवळचा,
तो तुझा बाप.

मुलगी

खुद्द तोच, ज्यानं तुला
दिलं टाकून आणि मर्त्य स्त्रीशी केलं लग्न ?

मत्स्यांगना

खुद्द तोच; त्याच्याकडं लडिवाळपणानं वाग
आणि सांग सगळं ते; जे माझ्याकडून
तुला आहे कळलं तुझ्या जन्माबद्दल; तसंच
माझ्याबद्दल. आणि जर विचारलं त्यानं,
विसरले आहे का मी त्याला, तर सांग,
की, सारखी त्याला मी असते आठवत, करते प्रेम
आणि पाहते वाट तो येण्याची स्वत:कडं. समजलं तुला ?

मुलगी

हो समजलं.

मत्स्यांगना

जा तर.
(एकटी)
त्या वेळेपासून,
जेव्हा घेतली उडी बेभान मी पाण्यात
हताश आणि तिरस्करणीय पोर म्हणून,
आणि ज्ञेप्र-नदीच्या तळाशी आले भानावर
थंडगार पण समर्थ मत्स्यांगना बनून;
गेली सरून सात लांबलचक वर्षं - मी दररोज
बदला घ्यायचा करते विचार .....
आणि आज माझी घटका आली असं दिसतं.
(किनारा)

राजकुमार

अनिच्छेनं या उदास किनाऱ्याकडं
मला आहे खेचत अज्ञात शक्ती.
सगळं इथलं देतं स्मरण मला गतकालाचं
आणि स्वच्छंदी सुंदर यौवनाच्या माझ्या
प्रेमकहाणीचं, जरी ती दु:खदायक.
इथं कधीकाळी प्रेम मला भेटलं,

मुक्त उकळतं - उत्कट प्रेम;
मी होतो सुखी; पण वेडा !....., आणि मी,
कशी चंचलपणानं सुखाकडून फिरवली पाठ.
उदास, उदास स्वप्नं माझी
कालच्या भेटीनं जागवली पुन्हा.
दुर्दैवी बाप ! काय भयानक तो !
कदाचित पुन्हा त्याला आज भेटेन,
कबूलही करील तो जंगल सोडायचं
आणि आमच्याकडं स्थलांतर करायचं....
(छोटी मत्स्यांगना किनाऱ्यावर प्रवेश करते.)
काय पाहतोय् मी !
कुठून आलीस तू, लडिवाळ बाळे ?

पूर्व प्रसिद्ध
स्वतंत्र भारत (दिवाळी विशेषांक १९७७)

यिव्गेनी अनेगिन

—: एक :—

१

''माझा काका अत्यंत आदरणीय महाभाग,
कधी थट्टेतही नाही आजारी पडला,
त्यानं स्वत:ला मानणं पाडलं भाग
आणि अधिक चांगला विचार नाही करू शकला.
त्याचा आदर्श दुसऱ्या शास्त्राला;
पण, माझ्या देवा, वैताग कसला
आजाऱ्याबरोबर बसणं दिवस आणि रात,
न सोडून जाता पाऊलभर अंतरात !
कसली हलकी कारागिरी तर
अर्धजिवंताची करमणूक करणं,
त्याची उशी सारखी करणं,
उदासपणें देणं दवा वर,
उसासा सोडणं आणि म्हणणं स्वत:ला :
कधी बरं सैतान नेणार तुला ?''

२

असा विचार केला तरुण उधळ्यानं,
उधळत आवेगात डाक-घोड्यांकडं,
सर्वोच्च शक्तीच्या उच्छेनं
स्वत:च्या सगळ्या आप्तांत वारसा त्याच्याकडं.

मित्रांनो ल्युद्मिलाच्या आणि रूस्लानच्या !
नायकाबरोबर माझ्या कादंबरीच्या
प्रस्तावनेवाचून याच घटकेला
करू देऊद्या परिचित तुम्हांला.
अनेगिन, भला माझा सखा,
जन्मला तीरांवर नेवाच्या,
जिथं, कदाचित, जन्म झाला तुमचा
किंवा चमकला असाल, माझ्या वाचका;
तिथं कधीकाळी भटकलो मीही :
पण मला द्यायला उत्तर ही.

३

नोकरी करून इमानेइतबारे अशी,
ऋणांवर जगला त्याचा बाप,
दिले तीन 'बॉल' दरवर्षी
आणि अखेर कंगाल झाला साफ.
प्रथम मदामला त्याच्यामागं नाचवलं,
मग मोस्येनं तिला सोडवलं.
पोर होतं खोडकर, पण सोनुकलं.
मोस्ये लाब्बे फ्रेंच गबाळा.
बिथरू नये पोर, म्हणून
शिकवायचा त्याला सगळं हसून खेळून,
नाही आणायचा कडक नीतिपाठांनी कडक कंटाळा,
थोडीशी खोड्यांसाठी हजेरी घ्यायचा
आणि उन्हाळी उद्यानाकडं भटकायला न्यायचा.

४

जेव्हा बंडखोर यौवनाची
आली येव्गेनीकडं घडी,
घडी आशांची आणि नाजूक उदासीची,
मोस्येला आवाराबाहेर काढी.
आता माझा अनेगिन मोकळा;
केशभूषा अनुसरून अद्ययावत फॅशनला;

डँडी सारखा लंडनच्या वेष केलेला
आणि अखेर जग पाहता झाला.
तो फ्रेंचमध्ये अगदी पुरता
बोलू शकायचा आणि लिहायचा,
सहज 'मझूर्का' नाचायचा
आणि झुकायचा अनायास अभिवादनाकरता,
काय तुम्हांला आणखी हवं ? जगानं घेतला निर्णय,
की तो चतुर आणि गोड अतिशय.

१२

किती लौकर करू शकला तो बेजार
हृदयं ललनांची नखरेल गाजलेल्या !
जेव्हा वाटायचं करावा संहार
त्याला प्रतिस्पर्ध्यांचा आपल्या,
काय कडकपणानं तो घ्यायचा हजेरी !
कितीही लाडके त्याला - असायची तयारी !
पण तुम्ही, कृतार्थ नवरे,
त्याच्याबरोबर राहिला तुम्ही स्नेहभरे;
त्याला लाडावून ठेवायचा जोडीदार छचोर,
फब्लासचा पुरातन चेला,
आणि म्हातारा संशयी झालेला,
बेइमान स्त्रीचा नवरा थोर,
नेहमी फिदा स्वत:च स्वत:वर,
स्वत:च्या जेवणावर आणि बायकोवर.

१३ १४

१५

असं व्हायचं : तो अजून अंथरुणावर :
त्याच्याकडं चिठ्ठ्याचपाट्या आणतात
काय ? निमंत्रणं ? खरोखर,
तीन घरी 'संध्याकाळ'साठी बोलावतात :
तिथं असणार 'बॉल', तिथं मुलांचा सण,
कुठं जाणार दौडत माझा रंगेल पण ?

कुणाबरोबर करणार सुरुवात तो ? सगळं सारखंच तर :
सगळीकडं जेवायला राहणं नाही दुस्तर.
तेवढ्यात सकाळच्या वेषात.
चढवून रूंदशी 'बलिवार' टोपी,
अनेगिन जातो वृक्षांकडं दुतर्फी
आणि तिथं भटकतो खुल्या प्रदेशात,
जोवर न झोपणारं ब्रिगेत
नाही त्याला भोजनाची सूचना देत.

३२

दिआनाचं वक्ष:स्थळ, गाल फ्लोराचा
मोहक; प्रिय मित्रांनो ! परी
त्यांहून चरण तिर्प्सिखोराचा
अधिक मोहक मला तरी.
तो, भविष्यसूचक कटाक्षाचा,
अनमोल पारितोषिकाचा;
येईल उडत सांकेतिक सौंदर्यानं
इच्छांचं मोहळ स्वच्छंदानं
प्रेम करतो एल्विना-माझ्या मित्रा, त्याच्यावर,
लांब आच्छादनाखाली मेजांच्या,
वसंतात हिरवळीत कुरणांच्या,
हिवाळ्यात अग्निस्थळाच्या कांबीवर,
आरस्पानी फरसबंदीवर हॉलच्या,
खडकांवर समुद्रकिनाऱ्याच्या.

३३

मी आठवतो समुद्र वादळाआधीचा.
कसा मी केला हेवा लाटांचा,
वादळी आवेगानं पळणाऱ्या
प्रेमानं लोटांगण घालायला पायांवर तिच्या !
कसा मी आसुसलो तेव्हा लाटांबरोबर
स्पर्शायला ओठांनी चरण प्रियकर !
नाही, कधीच नाही दिवसांत धगधगत्या
माझ्या तारुण्याच्या उकळत्या

मी नाही इच्छिलं असं छळाच्या कल्पनेनं
चावावे ओठ सुकुमार अर्मिदांचे.
किंवा गुलाब जळत्या गालांचे,
किंवा वक्ष, भरलेले ओतप्रोत वासनेने;
नाही, कधीच नाही उद्रेकानं विकाराच्या
तसं छळलं आत्म्याला माझ्या !

४७

जसं नेहमी ग्रीष्माच्या काळातलं.
जेव्हा असतं पारदर्शक आणि उजळ
रात्रीचं नभ निवावरलं
आणि पाण्याचा आरसा अवखळ
नाही परतवत बिंब दिआनचां,
स्मरण होऊन प्रथम वयाच्या प्रणयकथांचं,
पहिलं प्रेम स्मरून,
संवेदनशील, निश्चिंत फिरून,
नि:श्वासानं रात्रीच्या अलबेला
मुकाट्यानं धुंद झालो आपणहून !
जसा जंगलाकडं हिरव्या तुरुंगामधून
नेला गेलेला कैदी झोपलेला,
तसे नेले गेलो आम्ही स्वप्नांनी
तरुण जीवनाच्या प्रारंभस्थानी.

४८

अंत:करणानं भरलेल्या विषादांनी,
खडकावरती चढून,
उभा राहिला विचारपूर्वक यिव्गेनी
जसं कवीनं स्वत:चं ठेवलं वर्णन करून.
सगळं होतं शांत; फक्त रात्रीतले
हाकारत होते एकमेकांना गस्तवाले;
आणि गाड्यांचा खडखडाट दूरावरला
मिलोन्नायावर एकदम येत होता ऐकायला;
केवळ नौका; सुकाणूंनी वल्हवलेली नीट
तरंगत होती पेंगणाऱ्या नदीवर;

आणि आम्हांला बांधून टाकलं दूर अंतरावर
शिंगानं आणि गाण्यानं धीट.....
पण अधिक मधुर, विलासांत रात्रीच्या,
सूर अष्टपद्यांचा तोवं र्वातोच्या !

—: दोन :—

५१

अनेगिन होता तयार माझ्याबरोबर
बघायला परदेशी जग;
पण दैवानं झालो आम्ही लौकर
प्रदीर्घ काळासाठी अलग.
बाप त्याचा तेव्हा दिवंगत झाला.
समोर अनेगिनच्या झाली गोळा
ऋणकोंची अधाशी पलटण.
प्रत्येकाजवळ स्वत:चं मन आणि शहाणपण;
यिव्गेनीनं, कटकटींचा द्वेष करून,
तृप्त होऊन नशिबानं स्वत:च्या,
वारसा दिला हाती त्यांच्या.
मोठं नुकसान त्यात न दिसून
किंवा आधीच जाणून दुरून फार
म्हाताऱ्या काकाचा आजार.

५२

अचानक मिळाला त्याला खरोखर
अहवाल कारभाऱ्याकडून,
की, काका मरणोन्मुख शय्येवर
आणि झाला असता आनंदी त्याचा निरोप घेऊन.
उदास संदेश वाचून पुरता,
यिव्गेनी लगेच भेटीकरता
डाकेनं सुसाट दौडत गेला
आणि आधीच जांभया देऊ लागला.
पैशासाठी, तयार होऊन,
उसाशांना, वैतागला आणि फसवणुकीला

(त्यानंच मी केला प्रारंभ माझ्या कादंबरीला);
पण, गावाकडं काकाच्या उडत येऊन,
आधीच मेजावर तो आढळला,
जणू नजराणा उत्सुक धरणीला.

११

विजनात, जिथं एकाकी यिव्गेनी
शकला मापू त्याच्या देणग्या,
शेजारच्या खेड्यांचा धनी
त्याला नाही आवडल्या मेजवान्या;
सुटला पळत त्यांच्या आवाजी संभाषणातून.
त्यांचा संवाद
गवताच्या पेंढीबद्दल, दारूबद्दल,
गटाराबद्दल, स्वत:च्या आप्तांबद्दल,
अर्थात, नव्हता चमकत भावनेनं,
किंवा काव्यात्मक अग्नीनं,
किंवा कोटीनं, किंवा बुद्धीनं,
किंवा सामाजिक कलेनं;
संवाद त्यांच्या गोड बायकांचा तर
फारच कमी होता चतुर.

१२

श्रीमंत, सुंदर स्वत:, लेन्स्की
सगळीकडं होता स्वीकृत वरासारखा;
अशीच असते रीत खेड्यात की
सगळ्यांनी दिल्या मनात स्वत:च्या कन्यका
शेजाऱ्याला अर्ध-रशियन;
जर गेला तो वर, तर एकदम संभाषण
वळवायचं शब्दांना एकीकडं
अविवाहित जीवनाच्या कंटाळ्याकडं;
बोलावतात शेजाऱ्याला चढवून समोवार,
आणि दून्या ओतते चहा,
तिच्याशी कुजबुजतात : ''दून्या, पहा !''
मग आणतात गितार :

आणि तारस्वरात गाते ती (बाप रे !);
''सोनेरी महालात माझ्या ये रे !''

१३

पण लेन्स्की, अर्थात नसल्यानं
ओढ बंधनांची, लग्न-घंटेची,
अनेगिनशी होता उच्छीत मनानं
ओळख थोडक्यात करून घ्यायची.
ते भेटले. लाट आणि खडक,
कविता आणि गद्य, बर्फ आणि ज्वाला भडक
नव्हते एकमेकांकडून फार निराळे,
प्रथम परस्पर-भिन्नतेमुळे
ते एकमेकांना झाले कंटाळवाणे;
मग लागले आवडायला; त्यानंतर
भेटू लागले दररोज घोड्यावर
आणि लौकरच झाले अतूट दिवाणे.
असे लोक (प्रथम कबूल करतो मीही)
'करायचं नाही काही' मुळं स्नेही.

१४

पण मैत्री ती आमच्यांत नाही.
प्रत्येकजण पूर्वग्रहदूषित झालेला,
आम्ही समजतो शून्यं सगळ्यांनाही,
आणि पूर्णांक- स्वत:ला.
आम्ही सगळे पाहतो स्वत:ला नेपोलिअनमध्ये;
द्विपाद प्राण्यांच्या लाखांमध्ये
फक्त साधनं आमच्यासाठी;
आम्हांला भावना हास्यास्पद आणि रानटी.
होता यिव्गेनी अधिक सुसह्य पुष्कळांहून;
जरी तो लोकांना, अर्थात, होता ओळखत
आणि सामान्यत: त्यांना तुच्छ होता लेखत,-
पण (नियम नसतो अपवादावाचून)
काहींना त्यानं दिला अत्यंत मान
आणि अलिप्त भावनेचा केला सन्मान.

२१

जवळजवळ असताना पोर, ओल्गानं जिंकलेला,
अजून न जाणून वेदना हृदयाच्या,
तो झाला साक्षीदार भारलेला
बालिश खेळांचा तिच्या;
सावलीत वत्सल ओक-वृक्षांच्या
त्यानं घेतला भाग खेळांत तिच्या.
आणि मुलांची लग्नं लावली मनात कल्पनांनी
शेजाऱ्यापाजाऱ्यांनी, त्यांच्या बापांनी.
विजनात झुकल्या गवताखाली,
निष्पाप सौंदर्यानं भरलेली,
दृष्टीनं आईवडिलांच्या, ती बहरली
जशी दरीतली लिली लपलेली,
ओळखता न येणारी गवतात दाट कुणाला
ना फुलपाखरांना, ना मधमाशीला.

२२

कवीला दिलं भेट तिनं
पहिलं स्वप्न उन्मादांचं तरुण,
आणि सजीव केला तिच्याबद्दलच्या विचारानं
त्याच्या वीणेचा पहिला झंकार करूण;
अच्छा, खेळांनो सोनेरी !
त्याला आवडत दाट वनराया भारी,
एकांत, शांतता, रात्र,
तारका आणि चंद्र,
चंद्र - स्वर्गीय दीपक,
ज्याला होते आम्ही वाहिलेले
फेरफटके संध्याकाळच्या अंधारातले,
आणि अश्रू, चोरट्या क्लेशांचं सुख....
पण आजकाल पाहतो त्याच्याठायी
फक्त फिकट कंदिलांची व्यवस्था पर्यायी.

२३

नेहमी शालीन, नेहमी आज्ञाधारक आधी,
नेहमी आनंदी सकाळ-सारखी,
आयुष्याप्रमाणं कवीच्या सरळसाधी,
चुंबनाप्रमाणं प्रेमाच्या लाडकी,
डोळे नभासारखे निळे;
स्मित; केस पिवळसर कुरळे,
हळुवार बांधा, आवाज, हालचाल,
सगळं ओल्गामध्ये....जर कोणतीही घ्याल
कादंबरी, तर आढळेल तुम्हांला, बहुधा,
तिचं चित्र : ते गोड अपार,
मला स्वत:ला आधी ते आवडायचं फार,
पण शिणवलं त्यानं अमाप मलासुद्धा.
वाचका माझ्या, परवानगी द्या मला
तिच्या थोरल्या बहिणीत गुंतायला.

२४

तिच्या बहिणीला लोकं तात्याना म्हणायची...
प्रथमच असल्या नावानं
पानं नाजूक कादंबरीची
आम्ही करीत आहोत पुनीत स्वेच्छेनं.
का नाही ? ते आहे नादवाही, अवीट;
पण त्याच्याशी, मी जाणतो, निगडीत अतूट
स्मृती जुनीपुराणी
किंवा नौकराणींच्या खोल्यांची ! आम्ही सगळ्यांनी
पाहिजेच करायला कबूल : फारच थोडं अभिरुचीतलं
आमच्या नावांत आणि आमच्या जवळ
(नाही बोलत कवितांबद्दल);
आम्हांला प्रबोधन नाही मानवलं
आणि आम्हांला दिला गेला त्याच्याकडून
डामडौल - काही नाही अधिक त्याहून.

२५

तर, तिला बोलवायचे तात्याना नावानं,
ना सौंदर्यानं स्वतःच्या बहिणीच्या,
ना गुलाबी गालांच्या ताजेपणानं
ना डोळ्यांनी आकर्षित केलं स्वतःच्या.
उदास, अबोल, लाजरी,
जणू हरिणी रानातली बुजरी,
ती कुटुंबात स्वतःच्या
दिसायची पोरीसारखी परक्या.
लळा लावणं तिनं नव्हतं जाणलं
बापाला, आईलासुद्धा स्वतःच्या;
पोरीनं स्वतःशी, टोळक्यात मुलांच्या
खेळणं आणि बागडणं मनात नव्हतं आणलं
आणि बऱ्याच वेळा सबंध दिवस एकाकी
बसायची खिडकीपाशी मुकी.

२६

चिंतनशीलता, तिची मैत्रीण
अगदी पाळण्यातल्या दिवसांपासून
प्रवाह रिकामपणाचा ग्रामीण
स्वप्नांनी तिच्यासाठी टाकायची सजवून.
तिची नाजूक बोटं तर
नव्हती जाणत सुया; झुकून भरतकामावर,
रेशमी नक्षीनं
नाही केलं सजीव लिनन तिनं
खूण इच्छेची प्रभुत्व गाजवायच्या,
आज्ञाधारक बाहुलीबरोबर मूल
करतं तयारी होतं खेळात मश्गूल
शिष्टाचारासाठी, नियमासाठी जगाच्या,
आणि मोठेपणानं घोकतं समोर तिच्या,
पाठ आईचे स्वतःच्या.

२७

पण बाहुली त्या वयात देखील
तात्यानानं हातात नाही घेतली;
बातम्या गावच्या, तऱ्हा फॅशनमधील
यांची संभाषणं तिच्याशी नाही चालवली.
आणि होत्या खोड्या पोरकटवाण्या
तिला परक्या : भयानक कहाण्या
हिवाळ्यात अंधारात रात्रीच्या
भुरळ घालायच्या फार हृदयाला तिच्या.
आणि जेव्हा तान्या गोळा करायची
ओल्गासाठी कुरणात मोकळ्या
तिच्या चिमण्या मैत्रिणींना सगळ्या,
ती पकडापकडी नाही खेळायची,
तिला कंटाळवाणा झाला हशा घुमणारा,
आणि आवाज वाऱ्यासारखा घोंगावणारा.

२८

तिला आवडायचं गच्चीवर
पुकारायला उषेचं आगमन,
जेव्हा फिकट क्षितिजावर
तारकांचं लोपतं वर्तुळाकार-नर्तन,
आणि हळूच काठ पृथ्वीचा उजळतो,
आणि दूत सकाळचा, वारा झुळझुळतो
आणि चढतो हळूहळू दिवस वर.
हिवाळ्यात, जेव्हा रात्रीची छाया तर
अर्ध जग लांबवर टाकते व्यापून,
आणि लांबवर शांततेत आळसावलेल्या,
समोर चंद्राच्या धुकटलेल्या,
पूर्वा आळशी राहते झोपून.
नेहमीच्या प्रहराला जागी झालेली
ती समोर मेणबत्त्यांच्या उठून बसली.

३७

आपल्या पिनातांकडं परतलेला,
व्लदीमिर लेन्स्की गेला भेटायला
शेजाऱ्याच्या विनम्र थडग्याला,
उसासाही त्यानं राखेला वाहिला;
आणि बराच काळ हृदय भरलं खेदानं.
''बिचारा योरिस्क !'' पुटपुटला विषादानं,
''त्यानं धरलं मला हातांत.
किती कितीदा खेळलो मी बालपणात
त्याच्या अचाकोर - पदकाबरोबर !
ओल्गाला मला द्यायची इच्छा होती त्याची,
म्हणायचा तो : ''वाट पाहू ना त्या दिवसाची ?....''
आणि तुडुंब दु:खानं खरोखर,
व्लदीमिरनं तिथंच रेखाटलं
त्याचं स्तोत्र थडग्यावरलं.

३८

आणि तिथंही शिलालेखानं मलूल
बापाच्या आणि आईच्या, आसवांच्या सरींत,
त्यानं गौरवली पितरांची धूळ...
हाय ! जीवनाच्या नांगरलेल्या सरींत
पिढ्या क्षणिक सुगीनं,
'दूरदर्शी'च्या गूढ उच्छेनं,
उगवतात, पिकतात आणि पडतात;
दुसऱ्या त्यांच्यामागून जातात....
असा आमचा झंझावाती वंश एकवेळ
वाढतो, खवळतो, उकळतो
आणि थडग्यात गर्दीनं पणजोबांना घुसळतो.
येईल, येईल आमचीही वेळ,
आमचीही नातवंडं भल्या प्रहराला
जगातून हाकलतील आम्हांला !

—: तीन :—

१

''कुणीकडं ? हे आमचे कवी परंतु !''
''अच्छा, अनेगिन, माझी झाली वेळ.''
''मी नाही अडवणार तुला, पण कुठं तू
घालवतोस स्वत:ची संध्याकाळ ?''
''लारिन-मंडळींकडं.'' ''हे तर चमत्कारिक उघड.
भले ! तुलाही नसतं अवघड
तिथं प्रत्येक संध्याकाळ घालवणं फुकट ?''
''मुळीच नाही.'' ''नाही समजू शकत.
पाहतो ते अशा प्रकारचं :
सगळ्यात प्रथम (ऐक, बरोबर ना माझं ?)
रशियन कुटुंब साधं,
फलपाक, अनाद्यनंत संभाषण
पावसाबद्दल, जवसाबद्दल, गुराढोरांबद्दल पण....''

२

''मला तिथं अजून संकट नाही दिसत.''
''पण कंटाळा हेच संकट, माझ्या मित्रा, खरोखर.''
''मला फॅशनेबल जग तुमचं नाही आवडत,
प्रियतर मला घरगुती परिसर,
जिथं मी शकतो'' गाऊ ? ''धनगरी कविता फिरून !
पण बस्स कर लाडक्या, कृपा करून.
मग काय ? तूं जाणार : कीव वाटते मोठी.
छे:, ऐक, लेन्स्की; पण नाही ना आडकाठी
भेटायला मला या फिल्लीदाला काही,
विषयाला विचारांच्या आणि लेखणीच्या
अश्रूंच्या, यमकांच्या, इत्यादि इत्यादींच्या ?....
ओळख दे करून माझी.'' ''तू करतोस थट्टा'' ''नाही.''
''मी राजी.'' ''पण कधी?'' ''हवं तर आता.
ते सहर्ष करतील स्वागत आम्ही जाता.

५

सांग : कोणती तात्याना ?''
''होय, ती-जी उदास अशी
आणि अबोल, जशी स्वेतलाना,
आत आली आणि बसली खिडकीशी.''
''खरंच तू अनुरक्त धाकटीवर ?''
''मग काय ?'' ''दुसरी असती निवडली मी तर,
जर का असतो कवी, तुझ्यासारखा, मीही.
रूपरेखांत ओल्गाच्या जीवन नाही.
हुबेहूब वान-दिकची मदोन्ना ती.
चेहरा गोलसर लालसर,
जसा तो चंद्र वेडसर
त्या वेडसर क्षितिजावरती.''
व्लदीमिर कोरडेपणानं उत्तरला
आणि मग रस्ताभर मूक राहिला.

६

तेवढ्यात अनेगिनची भेट
लारिन-मंडळींकडं गेली मारून
सर्वांच्यावर छाप भरपेट
आणि सगळ्या शेजाऱ्यांची करमणूक करून.
चालले तर्क तर्कामागून.
सगळे लागले बोलायला चोरून, थट्टा करायला, निवाडा द्यायला- नव्हे निष्पापपणानं,
तात्यानाचं प्रियकराशी लग्न लावायला मनानं,
दुसरे तर म्हणाले देखील ठासून,
की लग्न पुरतं ठरलेलं,
पण यासाठीच थांबलेलं,
की फॅशनेबल अंगठ्या नव्हत्या मिळाल्या अजून.
लग्नाबद्दल लेन्स्कीच्या कधीच
त्यांच्याकडं होतं ठरलेलं आधीच

७

तात्यानानं ऐकल्या क्लेशानं
असल्या गप्पागोष्टी; पण चोरटेपणानं
अनिर्वाच्य आनंदानं
केलं चिंतन त्याबद्दल अनिच्छेनं;
आणि विचार उगवला हृदयात;
वेळ आली; ती पडली प्रेमात.
असंच जमिनीत पडलेलं बियाणं
होतं जिवंत वसंताच्या अग्नीनं.
बराच काळ तिच्या कल्पनेनं,
जळणाऱ्या लज्जेनं आणि उदासीनं,
अन्नाची प्राणघातक पाहिली वाट तीव्रतेनं;
बराच काळ हार्दिक खिन्नतेनं
तंग दाटलं तिचं तरुण वक्ष जरी,
आत्म्यानं पाहिली वाट....कुणाची तरी.

८

आणि पाहिली वाट....उघडले डोळे,
ती म्हणाली : ''हा तर तोच !''
हाय ! आता रात्री आणि दिवस एक झाले
आणि धगधगतं स्वप्न एकच,
सगळं भरलेलं त्यानं; गोड पोरीला सगळं काही
अविरत किमयेच्या बळानं राही
सांगत त्याच्यासंबंधी तिला कंटाळवाणी
लडिवाळ वाणी
आणि नजर सचिंत सेविकेची.
विषादात गेलेली गढून
ती पाहुण्यांचं नाही घेत ऐकून
आणि शापते रिकामपणं त्यांची,
त्यांचं अनपेक्षित येणं
आणि लांबत जाणारं बसणं.

१५

तात्याना, प्रिय तात्याना !
ढाळतो मी आसवं आता तुझ्याबरोबर;
तू हातात फॅशनेबल सैतानाच्या
दिलंस नशीब स्वत:चं खरोखर.
नाश पावशील लाडके, आधी परंतु
अंध करणाऱ्या आशेत तू
बोलावतेस अंधाऱ्या दिव्यानंदाला,
तू शोधतेस जीवनाच्या मोहाला,
तू पितेस इच्छांचं जादूगार जहर,
तुझा पाठपुरावा करतात स्वप्नं:
सगळीकडं तू रंगवतेस कल्पनेनं
निवारे भेटींचे सुखकर;
सगळीकडं, जिथं तिथं तुझ्यासमोर
तुझा घातकी फितवा छचोर.

१६

हुरहूर प्रेमाची पाठलागानं तात्यानाला थकवते,
आणि बागेत जाते ती व्यथित व्हायला,
आणि एकदम निश्चल डोळे झुकवते,
आळस घेरतो आणखीनच तिला,
धपापलं वक्ष:स्थळ, गाल
क्षणिक ज्वालेनं झालेले लाल,
श्वास गोठला ओठांत,
कानांत आवाज आणि चमक डोळ्यांत....
होऊ लागते रात्र; चंद्र निघतो घालत
गस्त दूरवर स्वर्गीय घुमटभर,
आणि कोकिळा धुक्यात फांदीवर
सूर निनादणारे असते काढत.
तात्याना अंधारात नाही झोपत
तर मार्दवानं दाईशी राहते बोलत :

२१

आणि मनानं सुदूर भरकटत गेली
तात्याना, पाहून चंद्राला....
एकदम कल्पना मनात तिच्या उपजली....
''जा, सोड मला एकटीला,
दे, न्यान्या, मला कागद, पेन,
आणि मेज सरकवं; मी लौकर झोपेन;
अच्छा.'' आणि मग ती एकटी. बाजूला -
सगळं शांत. उजळतो चंद्र तिला.
कोपरावर रेलून करते तात्याना लेखन.
पुरता यिव्गेनी मनामध्ये
न विचार केलेल्या पत्रामध्ये
प्रेम निष्पाप कुमारिकेचं करतं श्वसन
पत्र तयार, घडी घातलेलं खरं.....
तात्याना ! पण ते कुणासाठी बरं ?

२२

मला होत्या माहीत मदनिका जवळ जाता न येणाऱ्या,
थंड, शुद्ध - हिवाळ्यासारख्या,
निष्ठुर, फितवल्या न जाणाऱ्या,
बुद्धीला थांग न लागण्यासारख्या;
चक्रावलो मी त्यांच्या नखरेल गर्विष्ठपणानं,
त्यांच्या स्वाभाविक सद्गुणानं,
आणि करतो कबूल, पळालो त्यांच्यापासून,
जीव घेऊन; वाचली अगदी भिऊन
त्यांच्या भुवयांवर कोरीव अक्षरं नरकाची
''सोडून दे आशा कायमची.''
चेतवणं प्रेम-त्यांना गोष्ट त्रासाची,
भिववणं लोकांना - त्यांना अत्यानंदाची.
कदाचित नेवाच्या तीरांवर
असल्या ललना असतील पाहिल्या तुम्ही तर.

२५

विलासिनी करते पारख ठेवून थंड रक्त,
तात्याना करते प्रेम गंभीरपणानं
आणि करते स्वाधीन स्वत:ला बिनशर्त
प्रेमाच्या, लाडक्या मुलाप्रमाणं.
नाही बोलत ती : राहूया दूर -
प्रेमाची किंमत आपण त्यानं वाढवू भरपूर,
अधिक विश्वासानं जाळ्यात पकडू या;
प्रथम अहंकाराला टोचूया
आशेनं, मग संभ्रमानं
शिणवूया हृदय, आणि मग
मत्सरी अग्नीनं करूया सजग;
नाहीतर, कंटाळून उपभोगानं,
गुलाम लबाड बंधनांतून
प्रतिक्षणी तयार जायला निसटून.

२६

तरीही आधीच पाहतो व्यत्यय;
स्वकीय भूमीचा मान राखून,
मी दिलंच पाहिजे, नि:संशय,
पत्र तात्यानाचं भाषांतरून.
ती रशियन वाईट्ट जाणायची,
मासिकं आमची नाही वाचायची
आणि अभिव्यक्ती करायची कष्टानं
आपल्या आप्तांच्या भाषेनं,
म्हणून लिहिलं फ्रेंचमध्ये.....
काय करायचं ! करतो फिरून पुनरुक्ती;
आजपावेतो स्त्रीची प्रीती
नाही झाली मुखरित रशियनमध्ये;
आजपावेतो आमची अभिमानी बोली
पत्रात्मक गद्याला नाही सरावलेली.

३१

पत्र तात्यानाचं माझ्यापुढं;
ते मी जपतो पवित्रपणानं,
वाचतो चोरट्या हुरहुरीनं थोडं
पण नाही शकत वाचू पूर्णपणानं.
कुणी तिला शिकवला हा नाजूकपणा,
आणि शब्दांचा शालीन निश्चिंतपणा ?
कुणी तिला शिकवलं चतुर मूर्खपण,
हृदयाचं वेडगळ संभाषण
मोहक आणि बिकट ?
मला नाही समजत. पण इथं तर
अपूर्ण, दुबळं भाषांतर,
सजीव चित्रापुढं नक्कल फिकट;
अगर फ्रेय्शीत्सप्रमाणं रंगभूमीवरल्या
बुजऱ्या शिष्यांकडून 'खेळ'ल्या जाणाऱ्या :

पत्र तात्यानाचं अनेगिनला

मी तुम्हांला लिहिते - कशाच्या बरं दु:खानं ?
जमेल काय मला आणखी सांगायचं ?
सध्या, मी जाणते, तुमच्या इच्छेप्रमाणं
मला तिरस्कारानं शासन व्हायचं.
पण तुम्ही, पाहून माझं नशीब केविलवाणं
निदान थेंब करुणेचा राखून,
तुम्ही मला नाही देणार टाकून.
सुरुवातीला मी गप्प राहायची इच्छा केली;
विश्वास ठेवा : माझी शरमं मुळीच
तुम्ही नसती जाणली कधीच,
कधी जर आशा मी असती बाळगली
निदान केव्हातरी, निदान एकदा आठवड्याला
खेड्यात आमच्या पाहायची तुम्हांला,
यासाठीच फक्त की तुमच्या उक्ती ऐकाव्या,
तुमच्याशी एखादा शब्द बोलावा, आणि नंतर
सगळा करावा विचार, करावा विचार एकाचा निरंतर,
रात्रंदिवस भेटीपर्यंत नव्या.
पण म्हणतात, माणूसघाणे तुम्ही,
विजनात, खेड्यात तुम्हांला सगळं कंटाळवाणं,
आणि आम्ही...कशानंही नाही चमकत आम्ही,
तरीही तुमच्यासाठी आनंदी मोकळ्या मनानं.
कशासाठी तुम्ही दिली भेट आम्हांला ?
विजनात विसरलेल्या खेड्याच्या
मी कधीच नसतं ओळखलं तुम्हांला,
नसत्या जाणल्या कळा दु:खाच्या.

अननुभूत भावना आत्म्याच्या
शांत करून काळाबरोबर (कसं कळायचं बाई ?),
मनाप्रमाणं मी असता शोधला दुसरा कुणी,
असते झाले उमानी सहचारिणी
आणि सद्‌गुणी आई.
दुसरा कुणी !....नाही, कुणाला नाही जगात
दिलं असतं हृदय मी !
ते ठेवलेलं सर्वोच्च दरबारात....
ती इच्छा स्वर्गाची : तुझी मी;
सगळं आयुष्य माझं होतं गहाण
इमानी भेटीसाठी तुझ्याकडं;
तू माझ्याकडं पाठवलेला देवानं, आहे मला जाण,
तू पाठीराखा माझा जाईपर्यंत थडग्याकडं....
तू दिसायचास मला स्वप्नांत,
अदृश्यही तू होतास आधीच प्रिय मला,
तुझ्या अद्‌भुत कटाक्षानं मला लावलं झुरायला.
तुझा आवाज यायचा ऐकू आत्म्यात
बराच काळ....नाही, हे स्वप्न नव्हतं !
तू आला असशील-नसशील आत, मी ओळखलं एकदम,
सबंध झाले बधिर, झाले गरम
आणि विचारांत पुटपुटले : ''तो तर इथं !''
नाही का खरं ? मी तुझं होते ऐकत :
तू बोलायचास माझ्याशी नि:शब्द,
जेव्हा मी गरिबांना करायची मदत
अगर प्रार्थनेनं असायची रिझवत
हुरहूर आत्म्याची प्रक्षुब्ध ?
अगदी या क्षणात असा
नाहीस का तू, मधुर भासा,
पारदर्शक अंधारात चमकलास,
आलास उशाशी चोरपावलानं ?
नाही का तू, आनंदानं आणि प्रेमानं
शब्द आशेचे माझ्याजवळ कुजबुजलास ?
कोण तू ? माझा देवदूत ना पाठीराखा ? की
भुरळ पाडणारा विश्वासघातकी ?
कर निराकरण माझ्या संशयांचं.

कदाचित हे पोकळ सगळं,
उंद्रजाल अननुभवी आत्म्याचं!
आणि नियतीनं ठरवलेलं अगदीच वेगळं....
पण असंच व्हायचं! नशिबाला माझ्या
यापुढं मी देईन हाती तुझ्या,
तुझ्यासमोर आसवं ओतीन,
तुझ्याच छत्राची याचना करीन....
कल्पना कर : मी इथं एकटी,
कुणीही मला नाही घेत समजून,
विवेक माझा चालला संपून,
आणि मुक्यानं नष्ट व्हायला पाहिजे मला शेवटी.
मी पाहते वाट तुझी : एका दृष्टिक्षेपानं
आशा हृदयाच्या कर पुन्हा जिवंत,
अगर दु:खद स्वप्नाचा कर अंत,
हाय, अपराधोचित अधिक्षेपानं!
संपवते! पुन्हा वाचणं आहे भयंकर....
शरमेनं आणि भयानं लागले मरायला....
पण मी तुमच्या लौकिकाच्या खात्रीवर
धीरानं त्याच्यावर सोपवते स्वत:ला....

—: चार :—

९

अगदी असाच विचार केला यिव्गेनीनं माझ्या
तो पहिल्या तारुण्याच्या भरात स्वत:च्या
ठरला बळी वादळी चुकांचा
आणि बे-लगाम विकारांचा.
सवयीनं आयुष्याच्या लाडावलेला,
एकानं वेळप्रसंगी भारावलेला,
हताश झालेला दुसऱ्यानं,
थकलेला हळूहळू अभिलाषेनं,
थकलेला लहारी यशानं,
एषकत गोंगाटात आणि शांततेत पण
आत्म्याची कुरकूर चिरंतन,
जांभई दडपून हशानं :

इथं त्यानं आठ वर्षं कशी नेली 'मारून'.
आयुष्याचा सर्वोत्कृष्ट बहर गमावून.

१०

अजून नव्हता तो पडला सुंदरीच्या प्रेमात,
पण प्रेमिकाप्रमाणं रेंगाळायचा काहीवेळा;
नाकारतात - शांत व्हायचा क्षणात;
विश्वासघात करतात - आनंदी असायचा विसावायला.
तो त्यांना धुंडायचा उन्मनीवाचून.
आणि सोडायचा खेदावाचून,
क्वचित आठवून त्यांचा अनुराग आणि दुष्टपणा
अगदी असाच बेफिकीर पाहुणा
संध्याकाळच्या 'बिस्त'साठी येतो,
बसतो; खेळ संपला :
आवारातून तो चालला,
अविचलपणानं घराकडं जातो
आणि स्वत:च नाही जाणत सकाळी,
कुणीकडं जाणार संध्याकाळी.

१३

कधी घरगुती वर्तुळानं जीवन जर
मला सीमित करावं वाटलं;
कधी जर व्हायला बाप, सहचर
सुखद नशीब मी मागितलं;
कधी कौटुंबिक चित्रानं जर
हुरळून गेलो मी निदान क्षणभर,
तर इमानानं, एकट्या तुमच्यावाचून
वधू दुसरी नाही काढणार शोधून.
सांगतो चमकदार कशिद्यावाचून ?
गवसून माझा आदर्श पहिला.
मी नक्की निवडेन एकट्या तुम्हांला
माझ्या उदास दिवसांत मैत्रीण म्हणून,
सगळ्या सौंदर्याची शपथ,
होईन सुखी.....शक्य होईल कितपत!

१४

पण मी नाही जन्मलेला दिव्यानंदाकरिता;
आत्मा माझा परका त्याला;
व्यर्थ तुमची परिपूर्णता
सर्वस्वी अपात्र मी तिला.
विश्वास ठेवा (सदसद्विवेक जामीन त्याला),
सहजीवन दु:खद होईल आपल्याला,
कितीही जरी केलं प्रेम तुमच्यावर मी,
सवयीचं होऊन, ते लगेच करीन कमी;
सुरु कराल रडायला : अश्रू तुमचे
करणार नाहीत स्पर्श माझ्या हृदयाला,
पण फक्त आणतील संताप त्याला.
निर्णय घ्या तुम्हीच, गुलाब कशाप्रकारचे
तयार ठेवील हिमिनेय आमच्यासाठी
आणि कदाचित पुष्कळ दिवसांसाठी.

१५

जगात अधिक वाईट काय असेल
कुटुंबाहून, जिथं बायको बिचारी
हळहळते अपात्र नवऱ्याबद्दल
एकटी दिवसा आणि रात्री;
जिथं कंटाळवाणा नवरा, तिची किंमत् जाणून
(नशिबाला तरीही बोल लावून),
सदा आठ्या घातलेला, घुमा तरी
रागावतो - थंड आणि मत्सरी !
असाच मी. त्याहून असता जर शोधला
तुम्ही विशुद्ध, ज्वलंत आत्मा तेव्हा,
इतक्या साधेपणानं जेव्हा
इतक्या चातुर्यानं लिहिलंत मला ?
वाटलं होतं तुमच्या वाट्याला असलं
कठोर दैवानं असेल नेमलेलं ?

१६

स्वप्नांना आणि वर्षांना नसतं परतणं;
नाही देणार नवेपण माझ्या आत्म्याला फिरून...
मी तुमच्यावर करीन प्रेम भावाप्रमाणं
आणि कदाचित नाजूकपणानं अजून.
ऐका तर माझं रागावाचून :
बदलते आळीपाळीनं कुमारिका तरुण
स्वप्नांनी हलकीफुलकी स्वप्नं,
असाच तरू स्वत:ची पानं
बदलतो प्रत्येक वसंताबरोबर.
अशीच दिसते स्वर्गाची इच्छा तरी.
करा प्रेम तुम्ही पुन्हा : परी
शिका ठेवायला ताबा स्वत:वर;
नाही कुणीही तुम्हांला, माझ्याप्रमाणं, पकडणार,
दुर्दैवाकडं अननुभवीपणा नेणार.''

११

पण मिळाल्यावर चिठ्ठी तान्याची,
अनेगिन चैतन्यानं गेला हेलावून;
भाषा कुमारींच्या स्वप्नांची
त्याच्यात विचारांचं मोहळ गेली उठवून;
आणि आठवला त्यानं लाडक्या तात्त्यानाचा
फिकट वर्ण आणि भाव उदासपणाचा;
आणि स्वप्नात मधुर, निष्पाप
आत्म्याला त्यानं बुडवून टाकलं साफ.
कदाचित भावनांच्या आचेनं जुन्याकाळच्या
त्याला क्षणभर पछाडलं;
पण फसवायचं त्यानं नाही इच्छिलं
विश्वासाला निरागस आत्म्याच्या.
आपण बागेकडं जाऊ उडत सध्याला,
जिथं भेटली तात्त्याना त्याला.

१२

दोन मिनिटं त्यांनी धरला अबोला,
पण अनेगिन गेला तिच्याशेजारी
आणि म्हणाला : ''तुम्ही लिहिलंत मला,
नका नाकारू. मी वाचली पुरी
श्रद्धाळू आत्म्याची कबुली,
निष्पाप प्रेमाची बरसात खुली,
मला प्रिय तुमचा जिव्हाळा;
त्यानं आणला उमाळा
कधीच थंडावलेल्या भावनांना;
पण तुमची स्तुती करायची नाही इच्छा मला,
पण त्याची परतफेड करीन तुम्हांला
कबुलीनं, तसंच कलाकुसरीविना;
कबुली माझी नोंदून घ्या तर :
स्वत:ला निवाड्यासाठी सोपवतो तुमच्यावर.

१७

असा केला उपदेश यिव्गेनीनं.
अश्रूंमधून काहीही न दिसून,
कसाबसा श्वास घेत, न बोलता शब्दानं
तात्त्यानानं घेतलं त्याचं ऐकून.
त्यानं दिला हात तिला. उदासपणानं
(जसं म्हणतात, यांत्रिकपणानं)
तात्त्याना निमूट निघाली
भणभणणारं डोकं वाकवून खाली;
गेले घराकडं वळसा घालून परसबागेला;
हजर झाले एकत्र, पण कुणीही
नाही घेतलं डोक्यात त्यांना छेडायचं त्याविषयी;
असतात खेड्यातल्या स्वतंत्रतेला
सुखी हक्क स्वत:चे असे,
गर्वोद्धत मॉस्कोला जसे.

१८

तुम्ही व्हाल सहमत, माझ्या वाचका,
की फार छान वागला
उदास तान्याशी आमचा सखा;
नव्हता पहिल्याच खेपेला त्यानं तिथं प्रगटवला
आत्म्याचा उघडा उमदेपणा,
जरी लोकांचा दुष्टपणा
नव्हता सोडत तावडीतून गुण त्याचे:
वैरी त्याचे, स्नेही त्याचे,
(म्हणजे ते एकच असण्याचा संभव)
होते ओरबाडत इकडून तिकडून त्याला.
वैरी असतात जगात प्रत्येकाला,
पण स्वर्गा, मित्रांपासून आम्हांला वाचव !
खरंच हे माझे स्नेही, स्नेही !
त्यांची आठवण मी उगीच काढली नाही.

—: पाच :—

३

पण शक्य आहे, असल्या कुटुंबाची
चित्रं तुम्हांला नाहीत वाटणार आकर्षक.
सगळी ही खालची पातळी निसर्गाची,
नाही फारसं तिथं काही मोहक.
पापी स्फूर्तीनं दिलेल्या देवानं,
दुसऱ्या कवीनं बहारदार शैलीनं
रेखाटलं आमच्यासाठी बर्फ पहिलं,
आणि सगळं सुख हिवाळी विलासांतलं.
तो तुम्हांला करतो बंदिवान, खात्री मला.
रेखून ज्वालामय कवितांत
चोरट्या रपेटी, बसून गाड्यांत
नाही उद्देश माझा जायचा भांडायला.
त्याच्याशी सध्यातरी, तुझ्याशी पण,
फिन्-मुलीच्या गायका, तरुण !

४

तत्याना (रशियन - आत्म्यानं,
का ते माहीत नसून स्वत:ला)
त्याच्या हिमशीतल सौंदर्यानं
करायची पसंत रशियन हिवाळा.
सूर्यावर शुभ्र धुकं, बर्फाच्या दिवसांतलं
बिनचाकाच्या गाड्या, उषागमन उशीर झालेलं,
चकाकणं गुलाबी हिमाचं,
धूसरपण नाताळातल्या संध्यांचं.
जुन्या काळाप्रमाणं ते करायचे सण
संध्याकाळी त्यांच्या घरी :
नौकराणी - जमवून शेजारी पाजारी
तरुण मालकिणींना करायच्या भविष्यकथन.
आणि दरवर्षी द्यायच्या आश्वासन
नवऱ्यांचं लढवय्या आणि स्वारीचं पण.

६

ती थरथरायची आणि पांढरी पडायची.
जेव्हा पडणारी चांदणी
आकाशात काळोख्या उडायची
आणि विखरायची, त्याक्षणी
तत्याना करायची घाई बेचैन होऊन
जोवर चांदणी नाहीशी व्हायची अजून
उच्छा हृदयाची तिला सांगायची,
जेव्हा ठरलेली कुठंतरी असायची -
तिची भेट, काळ्या कपड्यांतली संन्यासिनी
किंवा अचपळ ससा शेतामधून
तिचा रस्ता गेल्यास ओलांडून,
भयानं काय होणार सुरू - न येऊन ध्यानीं,
दु:खाच्या पूर्वसूचनांनी ओसंडत
राहायची ती दुर्दैवाची वाट बघत.

७

मग ? आढळतं निगूढ रम्यपण
अगदी त्याच भयात तिला :
असा निसर्ग करतो आमची घडण
विसंवादाकडे झुकलेला.
आला नाताळ, काय तो जल्लोष पण !
भविष्य सांगतं चंचल यौवन,
ज्याला नाही खेद आणि खंत,
ज्याच्या समोर जीवन दूरपर्यंत
पसरलं सुंदर, अमर्याद;
भविष्य सांगतं वार्धक्य चष्म्यातून
आपल्या थडग्याजवळच्या फलकातून
सगळं गमावून न परतणारं निर्विवाद.
पण सगळं सारखं : आशा त्यांच्याशी
बोलते खोटं बालिश बोबडेपणानिशी.

२०

''माझी !'' ओरडतो यिव्गेनी धारदार,
झोटिंग सगळे जातात भराभर,
मागे राहते अंधारात थंडगार
तरुण कुमारिका त्याच्या बरोबर.
अनेगिन हळुवारपणे जातो घेऊन
तत्त्यानाला कोपऱ्यात ठेवतो उचलून.
हलणाऱ्या तिथल्या बाकावर,
आणि झुकवतो स्वत:चं शिर
तिच्या खांद्यावर; ओल्गा येते आत,
तिच्यामागं लेन्स्की, प्रकाश चमकतो,
अनेगिन हात हलवतो,
डोळे फिरवतो गरागरा जोरात,
आणि अनाहूत पाहुण्यांची घेतो हजेरी
तत्त्याना राहते पडून अर्धमेली बिचारी.

२७

कुटुंबाबरोबर पान्फील खाईकोणच्या
मॉसियर त्रिके आला,
विनोदी, अलीकडंच गावाहून तांबोनच्या,
चष्म्यातला आणि लाल टोपातला.
खऱ्याखुऱ्या फ्रेंचमाणसाप्रमाणं खिशातून
त्रिकेनं आणलं होतं पद्य तत्त्यानाला उद्देशून,
परिचित सुरावर सुरू केलं मुलांनी :
''हो जागी, सुंदरी, निद्रेतुनी''
फाटक्या कॅलेंडरच्या गाण्यामधून
होतं छापलेलं हे पद्य जुनं;
त्रिकेनं, डोकेबाज कवीनं
त्याला उजेडात आणलं धुळीतून
आणि धिटाईनं जिथं 'सुंदरी निना'
तिथं घातलं 'सुंदरी तत्त्याना'.

४१

एकसुरी आणि निर्बुद्ध बेभान
वृंदगायनाप्रमाणं जीवनाच्या तरुण.
गोलगोल फिरतं वाल्त्झचं वृंदगान
जोडपं चमकतं जोडप्या मागून.
क्षणाला सूडाच्या जवळ जाऊन
अनेगिन चोरटं छद्मी हसून
जातो ओल्गाजवळ, जलद तिच्या बरोबर
भिरभिरतो पाहुण्यांजवळून भरभर.
मग बसवतो तिला खुर्चीवर,
चालवतो बोलणं इकडचं तिकडचं
मग मिनिटांनी दोन, नंतरचं
पुन्हा चालू ठेवतो वाल्त्झ तिच्याबरोबर.
सगळे थक्क बुचकळ्यात. लेन्स्की तर
नाही विश्वास ठेवत स्वत:च्या डोळ्यांवर.

४५

पण तिला अशक्य, अशक्य ? पण काय ?
ओल्गानं तर शब्द आधीच दिला
अनेगिनला. देवा, देवा हाय !
काय ऐकतो तो ? शक्य होतं तिला
शक्य आहे का ? नुकतीच बाळलेण्यांबाहेर,
तरी नखरेल चंचल पोर, हेरफेर -
आधीच जाणते ती कावेबाजपणा
शिकलेली करायला प्रतारणा !
नव्हती ताकद लेन्स्कीला सोसायची
बायकी चाळ्यांना देत शाप तेवढा.
जातो बाहेर....मागतो घोडा,
निघतो दौडत, जोड पिस्तुलांची.
दोन गोळ्या - नको काही जास्त -
ठरवतील नशीब त्याचं क्षणात.

—: सहा :—

२

सगळं झालं शांत. खोलीत पुढच्या
घोरतो जाडजूड पुस्त्याकोव
जाडजूड अर्धांगीसह स्वत:च्या
ग्वोझ्दीन, बुयानोव, पितुश्कोव
आणि फ्ल्यानोव, नाहीत सुहृद मुळात,
खुर्च्यांवर पहुडले जेवणघरात.
मॉसियर त्रिके जमिनीवर.
कुफायकामध्ये, जुनी टोपी वर.
पोरी खोलीत तत्त्यानाच्या,
ओल्गाच्या, सगळ्या निद्राधीन केवळ,
एकटी, उदास, खिडकीजवळ
उजळलेली किरणानं दिआनाच्या,
तत्त्याना बिचारी नाही निजत
काळोख्या शेतांकडे राहते बघत.

९

ती होती सुखद उदात्त चिठ्ठीचपाटी,
संक्षिप्त त्रोटक चिटोरं किंवा निमंत्रण
थंड निर्विकार स्वच्छ नम्रपण,
बोलावलं मित्राला लेन्स्कीनं द्वंद्वासाठी.
अनेगिननं पहिल्याच झटक्याला
असल्या संदेशाच्या वाहकाला
मागं परतवून अनावश्यक शब्दांवाचून
सांगितलं की, तो तयार कधीपासून.
झरेत्स्की उठला विनास्पष्टीकरण
थांबायचं आणखी नव्हतं मनात
असल्यानं घरी पुष्कळ कामात,
लगेच गेला निघून, यिव्गेनी पण.
एकटाच आपल्या आत्म्याबरोबर
होता नाराज स्वत:च स्वत:वर.

१३

ठरवून स्वैरिणीचा द्वेष करायचं,
उकळत्या लेन्स्कीनं नाही मनात आणलं
द्वंद्वाआधी ओल्गाला भेटायचं,
सूर्यावर, घड्याळावर लक्ष ठेवलं.
केली खूण हातानं अखेरची -
आणि (नकळत) पडली गाठ शेजारणीची.
त्याला वाटलं ओलिन्काला अवघडेल,
आपल्या आगमनानं घाव पडेल,
नाही, तसं काही झालं : पूर्वीसारखी
भेटीसाठी गायकाच्या बिचाऱ्या
आली धावत ओलिन्का उतरून पायऱ्या,
चंचल आशेसारखी,
सजीव, निश्चिंत, आनंदी,
अगदी तशीच, जशी होती आधी.

१८

कधी जर त्याला असतं कळलं जखम कसली
होती छळत माझ्या तत्यानाच्या हृदयाला,
कधी जर तत्याना असती उमजली,
कधी जर समजू शकलं असतं तिला
की लेन्स्की आणि यिव्गेनी उद्या
लागणार भांडायला रस्त्यावर थडग्याच्या.
हाय, कदाचित तिची प्रीती
करू शकली असती पुन्हा मित्रांची युती !
पण हिच्या वासना कधीही योगायोगानं
कुणीही नव्हत्या केल्या खुल्या अजून
अनेगिन सगळ्याबद्दल मौन धरून,
तत्याना होती झुरत चोरट्यानं,
एकटी न्यान्या असती जाणू शकली,
पण ती बोथट तर्कहीन होती झाली.

१९

सबंध संध्याकाळ लेन्स्की होता उन्मन
असा अबोल, असा आनंदी फिरून.
पण तो, जो स्फूर्तीनं भारून
नेहमी असाच, भुवई चढवून
बसायचा तो 'क्लविकोर्दी' जवळ
काढायचा त्यांतून झंकार केवळ.
तो ओल्गाकडं नजर वळवून मुकी
कुजबुजायचा : ''नाही का खरंच मी सुखी.''
पण झाला उशीर, झाली वेळ जायची उठून,
त्याचं हृदय वेदनेनं भरून
तरुण मुलीचा निरोप घेऊन
ते जणू काही गेलं फुटून.
ती पाहते त्याच्या चेहऱ्याकडे
''काय होतं तुम्हांला ?'' ''असंच !'' येई पायऱ्याकडे.

२०

घरी येऊन आपली शस्त्रं
त्यानं घेतली तपासून, घातली नंतर
पुन्हा ती पेटीतसुद्धा; बदलून वस्त्रं,
मेणबत्तीसमोर उघडला शिलेर;
पण विचार एकच त्याला राहतो छळत,
त्याचं हृदय उदास नाही पेंगत,
अवर्णनीय सुंदरीला
तो पाहतो, स्वत:समोर ओल्गाला,
व्लदीमिर पुस्तक मिटतो,
घेतो लेखणी; पद्यं त्याची
ओतप्रोत प्रेमाच्या चुकांची,
गरजतात, बरसतात. तो वाचतो -
मोठ्यानं, गीतात्म धगीत.
जसा देल्विग प्यालेला मेजवानीत.

२१

पद्यं योगायोगानं ठेवली गेली जपून,
आहेत ती माझ्याकडं; इथं आहेत सारी.
''कुणीकडं, कुणीकडं तुम्ही गेलात निघून,
वसंताच्या माझ्या दिवसांनो, सोनेरी ?
दिवस येणारा माझ्यासाठी काय ठेवतो वाढून ?
त्याला माझा कटाक्ष उगीचच ठेवतो पकडून.
दाट धुक्यात तो लपतो सदा,
नाही गरज : बरोबर दैवाचा कायदा.
पडेनही मी, विंधणाऱ्या बाणानं,
अगर जवळून तो उडत जायचा.
सगळंच वरदान - जागृतीचा, झोपेचा
येतो प्रहर ठरल्याप्रमाणं.
धन्य चिंतांचा पण दिन,
धन्य अंधाराचं पण आगमन !

२२

चमकेल भल्या पहाटे किरण दिनीत्साचा,
आणि बागडेल चमकदार दिन,
पण मी कदाचित थडग्याचा
असेन उतरत मार्ग गहन,
आणि आठवण तरुण कवीची
गिळून टाकील लेता संथगतीची,
विसरेल जग मला; परंतू
येशील ना, सुंदर ललने, तू
अश्रू ढाळायला जखमी अस्थिकलशावर
आणि करायला विचार - त्यानं प्रीती केली,
त्यानं मला एकटीला वाहिली
वादळी जीवनाची उषा कातर !
जिव्हाळ्याच्या सजणी, तू इच्छित अनुचर,
ये, ये, मी तुझा सहचर !

३२

निश्चल तो पडला आणि चमत्कारिक
होती हळुवार शांतता त्याच्या सोबत
छातीवर तो होता झालेला...
जखमेतून ताजं रक्त होतं वाहत
त्याआधी एकच क्षण
या हृदयात होतं स्पंदन स्फुरण,
वैर, आशा, आणि प्रेम फक्त,
खेळलं जीवन; उकळलं रक्त;
आता, जसं घरात टाकून दिलेल्या,
सगळं नि:शब्द आणि अंधारलेलं,
कायमचं ते थंडावलेलं,
बंद झडपा, खिडक्या झालेल्या
खडूनं पांढऱ्या. गृहिणी नाही.
कुठं आहे, देवाला माहीत. नष्ट झाला मागमूसही.

३७

कदाचित तो जगाच्या भल्यासाठी
अगर कीर्तीसाठी सुद्धा असेल जन्मला,
त्याची अबोल झालेली वीणा जगासाठी
उमटवत अनिरुद्ध झंकार आपला
शतकातून घुमवायला होती समर्थ. कवीची
कदाचित, जगाच्या कीर्ती सोपानावरची
होती वाट पाहात उंच पायरी;
त्याची गांजलेली सावली तरी
कदाचित, घेऊन गेली स्वत:बरोबर
पवित्र रहस्य. आणि आमच्या पुरता
संजीवक स्वर नष्ट पुरता.
आणि थडग्याच्या शिळांवर,
तिच्यापर्यंत नाहीत पोचत स्तुतिस्तोत्रे काळाची
आशीर्वचने लोकांची.

—: सात :—

३

अगर न आवडून पुनरागमन
शिशिरानं ढाळलेल्या पानांचं,
कडवट हानी आठवतो आपण,
ऐकत नवीन सळसळणं रानांचं.
अगर निसर्गानं सजीव झालेली
आणतो एकत्र विचारानं अवघडलेली
आम्ही कोमेजलेली वर्षं आमची
ज्यांना नाही आशा पुनर्जन्माची ?
शक्य आहे, चिंतनात येतो आमच्याकडं
काव्यात्मक स्वप्नात
दुसरा, जुना वसंत
आणि धडधडत हृदय आम्हांला नेतं भलतीकडं.
स्वप्नानं दूर देशासंबंधीच्या
अद्‌भूत रात्रीच्या, चंद्राच्या.

७

देवदाराच्या झुकलेल्या फांदीवर
असं व्हायचं, पहाटेचा वारा.
त्या शालीन अस्थिकलशावर
डोलवायचा रहस्यमय पुष्पहारा.
असं व्हायचं, उशिरा रिकामपणी
उकडं फिरकायच्या दोन मैत्रिणी.
आणि थडग्यापाशी समोर चंद्राच्या
मिठी मारून त्या रडायच्या.
पण आता....स्मारक उदास
विसरलेलं, वाट रूळलेली
पुसलेली, माळ नाही फांदीवरली,
एकटा, त्याच्याखाली जख्खड आणि भकास
धनगर पूर्वीप्रमाणं गातो
आणि वहाणा बिचाऱ्या विणतो.

११

माझा बिचारा लेन्स्की ! थडग्यात भकास
मर्यादांत शाश्वताच्या चिरंतनाच्या
होता अवघडला काय, गायक निराश
प्राणघातक वृत्तानं प्रतारणेच्या.
की 'लेता'वर डुलक्या घेणारा
कवी नेणिवेनं सुखिया पुरा.
नाही मुळीच बिथरत कशानंही,
आणि जग त्याला बंद आणि मुकंही.
असंच ! विस्मरण अलिप्त
कबरीपाशी आमची पाहतं वाट.
शत्रूंचा, मित्रांचा, प्रेमपात्रांचा गोंगाट
एकदम थंडावतो. इस्टेटीसाठी फक्त -
वारसांचा प्रक्षुब्ध घोळका
चालवतो अशोभनीय गलका.

१४

आणि एकाकीपणात क्रूर
अनावर विकार तिचा राहतो जळत.
आणि अनेगिनबद्दल सुदूर
तिचं हृदय मोठ्यानं राहतं बोलत.
ती त्याला नसते पाहणार,
भागच तिला करणं द्वेष त्याच्यातल्या
खुन्याचा भावाच्या स्वत:च्या.
कवी मेलेला कधीच दुसऱ्याला
त्याच्या वधूनं वरलं,
कवीचं स्मरण चमकून विरलं,
धुराप्रमाणं निळ्या आकाशातल्या.
त्याच्यासाठी दोन हृदयं, शक्य असं व्हायचं
अजून झुरतात....पण का झुरायचं ?

१६

तिला संशय राहतात छळत;
''जाऊ का पुढं, की परतीच्या मार्गावर ?
तो उथं नाही. मला नाहीत ओळखत....
टाकीन नजर घरावर, या बागेवर.''
आणि आता टेकडीवर तत्याना जाते,
जवळजवळ श्वास रोधून चौफेर टाकते
गोंधळलेला चौकस कटाक्ष
आणि शिरते आवारात भकास.
तिच्याकडं भुंकत कुत्री झेपावली.
किंकाळीनं तिच्या भेदरल्या
पोरं कुटुंबाची आवारातल्या
पळाली ओरडत. न करता झटपट कसली
पोरांनी पिटाळली सारी
स्वत:च्या अवगुणांखाली झाकून कुमारी.

१९

तत्याना नजरेनं विलोल
स्वत:भोवतीचं सगळं बघत राही
आणि सगळं तिला दिसतं अमोल,
सगळं आत्म्याला बेचैन जिववत राही
अर्धव्यथित आनंदासह
टेबल विझलेल्या दिव्यासह.
आणि ढीग पुस्तकांचा, खिडकीखाली
शय्या शालीनं झाकलेली;
दृश्य खिडकीतलं चंद्रप्रकाशातलं
आणि हे फिकट विचित्र
लॉर्ड बायरनचं चित्र.....
हॅटखाली मुरडलेली भुवई
हातांची घडी घातलेली.

२३

जपल्या होत्या पुष्कळ पानांनी
हातखुणा नखांच्या प्रखर;
डोळे एकाग्र पोरीचे जिवाभावांनी
खिळलेले त्यांच्यावर.
तत्याना पाहते थरथरत्या हृदयानं,
कोणत्या कल्पनेनं अभिप्रायानं
होता अनेगिन भारावलेला,
ज्याला, अबोल दुजोरा तिनं दिला,
त्यांच्या समासांत भेटतात तिला
रेखा पेन्सिलीच्या त्याच्या
सगळीकडं आत्म्यानं अनेगिनच्या
नकळत प्रकट केलं स्वत:ला,
कधी संक्षिप्त शब्दानं, कधी फुलीनं,
तर कधी प्रश्नचिन्हानं.

४४

आणि मग : आप्तांकडील भोजनांना
नेतात तान्याला दररोज.
दाखवायला आजी-आजोबांना.
तिचा विमनस्क आळस रोज.
आप्तांना दुरून आलेली पुतणी
भेटायची प्रेमानं ठिकठिकाणी.
मग उद्‌गारवाचकं आणि पाव-मीठ.
''केवढी तान्या झाली उंच, धीट !''
''अलीकडंच ना मी तुझं नाव ठेवलं ?
आणि मी असं हातावर घेतलं,
आणि मी कानापाशी 'ढिशू-ढिशू' केलं,
आणि 'प्रयानिकोम' भरवलं !''
एक सुरात आजीबाई घोकतात :
''कशी आमची वर्षं तर उडून जातात !''

४५

पण त्यांच्यांत नसतं स्थित्यंतर वरवरचं,
सगळं त्यांच्यांतलं जुन्या धर्तीवरचं;
आत्याबाईचं - राजकन्या इलीनाचं
अजून पांढरी रंगते लुकेर्याल्वोव्ना,
अजून तशीच बोलते खोटं ल्युबोव पित्रोवना,
दूवान पित्रोविच तसाच मठ्ठ,
सिम्योन पित्रोविच तसाच निगरगट्ट,
मित्र मॉंसिय फिन्मूश अजून तोच,
कुत्रा तोच आणि नवरा तोच;
तो अजून सदस्य नामांकित क्लबचा;
अजून नम्र तसाच, गोंधळलेला तसाच.
आणि दोघांचं खातो-पितो तसाच.

४९

दप्तरी तरुण बसलेले टोळक्यांत,
तान्यावर नेमकी नजर टाकतात,
आणि तिच्यासंबंधी आपापसांत
अरबट चरबट काही बोलतात.
विदूषक सुतकी एकजण कुणी
तिच्यात शोधतो आदर्शवादिनी.
आणि रेलून दाराला
खरडतो प्रेमगीत उद्देशून तिला.
कंटाळवाण्या आत्याकडं तान्याला भेटून.
तिच्याजवळ कसाबसा व्याझिम्स्की बसला,
आणि आत्म्याला तिच्या रिझवू शकला,
आणि त्याच्याजवळ तिला पाहून -
तिच्याबद्दल - स्वत:च्या टोप सरळ करीत
एक म्हातारा राहिला विचारीत.

—: आठ :—

१५

केली दाटी तिच्याकडं ललनांनी
केलं स्मित तिच्याकरता म्हाताऱ्यांनी
केलं अभिवादन झुकून पुरुषांनी
झेलले तिचे कटाक्ष सगळ्यांनी.
पोरीबाळी सटकल्या अबोल होऊन
तिच्यापुढून हॉलमध्ये सगळ्यांहून,
नाक आणि खांदे उडवले वर
जनरलनं आत शिरल्या बरोबर.
कुणालाही नव्हतं शक्य तिला लेखणं
आपादमस्तक नखशिखान्त देखणं,
कुणाला नव्हतं शक्य तिच्यात शोधणं
तसलं - ज्याला स्वयंमन्य फॅशन प्रमाणं,
लंडनमधल्या उच्च वर्तुळात
(नाही शक्य....) अभिरुचिहीन म्हणतात.

१८

''तर तू विवाहित ! कळलं नाही आधी !
बऱ्याच काळापूर्वी ?'' झाली दोन वर्षं तरी
''कुणाशी ?'' ''लारिनाशी''. ''तत्यानाशी !''
''तू तिच्या ओळखीचा ?'' ''मी त्यांचा शेजारी !''
''अस्सं, तर जाऊया चल.'' प्रिन्स निघतो,
स्वत:च्या बायकोकडं, त्याला नेतो.
आपल्या आप्ताला आणि मित्राला.
प्रिन्सेस पाहते निरखून त्याला
काही नाही वाटलं तिच्या जीवाला.
काहीतरी जरी गेलं तिला बेचैन करून,
किती जबरदस्त झाली ती जरी
चकित, संभ्रमित पुरी,
तरी तिला कशाकशानं टाकलं नाही बदलून.
तिचा राहिला होता तसाच स्वर :
होतं तसंच शांत तिचं अभिवादन तर.

२३

आत येतो नवरा. तो आणतो व्यत्यय
त्या अप्रिय एकांत - संवादात
अनेगिन बरोबर घेऊ लागतो पुन: प्रत्यय
केलेल्या चाळ्यांचा, विनोदाचा तरुण वयात.
ते हसतात. आत येतात पाहुणे :
मग सामाजिक नीचपणाच्या तिखटपणे
व्हायला लागलं जिवंत संभाषण,
समोर यजमानिणीच्या हलकं फुलकं पोरकटपण.
होतं चमकत मूर्ख सोंगाढोंगा वाचून
आणि व्यत्यय आणत होतं त्यामध्ये.
समंजस शहाणपण उथळ विषयांमध्ये;
चिरंतन सत्यावाचून, पांडित्यावाचून.
नव्हता भिववत कुणाच्या कानांना
स्वत:चा विमुक्त उच्छृंखलपणा.

४२

ती त्याला नाही वर उठवत
दूर न करता त्याच्यावरून नजर,
हावऱ्या ओठांपासून नाही हलवत
आपले हात बधिर.
कशाविषयी आता तिचं चिंतन ?
चालतं बराच वेळ नि:शब्दपण,
आणि संथपणानं ती अखेरीला;
''बस्स; उठा. पाहिजेच मला
तुम्हांला स्पष्ट करायला मोकळेपणानं.
अनेगिन, आठवतो ना तो तास
जेव्हा बागेत, झाडांखाली आपणांस
दैवानं आणलं एकत्र; कशा नम्रपणानं
ऐकली मी तुमची व्याख्यानबाजी,
आज पाळी माझी.

४३

अनेगिन, मी तेव्हा अधिक तरुण,
अधिक सुंदर होते - असं दिसतं खरं.
मी प्रेम केलं तुमच्यावर; खरं हे पण ?
हृदयात तुमच्या मला आढळलं काय बरं ?
कोणता प्रतिसाद ? नुसतं धिमेपण.
नाही का खरं ? तुम्हांला नव्हती वार्ता पण
शालीन कुमारीच्या प्रेमाची ?
आतासुद्धा - परमेश्वरा ! गोठते धार रक्ताची.
जेव्हा नुसतो आठवतो कटाक्ष निर्विकार
आणि तो उपदेश....पण तुम्हांला
मी नाही देत दोष : त्या भयंकर प्रहराला
तुम्ही वागलात उदात्तपणानं अपार.
तुम्ही होता बरोबर माझ्या दृष्टीनं,
मी आहे आभारी मनापास्नं.

४७


शक्य होतं उतकं सहज मिळवणं सुख,
उतकं जवळ ! पण नशीब माझं
आधीच निश्चित....उतावळीनं उत्सुक
वागले मी चुकलं माझं.
आर्जवी अश्रूंनी मला
आळवलं आईनं : बिचाऱ्या तान्याला
झाले सगळे भोग सारखेच.
मी केलं लग्न. तुम्ही ठरवलं पाहिजेच.
मी तुमच्याकडे करते याचना - मला सोडायचं.
मी जाणते : तुमच्या हृदया मांडून ठाण
आहे गर्व आणि आत्मसन्मान
मी तुमच्यावर करते प्रेम (कशासाठी लपवायचं ?)
पण मी दुसऱ्याला दिली गेलेली दान,
मी राखीन जन्मभर त्याच्याशी इमान.

४८

ती गेली. राहतो उभा यिव्गेनी,
जणू काही वज्राघात झालेला,
कसल्या तरी वादळात - मनोमनी -
भावनांच्या आता तो बुडलेला.
टाचांचा आवाज अचानक ऐकू आला
आणि नवरा तत्यानाचा प्रकट झाला.
इथंच माझ्या नायकाला, त्याला
दुष्ट वाटणाऱ्या या क्षणाला.
वाचका, आपण सोडून देऊया
बराच काळ कायम त्याच्या मागनं
पुरेसं आपण एकाच वाटेनं
भटकलो जगभर, अभिनंदन करूया,
एकमेकांचं किनाऱ्याबरोबर. शाब्बास !
कधीच तर (नाही का खरं ?) वेळ खलास !

५१

पण ते, ज्यांना भेटीत स्नेहातुर
मी ओळी पहिल्या दाखवल्या वाचून,
काही आता नाहीत, आहेत ते दूर
जसं सादी कधीतरी गेला सांगून.
त्यांच्यावाचून अनेगिन रेखाटलेला.
आणि ती जिच्यामुळे साकारलेला,
मधुर आदर्श तत्यानाचा,
हाय ! नियतीनं केला नाश कितीकांचा
धन्य ज्यानं फार आधी सोहळा जिण्याचा
सोडला मागं; तळापर्यंत न पिता
पेला मदिरेचा भरलेला पुरता;
ज्यानं नाही वाचला शेवट तिच्या कादंबरीचा
आणि अकस्मात जमवलं दूर होणं तिच्यापासून
जसं मी माझ्या अनेगिनपासून.
वारसांचा प्रक्षुब्ध घोळका
चालवतो अशोभनीय गलका.



प्रा. डॉ. पंडित आवळीकर

पंडित आवळीकर (जन्म १९३१) यांनी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात काव्य, समीक्षा आणि अनुवाद या साहित्यक्षेत्रांच्या लक्षणीय भर टाकली. स्वप्नवंती, दीपराग आणि प्रणयिनी हे त्यांचे काव्यसंग्रह. 'श्रेयसी' या संग्रहात त्यांची निवडक कविता एकत्रित केली गेली.

न. चिं. केळकर आणि जी. ए. कुलकर्णी यांच्यावरील त्यांची पुस्तके विशिष्ट ग्रंथकराच्या अभ्यासाची चांगली उदाहरणे ठरली. आधुनिक कवींवरील त्यांचे लेखन त्यांच्या कवितांइतकेच आस्वाद्य ठरले.

'विवेकचिंतामणी' 'मुडलगीचे स्वामी' हे आवळीकरांचे संपादित संशोधित ग्रंथ पुणे-कर्नाटक विद्यापीठांनी संयुक्तरीत्या प्रकाशित केले. मराठी-कन्नड अनुबंध त्यांचे विशेष अध्ययनक्षेत्र ठरले व त्यांनी गुलबर्गा विश्व-विद्यालयात प्रधान संशोधन प्रकल्पात याच दिशेने काम केले. पंचवीस वर्षे, विश्वविख्यात रशियन साहित्यिक आलेक्सान्द्र पुश्किन यांच्या मूळ साहित्य-कृतींचा मराठीत अनुवाद करण्याचे गौरवास्पद कार्य त्यांनी केले. कॅप्टनची मुलगी, बेल्किनच्या गोष्टी, पुश्किनवरील समीक्षा ग्रंथ हे प्रकाशित झालेले आहेत. तर यिव्गेनी अनेगिन, बोरीस गोदुनोव, पुश्निकच्या कविता हे प्रकाशित व्हायचे आहेत.

इ. स. २००२ साली डॉ. आवळीकर यांचे पुणे येथे तीव्र हृदयघाताने निधन झाले.